
मंतरलेल्या आठवणी
प्रा. श्रीराम काळे
ई कथासंग्रह

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मंतरलेल्या आठवणी

## प्रा. श्रीराम विनायक काळे

# मंतरलेल्या आठवणी

## लेखक: प्रा. श्रीराम विनायक काळे

मूळ गाव- पडेल,ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.
सध्याचा निवास- 3रुद्रप्रिया अपार्टमेंट, रेशनशॉप समोर,
वारजे, पुणे 411058 (Mob 8766764641)

•टंकलेखन व पेज सेटींग
सौ.शर्वरी समीर काटदरे, कर्वे नगर पुणे 9404167338

•MantaralelyaAathavani- Prof.Shreeram Vinayak Kale
ISBN No- 978-81-908189-6-4
मुखपृष्ठ- स्वयम आर्टस् ॲण्ड ग्राफिक्स

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ११ जानेवारी २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रा. श्रीराम काळे - ९८३३३९९७९४

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका



बालपणी अपघातात डावा हात निकामी झाला तरी न खचता, अपंगत्वाचे भांडवल करून सहानुभूतीचे लाजिरवाणे जिणे न जगता स्वबळावर जिद्दीने आयुष्याला सामोरे जाणारा माझा स्वभिमानी सुहृद श्री. उदय दांडेकर आणि त्याला समर्थ साथ देणारी सौ. स्वाती वहिनी या उभयतांना सविनय अर्पण.

# प्रस्तावनेचे दोन शब्द



आदरणीय श्री. काळे सरांच्या "मंतरलेल्या आठवणी" कथासंग्रहाला दोन शब्द लिहिताना मला आनंद होत आहे.

*" अमृताच्या सरी पडो क्षणोक्षणी,*
*शब्द शब्द होवो वास्तवाची लेणी. "*

या वचनाप्रमाणे 'मंतरलेल्या आठवणी' या पुस्तकातील आठवणी या वास्तव आहेत. त्या आठवणी खरच मंतरलेल्या असल्या सारख्या आहेत. वाचकाला त्या मंत्रमुग्ध करतात. इतकं भारावून टाकणारं कोणतं रसायन यात आहे? हे पुस्तक वाचूनच ठरवावं लागेल. सुमारे साठ सत्तर वर्षांपूर्वीचा राजापुर आणि देवगड तालुक्यातील ग्रामीण जीवनाचा पट लेखकाने वाचकांसमोर उभा केला आहे. त्यातून त्या काळातील मानवी जीवनाचे निखळ लसलसते दर्शन घडते.

एखादा लेखक लिहितो म्हणजे नेमके काय करत असतो? मानवी जीवनातील विविध जीवनानुभवातून साहित्य निर्मिती होत असते. जीवनानुभवांचा विचारांवर व भावनांवर परिणाम होत असतो. हे सर्व जीवनानुभव साहित्य निर्मितीच्या प्रेरणास्थानी असते. लेखक ज्या काळात जगतो त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीचा,भोवतालच्या निसर्गाचा, भूगोलाचा एकसमयावच्छेदेकरून साहित्यावर परिणाम घडत असतो. मंतरलेल्या आठवणी या पुस्तकाचे लेखक बालपणी ज्या काळात जगले त्या काळातील भोवतालाचा त्यांच्या मनावर

खोलवर परिणाम झालेला आहे. पाहिलेल्या आणि मोठ्या माणसांकडून ऐकलेल्या गोष्टी लेखकाच्या मनावर नोंदल्या गेलेल्या आहेत. मनावर ठरलेल्या या गोष्टी त्यांच्या मनात कुठेतरी बंदिस्त असतात. लेखक जेव्हा लिहायला बसतो तेव्हा मनात रुतलेल्या अनेक आठवणी उसळून वर येतात व त्या बाहेर येण्यासाठी आतून ढुसण्या देतात. लेखकाने मनातील ही सर्व उलघाल शब्दातून मोकळे केली आहे. त्यामुळेच आठवणी कथांमध्ये येऊन बसल्या आहेत. यातून नवनिर्मितीचे समाधान लेखकाला मिळते व मन रिते होते. अशा निर्मितीप्रक्रियेतून या पुस्तकातील कथा साकारल्या आहेत.

त्या काळातील सामाजिक सर्व अंगांचे दर्शन घडते. लोक जीवनातील रुढी, चालीरीती, समजुती, श्रद्धा,अंधश्रद्धा, व्यवसाय, भोवतालचा निसर्ग, शेती सणवार, उत्सव, शेती, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थिती इत्यादी अनेक गोष्टी ठळकपणे अधोरेखित झाल्या आहेत. ग्रामीण भागातील टिपीकल खेडेगावाचे चित्र समोर उभे राहाते. त्यातील रस्ते, झाडे,पाणवठे, निसर्ग, पर्यावरण वगैरे सर्व समोर दिसते. त्या काळातील समग्र लोकजीवनाचे दर्शन या कथांमधून घडते.

लेखकांची भाषा ओघवती आहे. साधी सरळ भाषा वाचकाला आपल्याबरोबर घेऊन जाते. ग्रामीण जीवनातील विविध शब्द येतात. ग्रामीण भागातील संवाद येतात. कथा वाचत असताना ते ते वर्णन प्रत्ययकारक होऊन प्रसंग समोर उभे राहातात. त्या काळातील ग्रामीण शब्द परिचयाचे नसतीलही. पण प्रसंग व संवाद यातून त्या शब्दांचे अर्थ समजू शकतात. अशाप्रकारे त्या काळात लोकजीवनात प्रचलित असलेले अनेक शब्द आपल्याल गवसतात. अनेक रूढी, परंपरा यांचे दर्शन घडते. खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडते. शेती, शेतीची अवजारे, शेतीची पद्धत,फुले, पिके, बागायती, इत्यादी अनेक गोष्टींचे ज्ञान होते. पर्यावरणातील अनेक गोष्टी समजतात. भूभागाची माहिती मिळते. पर्यावरणातील अनेक गोष्टी समजतात. अगदी साप हा विषय घेतला तरी तरी

सापांच्या जातींची नावे, त्यांचे रंग, रूप, वैशिष्ट्ये, इत्यादी अंगाने माहिती होत जाते.

वानरांबद्दल आलेली माहिती रंजक आहे. वानर झुंडीने कसे येतात, पिकांचा किंवा फळांचा विध्वंस करण्याच्या पद्धती, म्होरक्याचे वागणे, त्यांचे एकमेकांना संकेत देण्याच्या पद्धती, त्यांच्या सांकेतिक ध्वनीचे अर्थ, त्यांची शक्ती स्थाने, त्यांची कमजोरी. इत्यादी अंगानी माहिती मिळते.

पूर्वीच्या काळी मनोरंजनाची साधने नव्हती. लोकाना नाटकाची आवड होती. पण साधने नव्हती.पण लोक नाट्यवेडाला कशाप्रकारे वाट करून देत. ते करताना अनेक विनोद घडत असत. त्यातील तपशील वेगवेगळे असतीलही. पण संघर्षातून, खूप मोठ्या धडपडीतून नाटक उभे करणे, अडचणीना तोंड देणे, असलेल्या परिस्थितीशी जमवून घेणे, हे सगळे साधत असताना विनोद घडत असता. ते वाचित असताना नकळत कधी हसू पसरलेले समजतही नाही. प्रसंगातून सहजतेने घडत गेलेले अस्सल विनोद अगदी वास्तव आहेत. जिगरबाज या कथेतील नायक जो टोकाचा संघर्ष करत आहे त्याला तोड नाही. तो वाचून वाचकाला प्रेरणा मिळते.

दारिद्र्यता, विषमता, भ्रष्टाचार, यातून जीवनाला आलेल्या विरूपतेचे दर्शन घडते. त्याचबरोबर मानवी मनातील उदात्ततेचे, मानवतेचे, सहिष्णुतेचे दर्शन घडते.

असा हा 'मंतरलेले दिवस' कथासंग्रह वाचनीय झाला आहे. तो वाचून त्याचा आनंद घ्यावा.

लेखकांच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

**सौ. वृंदा कांबळी. (9421262030)**



# लेखकाचे मनोगत

आमच्या लहानपणी गावात एखाद्याकडे रेडिओ असायचा. सार्वजनिक पूजेला मुंबईवाले रेकॉर्ड प्लेअर आणित तेव्हा गाणी ऐकायला मिळत. त्यामुळे पुस्तकं, मासिकं वाचणे, विटीदांडू हुतूतू सारखे शून्य मूल्य साधनं लागणारे खेळ आणि मळयात किंवा आडवणात भटकणं या व्यतिरिक्त दैनंदिन जीवनात तरी मनोरंजनाची कसलीही साधनं नव्हती. तरीही बोअर होणं आम्हाला माहितीच नव्हतं. सहवासातल्या माणसांशी मनमुराद गप्पा व्हायच्या. जुन्या पिढितल्या माणसांची गप्पाष्टकं तर आम्ही अगदी कान पाडून ऐकत असू. त्यामुळे त्यानी अनुभवलेलं समाज जीवन, त्यांच्या श्रद्धा, त्यांच्या जीवन निष्ठा, त्यांच्या भावभावना, तत्कालिन लोकभ्रम नी सामाजिक संकेत, त्यांच्या वाट्याला आलेले बरे वाईट प्रसंग नी घटना, त्यांना भेटलेली सुष्ट दुष्ट प्रवृत्तीची माणसं, त्यांच्या पाल्हाळातून आणि थविकांमधून त्यांच आणि तत्कालिन समाज मनाचं घडलेलं दर्शन यांचा एक आगळा वेगळा खजिना अंतर्मनात साठून राहिला.

या संग्रहातल्या काही कथांमधले प्रसंग,घटना आणि माणसं ही सगळी मला सांगोवांगीतून मिळालेली शिदोरी आहे. माझ्या अगोदरच्या पिढीने जे दैन्य, जे भोग भोगले एवढं दुर्भिक्ष्य काही बालपणी माझ्या स्वत:च्या वाट्याला तरी आलेलं नाही. सुबत्ता नव्हती पण किमान गरजा तरी भागत होत्या. पण

माझ्या बालपणातही अठरा विशे दारिद्र्य नी उपासमार भोगणारी काही कुटुंबही मी पाहिलेली आहेत. त्यामुळे माझ्या संपर्कात आलेल्या वडिलधाऱ्या माणसानी त्या काळी केवढी कदन्न परिस्थिती पचवली असेल याची कल्पना आणि कदर मला आहे. म्हणून त्याची अंशत: ऋणमुक्ती हाही हेतू या संग्रहातल्या काही कथा

शब्दबद्ध करताना निश्चित होता. हे मी मुद्दाम नमूद करू इच्छितो. आज बहुजन समाज सुखीसंपन्न जीवन जगत आहे. घरोघरी टीव्ही , लॅपटॉप नी घरातल्या प्रत्येकाकडे मोबाईल आहे. बातम्या, सिरियल्स, व्हिडीओ सॉग पहाणं, फेसबुक,वॉट्स् ॲप ही एवढी अनिवार्य आन्हिक कर्म झालेली आहेत की घरातल्या माणसाना एकमेकांशी अधिक-उणं बोलायलाही वेळ नाही. सुटीला माणसं आऊटिंगला जातात तिथेही खाणंपिणं ग्रूपफोटो नी सेल्फी यात निरिक्षणाचा आस्वाद घ्यायलाच वेळ उरत नाही.

मुलं कार्टून्स पाहतात त्यामुळे आजी आजोबांच्या गोष्टी ऐकणं त्याना आवडत नाही. वाचनाचं तर उच्चाटणच झालेलं आहे. जुन्या रुढी , संकेत, कुलधर्म, कुलाचार ही माहिती एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे ही शृंखला आता पूर्ण तुटलीच आहे. संस्कारक्षम वयोगटातल्या मुलांचं अनुभव विश्व संपन्न होईल, ती बहुश्रुत होतील असे कोणते नी किती कार्यक्रम चॅनल्स आणि मिडिया प्रसारित करतात हा संशोधनाचा नी वादाचा विषय ठरेल, म्हणून त्याबद्दल न बोलणंच बरं .

'मंतरलेल्या आठवणी' माझ्या जाणीवा संपन्न होण्यापूर्वी पोरसवदा वयातल्या आहेत.चुलत आज्ज्या, आई, वडिल, आत्ते, काका-काकू, मावश्या, नी माझ्या संस्कारक्षम वयात भेटलेल्या नात्यांच्या पलिकडे असलेल्या. माझं भावविश्व संपन्न करणाऱ्या असंख्य वडिलधाऱ्या माणसानी ते दिवस अनुभवलेले आहेत.... त्यांचे अनुभव तर्कशुद्ध मांडायचा शिकस्तीचा प्रयत्न मी केला आहे पण काही संदर्भांच्या उणिवा राहिल्या असतील.काही तपशील

अपूर्ण आहेत. त्या सगळ्या कम्युनिकेशन गॅप्स आहेत हे सुजाण वाचकानी लक्षात घेवून त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष करून माझ्या लेखनाचा आस्वाद घ्यावा अशी माझी प्रामाणिक अपेक्षा आहे.

प्रस्तुत संग्रहातली पाचवी कथा हा संग्रह ज्याच्या जिद्दीला अर्पण केला आहे तो माझा बालमित्र उदय दांडेकर, याच्यावर बालवयात गुदरलेल्या भीषण प्रसंगांवर आधारलेली आहे. If a man tries he can move the mountain…अशा जिगरबाज वृत्तीने त्याच्यावर बेतलेल्या जीवघेण्या संकटाना धीरोदात्तपणे सामोरे जावून त्यावर मात करून अपंगत्वाचे भांडवल करण्याऐवजी जे अवयव शाबूत आहेत त्यांचा कौशल्याने वापर करून यशस्वी जीवनाकडे त्याने केलेली वाटचाल अत्यंत प्रेरणादायी आहे. त्याने केवळ स्वत:चेच नव्हे तर त्याच्या तीनही लहान भावंडांचे शिक्षण करून त्याना मार्गी लावून वडिल भाऊ म्हणून आपले कर्तव्यही जबाबदारीने चोख निभावून आपले कुटूंब वर काढले. त्याची जिगर, धाडस आणि सद्वर्तन या गुणांची कदर करून त्याचं अपंगत्व दुर्लक्षित करून त्याचा दुसरा हात बनून त्याच्यावरून जीव ओवाळून टाकणारी, त्याचं कार्य कर्तृत्व फुलविणारी सौ. स्वाती वहिनी! या उभयताना माझ्या भावविश्वात अत्यंत सन्मानाचं स्थान आहे. त्याने अनुभवलेल्या जीवावरच्या भीषण प्रसंगांची मांडणी मी कथेच्या धाटणीने केलेली आहे.

दुर्गम भागातल्या माझ्या वास्तव्याने माझं अवघं भावविश्व इतकं व्यापून टाकलेलं आहे की वर्णनं वाचताना हा कल्पना विलास तर नाही ना? अशी जाणकारानेही शंका घ्यावी. मनाला भिडणारं, भुरळ घालणारं पण' ट्वेंटी थाऊजंड लिग्ज अंडर सी ' सारखं अद्भुतात न नेणारं वर्णन हे नेहेमी व्यक्तिनिष्ट अनुभवांवर आधारलेलं असतं. जुन्या पिढीने माझं अनुभव विश्व किती संपन्न केलंय याची झलक या संग्रहातल्या कथा वाचताना नक्कीच पाहता येईल असा माझा विश्वास आहे.

या संग्रहाला सौ. वृंदा कांबळी यांची प्रस्तावना लाभली आहे. या संग्रहातील कथांमध्ये वर्णन केलेला काळ त्यानीही जवळून बघितलेला आहे. त्या माझ्या माजी विद्यार्थिनी असून आदर्श शिक्षिका म्हणून त्यांचा लौकिक आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अग्रणी महिला लेखिकांमध्ये त्यांची गणना होते. त्यानीही विपुल वाङ्मय निर्मिती केलेली असून ग्रंथालय व्हवळीत त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

**प्रा. श्रीराम काळे.**

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.

# लेखक परिचय :



प्रा. श्रीराम विनायक काळे.
एम्. ए.एम्.एड्. एम्.फील्.

※ बी.एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक पदावर सेवा.

※ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्रकाशित.

※ अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध झालेल्या आहेत .

※ पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित कथास्पर्धा साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त केले आहेत .

※ कालराज प्रकाशन देवगड तर्फे 'पाखरांची भाषा' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

※ विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे 'बॅडकमांड' कथासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे.

※ ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी ''पाखरांची भाषा' 'बॅडकमांड' 'तेरी चुनरिया दिल ले गयी ' 'वसतीची गाडी ' 'स्कायलॅब पडली ' 'टूरिंग टॉकीज' असे सात ई कथासंग्रह आणि **'शारिरीक शिक्षण महाविद्यालय, कांदिवली'** ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे.

※ Matrubharati.com वेबसाईटवर 95 कथा प्रसिद्ध झाल्या असून सुमारे 3.5 M वाचक आहेत.

# अनुक्रमणिका


०१. कौलाची वखार

०२. उपल्वटी वांदर

०३. सापांचे दिवस

०४. भाव तोची देव

०५. जिगरबाज

०६. नाटकाचं वेड




# ०१. कौलाची वखार

ध्यानीमनी नसताना बापू मास्तरांच्या बदलीचा हुकूम आला. मुख्याध्यापक तांबे म्हणाले, “पण तशी काळजी कराय नको. एक म्हणजे राज रस्त्यावरचा गाव, बापू मास्तरांची बहीण त्याच गावात दिलेली आहे म्हणजे दोन वेळच्या पुख्ख्याची सोय आणि मुख्याध्यापक म्हणून बढती. अजुन आठ वर्षे आहेत रिटायर व्हायला म्हंज्ये नाय म्हटले तरी पगारात दरमहा चव्वेचाळीस रुपये नी पेन्शन बारा रुपये तरी वाढीव मिळेल.” “हां म्हणज्ये डोल्र्यात काय? मग काय सोनां नी पाणी.... शाळा लय मोटी तीनशा पट हा..... माजो साडभाव नाना देवरूखकर त्याच शाळेत हा... तुमी काय्येक फिकीर करू नुको मास्तर. आट वर्सा मज्येत ऱ्हावा डोल्र्यात... ”भुर्के मास्तरानी दिलासा दिला. बापू मास्तरानी ही संधी सोडू नये असे सगळयाच सहकाऱ्यांचे मत पडले. साधक बाधक विचार करता सहकाऱ्यांचे मत बापूनाही पटले. त्यांची चार वर्षे भर पगारी रजा साठलेली, इथे तांबे मास्तराने काय धड्या गांडीन रजा मंजूर केलीन नसतीन....तो सायबाला भ्यालेला. आपण स्वत:च मुख्याध्यापक म्हटल्यावर भरला अर्ज नी फर्स्ट असिस्टंट कडे चार्ज दिला की काम भागले. हाताखालच्या माणसाना मुद्दाम त्रास द्यायचा नाही एवढे पथ्य सांभाळले तरी पुरे . असा विचार करून बापूनी डोल्र्यात हजर व्हायचे ठरवले.

बापूंची दोन मुलं रवी आणि धाकटी मुलगी अलका रत्नागिरीला खोली घेवून कॉलेजात शिकत होती. इथे ते नी बायको दोघंच समाईक घरात त्यांच्या वाटणीला आलेल्या मागिलदारच्या दोन पडव्यांमध्ये रहात. डोल्र्यात बर्व्यांकडे त्यांची बहिण रमा दिलेली. ते सात भाऊ एकत्र रहायचे. त्या खटल्यात रहाण्यापेक्षा खोली घेवून बिऱ्हाड केलं असतं तर मुलानाही अधेमधे येवून

जायला सोईचं होणार होतं. त्यामुळे उभयतानी कातवणचं घर बंद करून चालचलावू भांडीकुंडी घेवून डोल्र्यात बिऱ्हाड करून रहायचा बेत नक्की केला. दुसऱ्याच दिवशी दोघही जागा बघायला डोल्र्यात गेली. गावात ब्राह्मणांचा चाळीस उंबरा. सगळी घरं अजून नांदती असली तरी पाचसहा घरांमधली मुलं नोकरी धंद्याला मुंबई पुण्यात नी डोल्र्यात फक्त म्हातारे आईबाप.... त्यामुळे बिऱ्हाडाला जागेचा तोटा नव्हता. रमाच्या शेजारीच दामले काकूचे चौसोपी घर. तिचा मुलगा गुजरातेत नोकरीला. बापू मास्तर नी सुधा काकू च्या रमाशी गप्पा चाललेल्या असतानाच दामले काकू तिथे आल्या. विषय त्यांच्या कानावर पडताच त्या बोलल्या, "बरं झालं बाई मी आत्ता आल्ये ती.. मी सांगत्ये बापूमामा तुम्हाला, आता हजार पंधरा विषय नको, तुम्ही माझ्या घरात ऱ्हावा... फुटकी पै सुध्दा भाडं नको. पाच वर्सापुर्वीच माझ्या अरूणने पाषाणी भिंती घालून दुरुस्ती नी काय काय सुधारणा करून घेतल्यान आहेत. सगळं चांगलं आहे पण माणसांअभावी वाडा ओस पडलाहे. मी तर माणसाच्या आशेला आलेली आहे . तुम्ही आमच्या वाड्यात रहायला आलात तर उलट मला सोबत झाली म्हणून अरूणचाही घोर मिटेल."

बापू, सुधा काकू नी रमा आत्ते जागा बघायला गेली. दर्शनी ओसरी पडवी नी मुख्य दिंडी दरवाजाच्या बाजूलाच असलेल्या दरवाजातून आत गेल्यावर सलग तीन प्रशस्त खोल्या. पहिल्या नी तिसऱ्या खोलीतून राजांगणाच्या चौकात जायचा दरवाजा. डावी कडे देवघर नी त्याला लागून मूळघराचे स्वयंपाक घर. त्या लगत पुन्हा दोन खोल्या. नी मागच्या बाजूला पडवीत न्हाणीघर नी अंगणातच विहीर.ओसरी वरून जायचं दार असलेल्या दोन खोल्या पुरेशा होत्या. सुटीला मुलं आली तरी पुरेशी जागा होती बाहेर ओसरी पडवीत बसा उठायला मायंदळ जागा.... पडवीत मोठ्ठा झोपाळा...! मुलं जागा बघून खुश झाली असती. दामले काकू म्हणाल्या, "मला संगत सोबत

झाली .....कधितरी सणावारी अरुण नी त्याची बायको मुलं चार दिवस राहून जाणार.... दोनच कां तिन्ही खोल्या वापरात राहू देत तुमच्या."

बापू मास्तरानी न्यायच्या सामानाची बांधाबांध केली. कातवण हे जन्मगाव म्हणून हे घर म्हणायचं इतकच. भाऊ बंदकीत हिस्सेरशी प्रमाणे एक पडवी वाटणीला आली. एवढ्या कुचिंदर जागेत निर्वाह होणारा नव्हता.म्हणून जुन्या पडवीला जोडूनच जरा प्रशस्त पडवी काढून दोन खोल्या केलेल्या.चौघांचं मर्यादित कुटुंब असल्यामूळे अडचण भासली नाही इतकच. त्यामूळे आवरा आवरीचा तेगार झाला नाही. न्यायच्या सामानाचेही नेमके सहा सात बोजे झाले. गाडीरस्त्याने जायचे तर चाळीसेक मैलाचे मकाण. पण खाडीमार्गाने शिडाची होडी भरतीच्या ताणावर दीड-पावणेदोन तासात डोर्ल्याच्या जेटीवर पोचायची. त्यामुळे बापूनी त्यांचा विद्यार्थी मंग्या गाबीत, त्याची होडी ठरवली .जायच्या दिवशी द्वादशी होती म्हणजे नऊ वाजता सवारी. त्या आधी दोन तास होडी सोडली की भरतीच्या वेगावर वल्हवण्याची तकस न घेता डोर्ल्यात पोचता आलं असतं. तिथे उतरणावर चिरेबंदी जेटी ब्रिटिशांच्या काळात बांधलेली होती. तिथे खाडीचं पात्र भरपूर रुंद नी पाणीही खोल.बंदरासमोर मोठं जुवं म्हणजे बेट. त्याना डोर्ल्यात तालुका वसवायचा होता. पण त्याचवेळी महायुद्ध सुरू झालं नी सगळंच आटोपलं.

योजल्याप्रमाणे बापू मास्तर नी सुधा काकू डोर्ल्यात येऊन डेरेदाखल झाले. भाडं - मजूरी दाखल एक पै ही घ्यायला मंग्या तयार होईना. "गुरुजी, मी पाचवीत तुमच्या हाताखाली आस्ताना माजी फाटकी पाटलण बगल्यार तुमी माका नयो सदरोनी पाटलोण दिलास. मी सातवीत साळा सोडलय तवसर दरवर्साक कपडे नी पुस्तकां तुमी देय हुतास.... आज माजे दिवास चांगले ईले .... माज्या हाताबुडी चार तांडेल आसत ..... पन मूळ कसा इसरू? तुमी माका चार आणे द्येवा म्हंजे माजी लक्सुमी झाली आनी फुकट घितला ही म्हेरबानी तुमच्यार नुको." मास्तरांच्या नी सुधा काकूंच्या पायावर डोकं ठेवून मजूरीची

चवली त्यांच्या पायाला लावून मग आपल्या कपाळावर टेकवून रुमालाच्या शेवाला बांधून मंग्याने खिशात ठेवली. आलेल्या सहा सात जणाना रमाआत्तेने भरपेट कांदा पोहे नी रवा लाडू खायला घालून त्यांची रवानगी केली. बापू रहायला आले नी बर्व्यांकडच्या मुलामाणसांची दामल्यांकडे येतूक जातुक वाढली. रमाची प्रदिप नी उषा आणि तिच्या जावांची ही शाळकरी मुलं अभ्यासाला ओटीवर येवून बसायला लागली. रमाचा नवरा नाना, रोज संध्याकाळी दुकानातून येताना, रात्री जेवणं झाल्यावर गप्पाष्टकं मारायला यायचे.

नानांचा मोठा भाऊ मधुकाका ह्याने डोल्र्यात किराणा मालाचे दुकान चालू केलेले . त्यात नाना आणि धाकटा सदू यांची चार आणे भागिदारी होती. दुसऱ्या दोघांचे शेजारच्या शेर्पे गावात किराणा दुकान होते. दोन भाऊ मुंबईत नोकरीला होते. भातशेती, कडधान्य, नारळपोफळी नी अलिकडेच कलमांचे उत्पन्न सुरु झालेले. घरखर्च उभ्या राशीतून करून बाकीची रक्कम गावात रहाणारे पाच भाऊ समान वाटून घेत.बाकी प्रत्येकाचे व्यवहार स्वतंत्र होते. कामाच्या बाबतीत सुद्धा अगदी पूजेपासून ते स्वयंपाक पाणी, गुराढोरांचे गवत पाणी यांच्याही पाळया लावलेल्या होत्या. म्हणून खाटखूट न होता एकोपा टिकून होता.बायकांचेही हेवेदावे धुसफूस होत नव्हती. अणपूर,शेर्पे, कडावल, गावठण, जांबरूण या गावांच्या मध्यवर्ती डोर्ले.... तरळे राजापुर रस्ता डोर्ल्यातून जायचा. शिवाय खाडी मार्गे खाली विजयदुर्ग नी वरती खारेपाटणपर्यंत वहातूकीची सोय होती. बर्व्यांच्या घरापासून हाकेच्या अंतरावर बसस्टॉप. तिथे तर आजूबाजूच्या गावातल्या लोकांची कायम वर्दळ असायची. त्यामुळे किराणा दुकान एवढे होबेस चालायचे की, चार नोकर असूनही दुपारी संध्याकाळी सगळे टेकीला येत.

गप्पांच्या ओघात मास्तरानी नानाना सहज सुचवले," इथे खारेपाटण शिवाय जवळसार कुठे कौलाची वखार नाही. हा धंदा इथे जोसात होईल. तुम्ही

मनावर घ्या. एकतर माल नाशीवंत नाही. माल साठून राहिला तरी वर्षाला दर वाढतच जाणार नी विक्रीला पण काय तकस नाही. एक ऐरा गैरा नोकर असला तरी पुरे. मी पूर्वी विजयदुर्गला जांभेकरांच्या पेढीवर असताना अनुभव घेतलेला आहे. या धंद्यात रुपयाला चार ते सहा आणे नफा मिळतो. कारण एकदा माल नीट रचून ठेवला की मग इतर उस्तवारी नी खर्च नसतो." नानाना किराणा दुकानात दोन आणे भागीत फार मोठी मिळकत नव्हती. काहीतरी धंदा उद्योग सुरु करायचा त्यांचा मानस होताच. झालेलं बोलणं त्यानी आत्तेच्या कानावर घातलं. त्यांचा पक्का विचार झाला. रमा आत्तेने एक सुचना केली की, ते व्यवहारात जरा ढिसाळ असल्यामूळे त्यानी बापूंशी भागिदारीत हा धंदा करावा. त्यांची साताठ वर्ष नोकरी आहे. मग तेही रिकामेच असणार. तोपर्यंत धंद्यातही जम बसलेला असेल. तेंव्हा पुढच्या धोरणाने त्यानीही भागिदारी घ्यायला हरकत नाही. दुसऱ्या दिवशी तिने हा विचार बापूनाही पटवला नी दोघानी आठ आठ आणे भागीत कौलाची वखार सुरु करायचा बेत पक्का केला. मात्र लोकाच्या डोळ्यावर यायला नको म्हणून बापू पेन्शनीत जाईपर्यंत त्यांचे नाव फोडायचे नाही असे ठरले.

लगतच्या शनिवारीच बापू मास्तर नानाना घेवून विजयदूर्गला बाळुकाका जांभेकराना भेटायला गेले. भेटीचा हेतू कळल्यावर त्यानी कौलाच्या धंधातली भगवद्गीताच विषद केली. "सगळ्या धंद्यात कौलाचा धंदा हा जोखमीचा. धंदा म्हटला की त्यात उधारी बूड ही आलीच. इतर धंद्यात सर्वसाधारण परिस्थितीत उधारी ही सहा महिने वर्ष दीड वर्ष एवढ्या मुदतीत वसूल व्हायची शक्यता तरीअसते. पण कौलाच्या धंद्यात हे गणित वेगळे असते. घर बांधणीत अगदी शेवटची खरेदी ही कौलाची. एकजात सगळे घर बांधणारे अननुभवी असतात. घर बघावे बांधून अशी म्हण आहे. आरंभ केल्यापासून तो काम पुर्तावे पावत किती खर्च होईल याचा अचूक नी नेमका अंदाज ब्रह्मदेवाच्या बापालाही सांगता येत नाही. जरा चार पैसे हातात आले

की माणूस घर बांधायचे बेत करतो. नियोजीत खर्च नी आपली कुवत याचा ताळमेळ न घालता हा वेव्हार करणारे मग आरंभा पासून प्रत्येक कामात ज्याला त्याला टोप्या घालतात नी यात शेवटची टोपी कौलवाल्याला.”

“घरबांधणीत सगळेच अंदाज चुकतात नी वाढता वाढता वाढे असे होत जावून माणूस कफल्लक अवस्थेत कौलवाल्याकडे जातो. आतापर्यंत आलेल्या नानाविध अनुभवातून तावून सुलाखून तो पक्का शहाणा झालेला नी निर्ढावलेला असतो. येनकेन हर प्रकारेण कौलवाल्याला मथवून आपला कार्य भाग साधला की काखा वर करायला मोकळा! घर हा विषयच असा आहे की यात झालेला खर्च म्हणजे अक्षरश: खाई असते. झालेला खर्च वसूल करून देणारी ही गुंतवणूक नव्हे. त्यामुळे घरापायी कर्जबाजारी होणारा त्याच्या सगळ्या देणेकऱ्याना कमजास्त प्रमाणात बुडवतोच नी यातही मोठा फटका बसतो तो कौलवाल्याला. कारण थोडीफार वसूली होऊन भागत नाही. शंभर रुपये मजुरीवाल्याला पन्नास मिळाले तरी तो तगतो पण कौलवाला मात्र मरतो. रुपयावर रुपया नफा ठेवून काय कौलाचा धंदा करता येत नाही. रुपया मुद्दल असेल नी त्यातले साठ पैसे किंवा ऐंशी पैसे वसूल झाले , तरीही भागत नाही.... अशी दोनतीन गिऱ्हाईके भेटली की धंदेवाला रसातळाला गेलाच समजा! ”

“काय काय गिऱ्हाईके अशी बिलंदर की रक्ताचा थेंब न येवू देता अच्चळ काळिज कापून नेतिल. आठ दिवसाने कौलं न्यायची आहेत तर आज तुमच्याकडे येणार. दोनशे रुपयाचा माल न्यायचा असेल तर पंचवीस पन्नास आगावू हातावर टेकवणार. मिठ्ठासपणे सांगणार.... भाऊनु कायहा ह्ये कामदार डोक्या फिरवून टाकणार ..... आपूण हातात आसले काय देवन् मोकळे नी आयत्या येळी मुद्याच्या टायमाक खिसो रिक्यामो. त्ये पेक्षा आज हातात आसताना लय थोडे देवन ठेवलेले आसलेना की दोगवांकव बरां. मग तो माणूस किंवा त्याचा भाऊ पोरगा कोणतरी आठ दिवसानी गाडीघोडा घेवूनच येणार. माल उचलणार, नी चार दिवसानी उरलेली रक्कम पोच करायचा वायदा करून

निघून जाणार, बरं आगावू पैसे घेतलेले असल्या मूळे तुम्हालाही भिड पडते. त्याचे चार दिवस कधिच संपत नाहीत नी उधारी कालत्रयी वसूल होत नाही. उधारी फेडणारा सुद्धा ज्या क्रमाने उधारी ठेवीत गेला त्या क्रमाने फेडित जाणार.... सगळयात शेवटचा नंबर कौल वाल्याचा! म्हणून जर या धंद्यात तुम्ही पडणारच तर सग़ळे धोके लक्षात घेवून कोनाच्या भुलवणीला बळी न पडता ठाम रहायला हवे."

" आलेला कोणीही असो तो समोर नोटा मोजून देईल तेंव्हाच त्याच्यावर विश्वास ठेवायचा. बापूस पाव्हणा आला म्हणून रेडा दुभवता येत नाही. कौलाचे गिऱ्हाईक म्हणजे चार आठ आण्याचा वेव्हार नव्हे. चारआठ आण्याचा किराणा नेलान्.... दिलेन तर दिलेन....बुडवलेन तर बुडवलेन असं म्हणून सोडून देण्याएवढा हा वेव्हार किरकोळ नव्हे.....! तजून रजून वागलेत तर या धंद्यात चार पैसे चटकन हातात येतात . प्रचलित बाजार रहाटीत कौलाच्या धंद्यात रुपयाला सहा आणे सुटतात. ठोक व्यापारी तुम्हाला निम्मे मुद्दलात सहा महिने मुदतीवर माल देतो. फूट तूट तोच सोसतो. नग एकदा तुम्ही मोजून घेतलेत की मग तुमची जबाबदारी नी जोखीम सुरू. तो वसूलीला येईल त्यावेळी पैसे तुमच्याकडे तयार असले पाहिजेत ...त्याला खाड पट्ट्या पासून वलाटीपर्यंत वसूली करीत फिरून रक्कम घेवून मंगलोर गाठायचे असते. मी पाच वर्षामागेच हा धंदा बंद केला. आमची वखार आता झरकर चालवतो. तुम्ही महिना भरात धंदा सुरु करणार तर आज तुम्हाला त्याच्या मार्फतीनच माल उचलावा लागणार. तो एक आणा कमिशन-दहा रुपयामागे खाणार. ठोक व्यापारी येईल तेंव्हा भेटून मी त्याची नी तुमची भेट घालून देईन. मग तुम्हाला मधली दलाली तरी द्यायला नको. "

" सुरवातीला तुम्ही अर्धं तारू म्हणजे दहा हजार एवढा तरी माल घेणार, त्याचे तीन हजार रुपये होतात. तुम्हाला निम्मे रोख द्यायला हवे म्हणजे दीड हजारात धंदा सुरु करता येतो. सगळा वेव्हार रोखीन केलात तर माल उठल्यावर

तुम्हाला अकराशे पावत फायदा होईल , दलालाला कमिशन अठरा रुपये मिळेल. हल्ली काय मी तुमच्या डोर्लेभागात फिरकलेला नाय पण माझा आपला अंदाज...... महिनाभरात तुमचा माल उठेल. यंदा अजून पाच म्हयने सीझन आहे.... या मोसमात तुम्ही दहाएक हजार कमावाल..... पण एकच......धंदा पहिल्या मोसमात तरी रोखी शिवाय करू नका. एखाद दुसरे गिऱ्हाईक गेले तरी तुमच्या धंद्यावर फारसा परिणाम नाय होणार .... तो ज्याच्याकडे जाणार तो अशी दोन-तीनपेक्षा जादा गिऱ्हाईके झेपवू शकत नाही. नी तीन गिऱ्हाईके तुटली म्हणून खण्डीच्या गोणाला पायलीची तूट येत नाय कधि....मी पंचवीस वर्षं हा धंदा केला. किराणा मालाच्या धंद्यात समोरचा बुडवणार आहे हे दिसत असुनही मी कैक लोकाना बिनदिक्कत माल दिला. पण तो फटका भुई सपाट करणारा नव्हता. काही गिऱ्हाईके तर अशी खट की ती सामान घेवून गेल्यावर आमचे दिवाणजी चेष्टेने म्हणायचे की, ही उधारी मी मांडूनही ठेवीत नाही. जी वसूल होण्याची शक्यता आहे ती मांडून ठेवायची... ही दिली तेव्हाच बुडाली मग उगाच लिहायचे तरी कष्ट कशाला? पण कौलाच्या धंधात सपशेल बुडवणारा मला भेटूच शकला नाही . यात कायते समजा नी तसे वागा . बाकी इतर ग़ोष्टी बापू तुम्हाला सांगेलच. त्याच्या सल्ल्याने वागा, तुमचं कल्याणच होईल."

बापू मास्तरानी बाळुकाकांच्या पायाला स्पर्श करून हात जोडले......."बाळु काका तुमचा सल्ला म्हणजे ब्रह्मवाक्य! नी तुम्ही जो अंदाज केलात तोही माझ्या अंदाजाशी तंतोतंत जुळतो. ह्या मोसमात पन्नासेक हजार कौल सहज उठेल.... आमच्या गावात आज घडीला सहा घरांची कामे सुरु झालीहेत कमी धरली तरी सहा अडजे पंधरा हजार कौलाचे गिऱ्हाईक आज गावातच मिळणारे आहे!" बापू मास्तरांचे बोलणे ऐकल्यावर तर नाना अवाक् झाले. जेवण-खाण झाल्यावर बाळूकाका म्हणाले,"तुमचा बेत नक्की असेल तर मला आठवडाभरात निरोप धाडा.... कदाचित या पंधरा वीस दिवसात

कौलाचे तारू यायचे असेल तर मी त्याची तुमच्याशी गाठ घालून देईन म्हणजे तुमचे कमिशन वाचेल तीन साडेतीनशे म्हणजे लहान-सहान रक्कम नव्हे. नी माझे म्हणणे आहे की उडी मारणारच तर मग अर्धवट तरी कशाला? तुम्ही पुरे तारू उतरून घ्या.माल ऱ्हाणार नाय हो.कौले ती. नासणार कुसणार थोडीच? हवेतर दोन हजार मी तुम्हाला बीनव्याजू देतो.... हे बर्वे तुझे पाव्हणे आहेत पण माझ्या परिचयाचे नाहीत. तरीपण तू आलास ....तुझ्या भरवशावर मी बिनघोर शब्द दिला म्हणजे दिला! मी तुला पैसे देणार बर्व्यांना नाही. बरें हे म्हणजे डोर्ल्याचे सात बर्वे म्हणतात त्यांच्यापैकीच काय रे? " त्यावर बापू म्हणाले ," हो, हे सातां पैकी पाच नंबरचे.." नाना म्हणाले, " माझे मेव्हणे म्हणून नाही सांगत, पण बापूंवर आमचा नितांत विश्वास आहे. त्यांचा अंदाज किती अचूक आहे याची प्रचीती तुमचं बोलणं ऐकल्यावर मला आली. खरे तर या धंद्यात त्यानी आठ आणे भागिदारी घ्यावी असे माझे म्हणणे आहे... माझ्या हिश्शाची रक्कम माझ्याकडे आहे बापूना तुम्ही शब्द दिला अहात , आता काय अडचण नाही" नानानी विषय फोडल्यामुळे बापूंची तारांबळ उडाली. पण सावरून घेत त्यानी होकार दिल्याचे नाटक केले नी आपण नोकरदार असल्यामुळे तूर्त ही बाब आपल्यातच असूदे," असे सांगितले.

"वखारीला जेटीच्या जवळच कायम स्वरूपी जागा असली तर बरे होईल.." बापू म्हणाले त्यावर नाना म्हणाले , "दुसऱ्याकडे सोधायला नको तिथे दामले काकूंचेच मरड आहे .चार पायरीची कलमे दोन फणसाची झाडे आहेत बाकी मातब्बर काय नाय... तुम्हीच शब्द टाका ." त्याच दिवशी रात्री नाना गप्पा मारायला आलेले असताना आपण नी नाना भागीदारीत कौलाचा धंदा सुरु करतोय हा विषय फोडून बापूनी दामलेकाकूना जागेबद्दल विचारले. "नायतरी ते मरड पडूनच आहे. नी तुम्हाला दोन भांगे जागा लागणार ....तुम्ही साफसफाई नी बंदस्ती करून घ्या . मी हा विषय अरूणच्या कानावर घालत्ये , व्यवहाराचे तो बोलेल तसे होईल . तुम्ही आजच त्याला पत्र लिहा. मी सही

करत्ये नी उद्या रजिस्टर करा. ” दामलेकाकू म्हणाल्या. मग लगेच बापूनी अरुणला पत्र लिहीले. नाना आणि रमा घरी जायला उठली तेंव्हा काकू म्हणाल्या, “अरुण माझ्या शब्दा बाहेर नाही. विषय त्याच्या कानावर जातोच आहे. तुम्हाला बेणणी, बंदस्ती काय करायची असेल तर खुशाल काम सुरु करा. तुम्ही का मला परके आहात?” बाहेर पडता पडता रमा म्हणाली, “हा विषय सुरू झाल्यापासून सगळ्या गोष्टी विना अडचण जुळून येताहेत हा शुभ संकेतआहे.... बापू नी सुधा वहिनी इथे आली ती आमच्या भाग्यावर!”

बाळूकाका सुरुवातीला सहाय्य करणार म्हणाले तरी आपण त्यांचा गैरफायदा न घेता दोन हजार रुपये उभे करायलाच हवे . घरात दोनशेची भर झाली असती . शिक्षक पतपेढीकडून हजारभर कर्जावू नी हजार प्रॉव्हिडंट फंडातून उचल करून दोन हजाराची जम होणारी होती. त्या कामासाठी बापू मास्तर रत्नागिरीला गेले. शिक्षण विभागात त्यांचे जुने स्नेही शेवरे आता हेडक्लार्क च्या पदापर्यंत पोहोचलेले.....वीस वर्षं रत्नगिरीला काढूनही त्यांचा मालवणी बाणा शाबूत राहिलेला. “येवा हेडगुरुजी, म्हटला जुनी दोस्तदारी आता ईसारलास की काय....” त्यावर पिशवीतून रत्तलभर आमसोलाची पुडी काढून “कसे इसारनार? ही वस्तू नाय तर तुमच्या समोर उबे दुकु करुचास नाय आमका” बापू म्हणाले. तेव्हा हसत, “हां, ह्यां बरोबर कामा व्हती जाती काय तां व्हयत. आमसोला ह्यो आमचे हक हा.... चाय घेवया काय घोट घोट.”

कामाचं बोलल्यावर, हसत हसत शेवरे म्हणाले, “काय हो,

फंडात्सून उचल घ्येतास ता काय चेडवाचा लगिन बिगिन काडलास की काय? भाटकर... हेड गुरुजींकडून फंडातून उचल घ्यायचा अर्ज भरून घ्या.” मग काहीतरी अन्यकारण सांगून त्यानी भाटकरांकडून अर्ज घेवून तो भरून शेवरेंकडे दिला. त्यानी वाचून शिफारस लिहून सही करून मग तो ईन वर्ड करून घ्यायला पाठवला नी चार दिवसात रक्कम मिळेल म्हणून सांगितल. तिथून लगेच ते गाडी तळावर शिक्षक पतपेढीत गेले. मुख्याध्यापक नी शाळेचा

शिक्का सोबत असल्यामुळे तिथेही अर्ध्या तासत काम मार्गी लागलं नी मग ते मधल्या आळीत खेरांच्या वाड्यात मुलांच्या खोलीवर गेले. अलका वाचन करीत बसलेली होती. रवी सायन्सला असल्यामुळे त्याला पाच वाजेपर्यंत प्रॅक्टिकल साठी थांबावं लागे. त्यानी पिशवीतून दशम्यांची पुडी काढून दिली ."ह्या दशम्या आहेत ,पण कामांची खोटी नको म्हणून खात राहिलो नाही. तू पोळया केल्या असशील ना? त्या दे मला. "अलकाने स्टोव्ह पेटवून पोळया नी भाजी गरम करून दिली. त्यानी दोन पोळया खाल्ल्या नी, पुरे म्हटलं. मग ते जरा आडवे झाले.

"अरे बापू कधि आले?" रवीच्या आवाजाने बापूना जाग आली. तो पाय धूवून आल्या आल्या तिने दशम्या नी लसणीची चटणी वाढून "मी रात्री जेवताना खाणारेय... " म्हणत भावाच्या पुढे ताटली ठेवली . रवी खायला लागला आणि बापूनी बदली पासून तो दामले काकूंकडे बिऱ्हाड करी पर्यंत सगळं सविस्तर सांगितलं. त्यानी आत्ते कडे गेलेली असताना दामल्यांचावाडा बघितलेला होता.बापूना मुख्याध्यापक पद मिळालं याचा मुलाना आनंद झालेला होता. "मी दोन दिवस येवू शकले असते पण रवीच्या मॅथ्सच्या सरांनी रविवारी क्लास ठेवलेनी ते बुडवून यायच तरी पंचाईत नी त्याला एकटा टाकून येणं मलाचबरं वाटलं नाही ... आता पंधरा ऑक्टोबरला सुटी लागली की तिघही एकदम येवू." अलका म्हणाली. आज बापूंच्या तोंडून सगळा तपशिल ऐकताना मुलं अगदी रंगून गेली. मग हळू हळू बापूनी कौलाच्या वखारीचा विषय सांगितला. मुलाना तो पसंत पडला. रवी बोलला, "मी सांगतो बापू, नानांचा खोती कारभार.... ते बडेजावात संपले. तेवढं मात्र बघा. नी आधी लोक कुठून आणीत होते तेव्हा गाडी खर्च व्हायचा तो आता कमी होणार तेवढे पैसे वाढवून तुम्ही दर सांगा." मग अलकाही बोलली,"नानांचा म्हणजे होतए जातए असा कारभार, त्यांच्या भलुल्या करील त्याची कुवत न बघता ते उधारी देवून

मोकळे होतील. त्यांच्यावर जरा चाप ठेवा.” बापू मनात म्हणाले की, आता आपण समजत होतो तेवढी मुलं लहान राहिलेली नाहीत.

आठवडाभराने रक्कमेची जम झाली , नी दोन दिवसानी अकस्मात बाळूकाकांची चिठ्ठी घेवून स्पेशल होडी करून माणूस आला. कौलाचे तारू आलेले होते म्हणून त्यानी ताबडतोब भेटायला बोलावले होते. जांभेकरानी स्पेशल होडी पाठवलेली असल्यामुळे बोलाचाली करून निघायला अवधी मिळाला. त्यानी नानांची भेट घेतली. दोघांची चर्चा झाली. कदाचित तारूवाला लगेच येणार असेल तरी नानांची तयारी होती. माल उतरायला गडी लागले तरी माणसं जोडलेली होती. फक्त बंदरावरून यायची वाट जरा नीट करायची होती. “मी पैसे आणून देवू का? मी आलो तर लोकांच्या उगाच चर्चा नी तर्क-कुतर्क चालू व्हायचे. तेंव्हा तुम्ही एकटेच जावा . मी देवाला नारळ ठेवून सांगणं करून ठेवतो नी वाट सारखी करून घेतो. तारू माल घेवून ये ईल पण काय सांगता येत नाय.” नाना म्हणाले. बापूंचीही अशीच अटकळ होती . पैसे सोबत नेण्याची गरज नव्हती. मास्तर शाळेत जावून संध्याकाळची नी कदाचित थांबावे लागले तर दुसरे दिवसाचीही रजा चिठ्ठी देवून आले . मास्तर घरी गेले तेंव्हा रोजची देवपुजा करणारा दत्तंभट आलेला होता. गंगा काकूचे रांधप अजून झालेले नव्हते. त्यानी रमाला बोलावून घेतले. त्यांचे मोठे खटले, तेंव्हा भाजी नी भाकऱ्या तयार झालेल्या होत्या. कशाला काय याची शब्दानेही चौकशी न करता ती तिघांसाठी डबे भरून आणायला गेली. पंधरा मिनीटात पूजा करून निघून गेला नी केळीच्या पानात बांधून भाकऱ्या नी भाजीचा डबा घेवून रमा आली. तिने डोके चालवून फिरकीच्या झाकणाचा पाण्याचा गडवाही आणलेला. नक्की नाही पण कदाचित तारू येण्याची शक्यता आहे हे बापू बोलले. दामले काकूनाही तशी कल्पना देवून तिला नमस्कार करून बापू बाहेर पडले. हाताने थांबायची खूण करीत ती आत गेली. देवाला नारळ ठेवला नी

अकरा रुपये बापूंच्या हातावर ठेवून "ही तुम्हाला धंद्यासाठी भवानी, तुमच्या उदिमाची भरभराट होवूदे! "असा तोंडभर आशिर्वाद दिला.

बापू नी गडी जेटीवर गेले तेंव्हा नाना गड्याना घेवून मरडात जायची वाट बेणीत होते. होडीवाला लांब जावून मासे पागीत होता. बापू नाना ह्यानी हातातले फडकी फलकारीत " होय्यत्त होय्यत्त" असे कुकारे मारले. होडीवाल्याने "ईलय ईलय" असं म्हणत पाग गुंडाळायला सुरवात केली. बापु नी गडी होडीत चढले आणि होडी सुटली. सुकतीच्या ताणावर फ़ार व्हल्हवणी न करता होडी सरसरत निघाली. होडी घोडे पोईला पोचली तेव्हा सुकतीचा जोर वाढलेला असल्यामुळे मध्याभागी दहा वाव खोल भाग वगळता दोन्ही तडीना भाट पडलेली होती. हय एवडी भाट पडता ह्या माका म्ह्यायत नवता, मद भागात कितीसा पाणी असात रे? बापूनी विचारले. होडीवाल्याने उंडलीवर आडवी टाकलेली सर्वात लांब काठी ओढली. ही ताज (काठी) सात पुरुस (सुमारे पस्तीस फ़ूट) आशे..... असं म्हणत ताज पाण्यात सोडली हातलांब करून पाण्यात ओठंगून अंदाजघेत, "छया ठाव लागना नाय .... गडापास्ना वर खारेपाटण बंदरा पावत जोरगतीची सुकती आसली तरी केवरा पन मोटा जहाज नी तारू जावक् शकता. फक्कस प्याशींदर न्हेनारी मोटी बोट घोडेपोय जवल नी वर मणच्या जवल जुवा हाय तिते फाडा अवरूद हाय म्हनून अडाकनार. "

सूर्य माथ्यावर आलेला होता नी अर्धं मकण संपलेले होतं म्हणताना भाजी भाकरी खायला होडी खळवायला सांगितली. शिदोरी सोडून वर अच्चळ ठेवलेले केळीचे फाळके मांडून बापूनी तळची गठळी खोलली. आठ भाकऱ्या , मोठ्ठा वाडगा भर फणसाच्या आठळा घातलेली गावठी लाल चवळीची उसळ नी बचकभर आंब्याचं लोणचं होतं. " गुर्जी, लोन्चा तुमी दोघानी घेवा नी उरलेला माला द्येवा.... माजी मजवेली मागारीण (त्याच्या तीन बायका ...मोठी मधली नी धाकटी ) पोटुशी हाये त्येला लोन्चा खायन सारा झाल्ला आशे." त्यानी दोघांच्या फाळक्यावर दोन दोन भाकऱ्या उघडून ठेवून दोन-दोन

लोणचाची फोडं नी बचकभर भाजी घालून आपला फाळका लावला. भाकऱ्या चाचपून बघितल्या एका भाकरीच्या दुडतीत मुटक्या एवढा लोण्याचा गोळा होता. दोघानी लोणी नको म्हटलं. “ तुमका नाय झ्येपला तर मी न्हेन, माजी न्हानी जोरू लोनीधय ह्येला लय हावरी. ” होडीवाला म्हणाला. बापूनी स्वत:ला दोन भाकऱ्या , उसळ नी निम्मे लोणी घेवून ते बोलले, “मला एवढं पुरे , तुम्हाला घ्या नी उरलेलं होडीवाला बांधून न्हेईल”. गड्याने एक भाकरीनी थोडीशी उसळ वाढायला संगितली. भारी खावून खाऱ्या पाण्याने हात धुतल्यावर बापूनी गडवा खोलला. थोडं पाणी कुळच्यात घेवून हातावर घातलं नी वरुन पाणी पिवून गडवा दोघांकडे परत दिला . होडीवाल्याने शिदोरी आवरून शिस्तीत बांधून पायागती माशाच्या टोपलीत ठेवली. होडी विजयदुर्गला पोचेतो एक वाजायचा सुमार झालेला वाटला.

बंदरात कौलाचे तारू नांगरलेले दिसले. होडीतून उतरून दोघेही जांभेकरांकडे गेले. बापूंचा अंदाज खरा ठरला. नानानी बापू भेटून गेल्यावर बाळुकाकानी मच्छीमाराना बोलून ठेवले होते. कौलाचे तारू लांबून दिसल्यावर ते बंदरात येण्या आधीच बाळुकाकांचा निरोप पोच झाला. तेंव्हा तारूवाला झरकराच्या वखारीकडे न जाता जांभेकरांकडे आला. तारूवाला जेवून झाल्यावर काकांच्या ओसरीवर घोरत पडलेला होता. “ गिऱ्हाईक नवीन नी पुरा माल घेणारं म्हणून हजारी सव्वा रुपया कमी दर ठरवला आहे. मागच्या खेपी कोन्यांचा विषय बोलायचा राहिला. ह्याने हजार कोने आणलेले आहेत. नगी दोन आणे दर आहे. मोसमात अध्ये-मध्ये कोने आणाताताच असं नाही. तेंव्हा ते पण सगळेच उतरून घ्या. रात्री नऊ नंतर भरतीच्या ताणावर तुम्ही सुटा.” मग त्यानी कपाट उघडून पैसे आणले. आपल्याकडे भर आहे, मग लागले तर घेईन असं बापू म्हणाले.“हे बघ, धंद्यात पैसा कमी असला तर करटीतलं लोणचं पुरवून खायचं अशी गत होत्ये....माझी मुलगी नी मुलगा मुंबईत आहेत.मुलीच्या नवऱ्याचं गिरगावात हटेल आहे. मुलगा हायकोर्टात

वकिली करतो. दोघांकडे लोखंडी कपाटं भरून नोटांच्या थड्या लावलेल्या आहेत. ते ह्या माझ्या पैशावर थुकायचे पण नाय.... तू झालं तरी पगारावर कर्ज व्याम काढून धीर करणार नी हाप्ते सुरु झाले की रोज कसं भागणार ह्या चिंतेत पिचत राहणार काळजीत! हे अडीच हजार आहेत, मला पाच वर्षांनी सावकाश फक्त मुद्दल परत दे. मी तोपर्यंत मरत नाही नी तू ही आज आहे त्या हलाखीत रहायचा नाहीस , माझा पैसा कारणी लागला ह्यात मला आनंद. धंद्याचं काय तानमान ते मधेमधे मला कळव.... ते माझं व्याज. ”



चारच्या दरम्याने तारूवाला उठला. बाळूकाकानी त्याच्या समोर दरा-दामाची उजळणी केली. कानडी असूनही कायम इकडच्या भागात फिरल्यामुळे त्याला मराठी यायचे. काळवं पडण्या आधीच बापूनी पाण्याचा गडवा भरून

घेतला नी तारूवाल्यासोबत बाहेर पडले. वाटेत लळताच्या हॉटेलातून चारप्लेट गरम कांदा भजी नी दोन रवा लाडू बांधून घेतले. बंदरावर पोचल्यावर होडीकरून दोघेही तरवावर गेले. बापूनी कौलं-कोने उचलून वाजवून बघितले. त्यावेळी बी.पिंटो, बंगलोर, मंगलोर हे तीन छाप चालायचे. बहुतेकजण थोडे हलके, कमी दराचे पिंटो-बंगलोर घेत. हा माल जरा उजवा 'मंगलोर' होता. तारुवाल्याने मुंड्याच्या खिशातून साखळीवालं गोल डबी सारख़ं घड्याळ काढलंनी 'इंटू' म्हटलं..... बापूंचा प्रश्नार्थक चेहेरा बघितल्यावर हसून "आठ्ठ वाजला.... आजून येक घंटा लागतं बगा..." तारवावर दोन कंदिल लावून ठेवलेले.चांदण्याच्या उजेडात सगळं धूसर दिसायचं, मधूनच किल्ल्यावरच्या दीपगृहाचा झोत फिरायचा. क्षितिजावर माडबनच्या बत्तीचा झोत दिसायचा.

तांडेल जेवायला बसले. वीतभर रुंद नी मुटकावर उंच जर्मनच्या ताटलीत चेपलेला भाताचा ढीग नी त्यावर ओतलेल्या कालवणात बोट-बोट लांबीचे मासे.... बापुनी बचकभर भजी ठेवून बाकीची तांडेलाना दिली नी ते बाजूला जाऊन बसले. तांडेल जेवून तिथेच आडवे झाल्यावर बापूनी पुडी सोडून एक भजं पाण्यात टाकलं. भजी संपल्यावर त्यानी एक लाडू खावून वर पाणी प्यालं, नी ग्रह तारे बघीत राहिले . वेळेचा नक्की अंदाज लागत नव्हता पण तासभर होवून गेलेला असावा..... थंडगार मतलय सुटली नी चांगली तरतरी वाटायला लागली. गजर व्हावा तसे खलाशी उठून बसले. तारूवाल्याने घड्याळ बघित म्हटलं , 'ओंबतु' बापूनी अंदाजाने ओळखलं नी म्हटलं,'नऊ वाजले?' त्याने होकारार्थी मान हलवली. तांडेलानी नांगर वर ओढून घेवून शीड सोडलं नी लांब दांड्याची वल्ही मारायची सुरुवात झाली. तारू खाडीच्या नस्ताच्या रोखाने सरकायला लागलं. मध्ये मध्ये वारा साधण्यासाठी शीडाची दिशा बदलली जायची. थोडा वेळ गेला नी मग तारवाने चांगलाच वेग घेतल्याचं जाणवल

आता त्यांचा कंटाळा कुठच्या कुठे पळाला. तारुवाल्याने घड्याळ बघित म्हटल ‘अत्तू...’ म्हंजे दहा वाजून ग़ेले हे बापूनी ताडलं . .काळोखामुळे कुठे आलो काय पत्ता लागेना.... ‘‘अन्नदु ...मालक अकरा वाजलं की ...त्ये तुमचं जेटी येतय् की ईतक्यात्त ....” तारूवाला म्हणाला, नी काळेखात जुवं नी जेटीची धूसर कड बापूनी ओळखली. तारवाचं शीड पाडून खाली उतरण्यात आलं.जेटी कडून बॅटरीचा झोत हलवताना उमगला.... म्हंजे बहुतेक नाना अंदाज घ्यायला आलेले दिसतात बहुधा..... त्यांच्या मनात आलं नी त्याच वेळी... “होय्यत्त होय्यत्त ” कुकारे ऐकू आले. मग त्यानीही “ होय्यत्त... होय्यत्त ” करीत प्रतिसाद दिला . आता जेटीवरच्या माणसांच्या धूसर आकृत्या दिसायला लागल्या. मिनिटाभरातच दोनपेट्रोमॅक्स चा झळझळीत उजेड दिसायला लागला. खलाशानी ताजी टेकवीत तारू अच्चळ जेटीच्या कडेला आडवं लावलं नी वाले घेवून जेटीवर उड्या टाकल्या.जेटीच्या कडेवर ब्रिटिशानी किल्ल्या वरून आणलेल्या आठ तोफ़ा अंतरा-अंतरावर उलट्या पुरलेल्या होत्या. त्याना दोन टोकाच्या दोन वाल्यांचे वेढे देवून तारू स्थिर करून नांगर टाकला.“आमी झोपती.... सक्काळि माल उतरायचे बगा.” तारूवाला म्हणाला. नाना आणि दोन गडी तारवात चढले. “आम्ही मुहूर्ताची अकरा कौलं घेतो ” म्हणत अकरा कौलं गड्यांकडे दिली.

बापूंच्या हातातला गडवा पिशवी गड्यानी घेतली. वाटेने जाताना बापू सांगायला लागले , “ तुम्ही अगदी बोलावल्या सारखे बरे आलात.....अहो कोन्यांचा विषय आपल्या लक्षातच आला नव्हता.... पण काळजी नको हजार कोना आलेला आहे त्यावर “भरतीचा अंदाज असल्यामुळे नऊ वाजता सवारी लागल्या पासून गडी पाळतीवरच होते. दहा मिनिटापूर्वी तरवावरचे दिवे दिसले . ते जवळ जवळ यायला लागल्यावर मला वर्दी मिळाली नी मी बॅटरी घेवून खाली आलो.मगाशी मी तारवावर चढलो तेव्हा मला कोने उमगले नाय काळोखात...” नाना म्हणाले. “सगळे घरी आले. उद्या बारा गडी सांगितलेहेत,

कोनेनी आहेत ना? अणखी माणसे सांगू का ?" नानानी विचारलेनी . त्यावर बापू म्हणाले, " होय , दहा बारा बायल माणसे येवू देत, काम वेळेवर आरेखेल नी आपल्यालाही अंदाज येईल...." कौलाची एक जुवळी नानानी देवापुढे नेऊन ठेवलेनी. रमा, सुधाकाकू ,दामलेकाकू सगळयानी कौलं हातात घेवून उलट सुलट निरख़ून वाजवून बघितली. " बापू तू जेवायचा असशील ना?"रमाने विचारलं. "तशी चवडाभर भजी नी एक लाडू खाल्ला होता... पण जाऊंदे अकरा वाजले आता उद्या सकाळी उठल्यावर बघुया..." बापू उत्तरले.

सगळीच झोपेच्या तयारीला लागली. तारू कधि येईल भरवसा नव्हता म्हणून , रात्री विरता जेटीवर जावं लागल तर घरच्याना तेगार नको म्हणून नाना नी रमा इकडेच झोपायाला आलेली. कंदिल बारीक करून उशागती ठेवून सगळी आडवी झाली . भिणभिणताना माणसांची कुलकुल आयकून सगळे उठून बसले . गडी पैरी सांगी प्रमाणे वेळेत हजर झालेली. "तुमी दोन कळशो पानी नी दोन तांबये घेवा नी होवा फुडे, आमी येतावच मागना." नानानी संगितल्यावर सुधाकाकूने रिकाम्या कळशानी तांब्ये आणून विहीरीवर भरून न्यायला संगितल, सगळी जेटीकडे निघाली. बापू म्हणाले, "आपणही मशेरी लावीत खालीच जाऊया. त्यांचं काम सुरु करून देवून मग चहा घ्यायला येवूया. कौलं डाळायचं काम त्यांचे खलाशी करतील. जरा चुक झालतर सगळा थप कोसळेल .एकदा माहिती झाली की मग आमचे गडी करतील. मी आज आधी थांबत नाय. म्हणजे धंदा तुमचा आहे माझा काय संबंध नाय हे पटेल लोकाना, मी शाळेतून आल्यावर चक्कर करीन."

तारवावरचे दोघे तांडेल कौलं चढावायला थांबले. चौघे थप लावायच्या कामाला गेले. बापयाना पंधरा आणि बायल माणसाना दहा कौलं चढवून खेपा सुरु झाल्या. मरडातला जागा चांगला सवथळ करून दगड=गोटा विरलल्यामुळे डाळपाचं काम सोपं नी घट-मुट झालं. "थप पन्नासचा लावा जादा उंच नको." मग नानांकडे निर्देश करीत बापू म्हणाले , "हे मालक

नानाशेठ, तुमचं नाव?” “रायण्णा, रामराम नाना शेठ, म्हाल येक्क नंबर बघा... सगळा ठपा सारका राहतो बगा..मंग हिसाब करायला तकलिप ऱ्हात्त न्हाई ...तुमी कोन म्हनायच?” बापू म्हणाले, “मी मास्तर आहे, नी शेठचा पावणा त्यांचा हिशोब माझ्याकडे ऱ्हातो. हे काम कधी पुरे होईल काय अंदाज? ” रायण्णा बोलले,“मदी जेवायला दोन तास सोडल तर अंदाज संद्याकाळला पाच घंटे टाईमला संपतो बगा.” नाना म्हणाले,“चला चहा पिऊन येवूया.” दोणीवर तोंड धुवून तिघेही ओटीवर जाऊन बसले. चहा पिऊन मास्तर घरी गेले नी नाना, रायण्णा कामगारांचा चहा नी पान-सुपारी घेवून जेटीवर गेले.

साडेदहाला शाळा सुटल्यावर बापू मास्तरांच्या बरोबर सगळे शिक्षक नी पोरंसुद्धा जेटीवर निघाली. जेटी वर अख्खा गाव जमा झालेला. नानांचे सगळे भाऊ मदतीला आलेले. बापू सोबत्याना घेवून तारवावर जावून फिरून आले. माणसांचा नुस्ता गांजिवला सुरु होता. लोकानी काय काय प्रश्न विचारून नानाना भंडावून सोडलेनी. दुपारी बाराला जेवणाची सुटी झाली. नानानी खलाशाना ही घरी जेवायला नेलेनी. दोन वाजता पुन्हा कामाची सुरवात झाली. माणसं रवाना झाल्यावर नाना हिशोबाचं विचारायला बापूंकडे आले. त्यानी ठरल्या प्रमाणे दोन हजार रुपये आणून दिलेनी. रायण्णाने हजारी सव्वा रुपया सूट दिली म्हणून त्याचा कौलांचा पुरा हिशोब द्यायचा नी कोन्यांचा हिशोब पुढच्या खेपेला असं ठरलं. लोक दरासाठी पिच्छा पुरवीत होते, मागून पुढून तरी सांगायला हवाच होता.“ खारेपाटणात हलक्या मार्क्याला हजारी ऐंशी रुपये दर आहे. तो माल जुना शेवाळ धरलेला. मंगलोर मार्का एक नंबर! कौल जड, पूर्ण तांबडं , ताजा माल, हजारी चौऱ्यांशी घाऊक नी किरकोळ साडे आठ रुपये शेकडा. कोने घाऊक - किरकोळ नगी तीन आणे. माल इथे पारखून घ्यायचा वाटेत वहातुकीत फुटतूट आमची जबाबदारी नाय.” बापूनी सांगितले.

साडेपाचला बापू शाळेतून घरी आले तेंव्हा काम आवरतच आलेलं. सुधाकाकू, दामलेकाकू, रमा नी तिच्या जावा, मुलं सगळी जेटीवर जमलेली.

मोकळ्याला लावलेला कौलाचा थप डोळे फ़ाटतील असा.....एवढा माल तारवात रहील यावर विश्वास बसत नव्हता. गावातली तालेवार मंडळीही आलेली. माल ह्या भागात कुठेच मिळणार नाय असा उजवा. रंग, आवाज नी वजन ह्याला जोड नाय हे जाणत्यानीही मान्य केलेनी. नानांचा दुकानदार भाऊ मधुकाका आलेल्या दर्दी माणसाना अभिमानाने सांगत होता, “ही बापूमास्तरांची पारख हो, आम्ही पैशाचे जिम्मेदार, मास्तर पूर्वी विजयदुर्गात जांभेकरांच्या पेढीवर होते. कौलाची खरेदी विक्री सगळी ते एक हाती सांभाळीत. त्यांच्या जीवावर आम्ही उडी मारलीए....” ऐकणारानी माना डोलावल्या. बापूनी बायका मंडळीना तारवावर फिरवून आणलेनी. या तारवात इतका सगळा माल कसा काय राहिला ? याचे त्याना आश्चर्यच वाटले. माल उतरून झाला नी बापू, नाना रायण्णाला हिशोब करायला घेवून गेले. ठरल्या प्रमाणे हिशोब मिटला. कोन्यांचा व्यवहार अर्धा अधिक माल ऊठल्यावर केला तरी रायण्णाला चालणार होता. हा माल उठल्यावर नवी ऑर्डर द्यायची तर बंदरावर पिलणकराच्या किंवा लळताच्या हॉटेलवर ‘डोर्ले जेटीवर माल टाका ’ अशी रायण्णाच्या नावची चिठ्ठी ठेवायची. दर पंधरवड्याला मंगलोरहून कोणी ना कोणी खेप करतोच. तो सगळ्यांकडे चौकशीकरून निरोप पोचवतो , सगळेच एकमेकाना मदत करतात. त्याने रक्कम घेवून पोच पावतीवर सही करून दिली.

दुसरे दिवशी आठवडी बाजार होता, नानानी दुकाना बाहेर पन्नास कौले नी दहा कोने मांडून ठेवले. त्यावर कोळशाने किंमत लिहीलेली होती. बरेचजण मरडावर जावून कौले कोने बघून गेले. दुपारी बापू नी नाना माल मोजून आले. कौलं गिऱ्हाकाला देताना कडेला कोळशाची खूण लावून कशी मोजायची ते बापूनी नानाना दाखवलेनी. घरी आल्यावर एका वहीत सगळा हिशोब मांडित असताना काकूनी ओसरीवरच्या लाकडी कपाटाची चावी देवून, “हे उचलून आत खोलीत ठेवून घ्या नी तुमचे हिशोब ठेव रेव करायला वापरा ” म्हणाल्या.

संध्याकाळी मास्तर शाळेतून आले तोपर्यंत नानानी गड्यांकडून कपाट बापूंच्या खोलीत न्हेवून ठेवलेले होते. दोन दिवसानी चार हजार कौलं नी सव्वाशे कोन्याचे गिऱ्हाईक आले व्यवहार रोखीचा पण दराला लोचटपणा करीत होतं .नाना बधेनात.... त्यानी बापूना बोलावून घेतलं . बापूनी तोड केली . सग़ळ्या हिशोबात गाडी भाड्यापोटी पंधरा कमी द्या.... मात्र हे कोणाला बोलू नका. पहिलं गिऱ्हाईक म्हणून नाना झीज सोसतील. सौदा पटला मास्तरानी पहिली भवानी मोजून घेतली. आठवडाभरात पंधरा हजार कौले नी पाचशे कोने संपले. दर कमी करून मागणाराना रक्कम कमी करण्याऐवजी पंचवीस कौलं जादा दिली जायची .

मग दोघानी विचार करून विजयदुर्गात माणूस पाठवून लळताच्या हॉटेलवर रायण्णाला हजार कोने नी कौलं पाठवायला चिठ्ठी ठेवली. गिऱ्हाईक वाढल्यावर बापूनी आपल्या वतीने पूर्ण दिवस गडी ठेवला. पोरगा उमेदवार नी हुन्नरबाज .... रहिल्या दिवसापासून मन लावून काम करायला लागला. शाळा झाल्यावर बापूसुद्धा कायम वखारीत थांबायला लागले. पुढच्या चारपाच दिवासात थप भसाभसा कमी व्हायला लागल्यावर गावातले दोन घरं बांधणारे भेटायला आले तेव्हा जेमतेम चार हजार कौलं शिल्लक होती. “असा काय नाना..... आमका रखडवतास काय . म्हाल सोपत इलो,आमका आदी सांगतास तर आमी म्हाल ताब्यात घितलोआसतो.”मास्तर म्हणाले, “आतासा आडा ठेवन झाला... तुजी रिप ठोकून होयसर पंदरा दिवस जाती... तुजी खोटी करणार नाय,” हे बोलणं सुरु असताना जेटीवर तारू आलं. दहा मिनिटानी रायण्णा हजर झाला... “तुमी चिटी टेवला ते रातीच मला मिळाला बगा. म्हाल सगळं आनी सपलं म्हणा की, ह्या खेपेला ज्यादा भरताड करून आणलो की...” तासाभरात निरोप न पाठवताच मागच्यातले दोघे कामगार आले, “ तारू इलेला कळला म्हनान इलाव... दुपार पास्ना येवचा ना?” नाना हसून म्हणाले, “नुको ह्या टायमाक आमी भाव नी बायल मान्सा तारू खाली करनार हाव.” ह्या वेळी

कौलाची पाच हजार अधिक भरताड होती.नाना बापूनी कौलांचा नी संपलेल्या कोन्यांचा हिशोब भागवून टाकला.

पुढच्याच सोमवारी अरुणचे आईला पत्र आले. त्याने बापूना मरडाचे मुखत्यार पत्र रक्कमेचा उल्लेख न करता करून द्यायला सांगितले. तो दत्तजयंतीला आल्यावर आर्थिक बाबतीत चर्चा करणार होता. दरम्याने वाड्याच्या छपरावरचा नळानी खापरे पूर्ण बदलून मंगलोरी कौले नी कोने याच्या खर्चाचा आकडा लगेच कळवायला लिहिले होते. नाना नी बापूनी लगेच छपराची मापे घेवून अंदाज केला. चार हजार कौले नी दीडशे कोने गृहित धरूनअंदाज केला रिप बदलण्याची गरज नव्हती. फक्त नळा उतरून लांब नेवून ओतायचा नी कौले चढवायची मजूरी काय होईल ती. असे सविस्तर पत्र लिहून दुसऱ्याच दिवशी रवाना केले. दहाव्या दिवशी त्याची एक हजार रुपयाची तार मनि ऑर्डर आली.मजकूरात मुद्याच्या चार ओळी होत्या. “नाना, बापूमामा सवडीप्रमाणे काम करू देत. प्रत्यक्ष काम करताना अंदाजापेक्षा जादा खर्च होतो म्हणून अधिकचे पैसे पाठवले आहेत. आणखी लागले तरी कळवावे. कौलाचा दर माझ्यासाठी कमी करू नये. अरूण” छपराला पटई असल्यामुळे सामान हालवा हालवीचा प्रश्नच नव्हता.बापूनी दत्तंभटाला दिवस बघायला सांगितला.

दत्तंभटाने अवस झाली की दुसऱ्याच दिवशी काम सुरु करायला सांगितले. त्याप्रमाणे चार दिवसानी काम सुरु झाले . दोन दिवसात नळे खापरे ठिकाणात एका टोकाला ढीग मारून झाला. पुढच्या तीन दिवसात कौले चढवून माळवदाची झाडलोट करून काम पुरे झाले. दामले काकूने स्वत: हिशोब करून कौला-कोन्यांची रक्कम नानांकडे दिली. मास्तरानी पुन्हा पुन्हा सांगूनही तिने पाच पैसेही कमी करू दिले नाहीत. मंगलोर पडल्यावर वाड्याचे रूपच पालटले. गावातले लोक येवून येवून वाडा बघून खुश होऊन जात. दोन दिवसानी मास्तरांची मुले रवि नी अलका सुटीला आली. मोठी झालेली मुले पण आल्यावर पाय धूवून झाले नी चहाखाणे न घेता त्यानी प्रदिप, उषा नी

त्यांच्या चुलत भावंडाना बोलावून राजांगणाभोवती धावाधावी सुरु केली. मग झोपाळ्यावर बसून दणक्या झोप्या काढीत गाण्यांच्या भेंड्या सुरु केल्या. संध्याकाळी मास्तर नी नाना आल्यानंतर त्यांचा हुदूदू जरा बंद झाला. रवि-अलकाकडे कटाक्ष टाकीत नाना म्हणाले, “पाळंदिला लागल्यावर कान्हेर आईकला तेंव्हा काय उलगडेना ..... आत्ता कारण कळले.... ”

दामल्यांच्या वाड्याचे काम झाले नी गावभर मंगलोर घालायची साथच सुरु झाली. दर दोनतीन दिवसानी कुणीना कुणी वाड्याचा मालक येवून ऑर्डर देवून जायचा. दर पंधरा-वीस दिवसानी कौला-कोन्यांचा ढीग हातोहात उठायचा. वाड्याची गिऱ्हाईके बिनबूड नी त्यांची इतरही काय खटखट नसायची. बघता बघता सात आठ सिझन कधी मागे पडले ते कळलेच नाही. मास्तर रिटायर झाले तो काळ तर मंगलोराच्या ऐन बहाराचा. या काळात सामाजिक परिस्थिती झपाट्याने बदलत चालली. लाईट आले, रस्ते आले, वाहनं आली. हलाखी कमी झाली नी लोकांच्या हातात चार पैसे



खुळखुळायला लागले. त्या काळात कोलव्याची (गवत) नी कारवारी नळे , खापरं यांची छप्परे असायची. बापूंच्या उत्तरायुष्यात मंगलोरी कौले - कोने

यांचा जमाना सुरु झाला. या स्थित्यंतराचा अचूक वेध बापूमास्तरानी घेतला नी आपल्याबरोबर आपल्या मेव्हण्याचेही भाग्य त्यानी पालटले. ते डोर्ल्यात आले तेव्हा सगळया पंचक्रोशीतली घरं नळयाच्या नी कोलव्याच्या छपराची होती.वखार सुरु झाली. बहुसंख्य छपरांवर मंगलोर चढला.

बापूमास्तर म्हणायचे, “चौदा वर्षाच्या काळात रामायण घडते...” तसे चौदा वर्षांमध्ये डोर्ल्यात झालेले स्थित्यंतरही माणूस चकरावून जाईल असेच ! सहा वर्षामागे दामलेकाकू गेल्या. त्या महिनाभर आंथरूणावर खिळलेल्या होत्या.... सुधाकाकूनी त्यांची मुलीप्रमाणे सेवा केली. त्यांचा मुलगा , सून, नातवंडे त्याना भेटायला डोर्ल्यात आली तेंव्हा जेमतेम धुगधुगी होती इतकेच. ते चित्र बघून अरुण आवाक झाला. “ बापूमामा ... मी तुमच्याशी मामाचे नाते जोडले ते तुम्ही शब्दश: सार्थ केलेत.” दोनच दिवासात दामले काकूनी डोळे मिटले . ते एक पर्व संपले. तसाच बैलगाड्यांचा जमाना संपून टेंपोचा जमाना आला. शिडाची तारवं गेली आणि डिझेल नी पेट्रोलवर चालणाऱ्या मोटर बोटी आल्या. आता भरती सुकतीच्या ताणाची वाट बघित थांबायला लागत नसे.

लळिताच्या किंवा पिळणकराच्या हॉटेलात चिठ्ठी ठेवायची गरज उरली नाही. बसल्या जागेवरून दोन मिनिटात फोनने ऑर्डर देता येवू लागली.दर आठवड्यात पंचक्रोशीतली चार पाच गिऱ्हाईके व्हायची. पूर्वी घरं मोठी असायची . एक गिऱ्हाईक खेपेन तीन ते चार चार हजार कौले खरेदी करायचे. आता घरं लहान झाली. गिऱ्हाईक दीड दोन हजार कौले घेणारी! पण आता तीन चार गिऱ्हाईके रोज व्हायला लागली. धंद्यावर दिवसभर ठायमूर बसायला लागायचं. एका नोकरावर काम भागेना म्हणून दोन नोकर ठेवायला लागले. दर पंधरवड्याने येणारा तारुवाला चार दिवस उशिरा आला तर माल संपायला लागला. येणारी गिऱ्हाईके फारशी हुज्जत न घालता सांगाल तो दर मान्य करून नोटा काढून टाकायला लागली. नफा मुद्दलाच्या दीडपट मिळायला लागला.

मास्तर डोल्र्यात आले तेंव्हा गावात पाच-सहा घरे सोडली तर बाकीची घरे माणसानी भरलेली असायची.पण आता निम्मे घराना कुलुपे लागली. सात बर्व्यांचे घर तर माणसानी गजबजलेले. गावात नी जवळसार माद्ध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती म्हणून सातवी झाल्यावर रमाने आपली दोन्ही मुले शिक्षणा साठी मुंबईला दिरांकडे ठेवलेली. पण घरात जावांची साताठ मुले होती म्हणून तीला आपली मुले जवळ नाहीत याची बोच जाणवली नाही. सातवी झाल्यावर पुढच्या शिक्षणासाठी म्हणून एकेक मूल घराबाहेर पडू लागले. हायस्कूल,कॉलेज करून नोकरीच्या निमित्ताने मुलं पुण्या मुंबईला स्थायीक झाली. आता घरात फक्त म्हातारी माणसे राहिली. बापू मास्तरांचा मुलगा नी सून दोघेही नोकरीला नी बड्या हुद्द्यावर लठ्ठ पगार घेणारी . पण लग्न होवून दहा वर्षे उलटली तरी मूलबाळ झालेले नव्हते. ते एक शल्यच होते.

रमा आत्तेला कसे काय सुचले कोण जाणे ... त्या वर्षी दत्तजयंतीला रवी नी केतकीला तिने मुद्दाम बोलावून घेतले. . दत्त जन्माच्या वेळेस केलेले नारळाचे बाळ तीने योजूनच केतकीच्या ओटीत घातले. महिनाभराने सुधाकाकूला मुलाचा फोन आला, दहा वर्षानंतर केतकीला दिवस गेले होते. उंच वयातले गरोदरपण..... डॉक्टरानी सांभाळून रहायचा सल्ला दिलेला. म्हणून त्याने आईला पुण्यात यायची गळच घातली. दोन दिवसानी न्यायला गाडी आली, सुधावैनी बरोबर रमाआत्तेही रवाना झाली.

बाळंतपण सुखरूप पार पडले, मुलगा झाला. बारशाला बापू, नाना, रमा आत्ते पुण्याला गेले. गजाबारात बारशाचा कार्यक्रम झाला. दुसरे दिवशी मुलाने योजूनच विषय काढला. सुधाकाकू आताच्या खेपी डोल्र्यात परत जायचीच नव्हती, नी ते सयुक्तिकही होते. नवसासायासाने झालेला नातू... ती खंबीर असताना त्याला बेबी कीपर कडे सोपवून डोल्र्यात जायला ती तयार नव्हती आणि तिला जावू द्यायला मुलगा रवि नी सून केतकी तर त्याहून तयार नव्हती.

पैशासाठी बापूनी डोर्ल्यात एकटे राहून कौलाचा धंदा सांभाळण्याचीही आता गरज नव्हती.

धंद्यातली भागिदारी जीवाभावाच्या माणसाशी.... आज तारखेला असलेल्या कौलांची किंमत होईल त्यातली निम्मे एवढेच कॅपिटल.... पण ते सुद्धा न घेता दामल्यांकडच्या बिऱ्हाडातले सामान आवरून वाड्याला कुलुप मारणे नानांवर सोपवून डोर्ले अध्यायाची साङ्गता करावी. त्यानी आता इथेच रहावे.....असा आग्रह अविने धरला. बापूना मुलाचे म्हणणे मनापासून पटले. सुधाकाकू सुनेची देखभाल करायला पुण्यात रवाना झाली तेंव्हाच आपल्या आयुष्यातले डोर्ले पर्व आटोपत आले हे त्यानी ताडलेले होते. घसा खाकरून बापू मास्तर म्हणाले, “ मी डोर्ल्यात हजर झाल्यावर मला सुचले , नी मी अगदी सहज म्हणूनकौलाच्या वखारीचाविषय काढला. नानानी माझ्यावर अस्लेल्या विश्वासामुळे मला सोबत घेवून धंद्यात उडी घेतली.... लिखापढी सोडाच वाचाबाद सुद्धा कसल्या अटी-शर्थींची चर्चा, कामाची वाटणी झाली नाही. मी हिशोब ठेवले ते त्यानी कधिच पडताळले नाहीत.बरकत आल्यावर मिरगाच्या टायमाला सिझन आटोपल्यावर मी वर्षाचा ताळमेळ घेई.

गंगाजळी बाजूला काढून धंद्यातले मर्म बायकाना समजावे या हेतूने उरलेल्या रक्कमेच्या दोन उभ्या राशी कधी सुधा तर कधी रमा यांच्या हस्ते मी करून घेई. आज आम्ही इकडे आलो म्हणून हिशोबाची वही नी कपाटाची चावी नानांच्या घरी त्यांच्या भावाकडे आहे .नाहीतर ती कायम माझ्या बिऱ्हाडी असायची. त्यावेळी जसा गोडीगुलाबीत मुहूर्त न बघता शुभारंभ झाला, तशी माझ्यापुरती याची साङ्गता आज या भरल्या वास्तूत मी करतोहे..” नानांचे हात हातात घेत बापू म्हणाले , “रवि म्हणाला तसे, आता मी इथेच राहणार, तिथली आवरासावर तुम्ही नी रमा दोघानी करा. आज या क्षणापासून वखारीचा धंदा मी विनाअट तुमच्या स्वाधिन करतोहे... पुढचे श्री दत्तत्रेयाऽऽर्पणमस्तु!”

※※※※※※※※※※



## २. उपल्वटी वांदर

त्यावर्षी दसरा झाला नी अकल्पितपणे टोळधाडी सारखी वांदरांची टोळी आमच्या गावात दाखल झाली. आमच्या आगराला लागूनच हरीभाऊंच घर नी आगर. त्यांच्या मागिल दारी न्हाणीघर विहीर आणि खालच्या अंगाला रामाच्या देवळाजवळ डेगे बरोबर महाप्रचंड चिंचेचं झाड. दोन बापयांच्या वेंगेत मावणार नाही इतकं मोठं सहा एक हात उंच कांड नी त्यावर चार उंच डेळे. अगदी वाटणी करावी तसे निम्मे विस्तार हरीभाऊंच्या आगरात नी अर्धाविस्तार आमच्या आगरात. आम्ही भावंडं सकाळी दात घाशीत घाशीत अंगणात गेलो नी हुप्प हुप्प असा आवाज आला म्हणून पहातोय तर चिंचेवर वांदर बसले दिसले. आवाज आयकून आज्जीही बाहेर अंगणात आली . आम्ही कौतुकाने

चिंचेकडे बोटं करून ते बघ कित्ती वांदर आलेहेत ते. नीट निरखून बघितल्यावर आज्जीने म्हटलं, “अरे त्या सगळ्या वांदरीणी आहेत. बाजूला त्या आडव्या फाट्यावरबसलेला आहे ना....तो वांदर...त्याला हुप्प्या म्हणतात. तो नर आहे नी बाकीच्या त्या सगळ्या माद्या.”

चहा घेताना काका म्हणाले, “आत्तापर्यंत हा क्लेश नव्हता. आता ह्यांचा उपलवट बघायला नको,अळं वारवं काय्येक व्हायला द्यायचे नाय. आंबा, पेरू कायकाय लाभायचा नाय. मळयातल्या कडदणाचा तुळांकार झालाम्हणून समजा . भंगली नासकर्मी जात.....खाणार त्याच्या दसपट नासाडी करणार. ” त्यांचं बोलणं सुरु असताना तानू बाणे कामाला आला. त्याने बातमी आणलीन की संध्याकाळीच एक टोळी पर्ल्या बामणाच्या आवाठात अष्टावर आली नी तिथून मग घोरिप चिंचेवर वस्तीला थांबलेली. प्रत्येक टोळीत बारा-पंधरा वांदरीणी आहेत. आठ दिवसा मागे भुईबावडा घाटातून तीन-चार टोळ्या वलाटीत उतरल्या नी तिथून एकेक गाव घेत खाड पट्ट्यातल्या मोरोशी, प्रिंदावण , उपळे, तारळ या गावानी स्थिरावल्या. तारळकरानी ही टोळी आमच्या गावात पिटाळून दिलेनी. आप्पा म्हणाले , “ती अशी पिटाळून जाणारी विवशी नाय... जय खाणां मिळात थय ऱ्हवणार...चिच म्हंजे तेंचा आदस्थान.... चिचेक बारामाही फुटवो येता. खय काय खाणां नाय मिळाला तर चिचेचो पालो हा, वांदर तेका लय लबूत.” तासाभराने रामाच्या देवळावरच्या छपरावर नी तिथून पुढे धोदांब्यावर उड्या टाकीत वांदर नपश्चात झाले.

आमचा नावळे गाव म्हणजे खाडी किनाऱ्या लगत ची चिंचोळी पाजोटी. वरच्या कडेला पहिलीच धुमाळ वाडी, तिथून खाली एकदम टोकाच्या भंडार वाडीत “धार धरून कुठच्याही वाटेने पावणेदोन तासाची राखण. सड्याची धार माडभर उंचीवर. कुठच्याही वाडीतून सडा गाठायचा तर दमछाक करणारी घाटी चुकली नाही. धुमाळवाडीतली वाडीतली घरं तेवढी टापूवर कातळी भागात. पण खाली गावाच्या टोकापर्यंत सड्याची धार सुरु होते त्या

आधीच्या सवथळ भागात घरं , त्याखाली मळा नी त्यापुढे खाडी. मळे जमिनीत फाल्गुनापर्यंत आंग ओल टिकून असायची म्हणून दसऱ्या ला भातं कापून झाली कि, कुळीथ,चवळी,वरणे, मूग, उडिद ही कडदणं पेरीत.काही जण भुईमूग ,वांगी,मुळा,नवलकोल, मिर्ची,पोकळा,माठ अशा भाज्या पिकवीत . या जित्रबाला पाणी शिंपायची गरज नसे, ते आंग ओलीवर होई. वर्षातले फक्त दोन महिने म्हणजे चैत्र वैशाखात मळे उखळून पड टाकलेले असत. मळ्याच्या टोकाला खाडी किनाऱ्यालगत माड, केळी नी ऊसही विना शिंपण्याचे होत! त्यामुळे वांदराना बारा महिने विपुल खाद्य मिळायचं....

भुईमूगाची फुलं जमिनीत रिगायची खोटी की वांदर उपडून खायला सुरुवात करीत. उसाचे शेंडके मोडून दोन दोन-तीनतीन पेरांचे तुकडे मोडून न्हेत. मिर्ची सोडली तर त्याना बाकी कशाचाच वगळ नव्हता कडदणाची अख्खी ढाकंच (रोपं) उपटून नेत .... एखादी शेंग खात नी हातातलं ढाक तिथेच टाकून दुसरं ढाक उपटून नेत. मुळे, नवलकोल उपटून जरासे चाबलल्या सारखे करून टाकीत नी नवीन उपटीत. चवळीच्या पाल्याला तर वांदर एका नंबर लंपट. चवळीचा पाला ओरबडून वेलाचा पुरता विद्वास करीत. अख्ख्या टोळीने एकदा का जित्राबात पाय टाकला की वांदरानी केलेली नासाडी बघून डोळ्यान टीपं काढायची पाळी येई. एकदा का ह्या हैवानांची फेरी येवून गेली की महिनाभर जित्रब वर येत नसे. त्यामुळे मळ्यात राखण धरायचं एक नवीन शुक्लकाष्ट गाववाल्यांच्या मागे लागलं. वांदर एवढे बिलिंदर की कसली चाहूल लागू न देता मळ्याच्या कडणीला असलेल्या झाडांवर दबा धरून बसत नी राखणा न्हेरी करायला किंवा न्हायला म्हणून दहा मिनीटासाठी घराकडे गेला की खाली उतरून धाड घालीत. त्यांचा म्होरक्या हुपट टेहळणी करीत बसून असे. राखणा येताना दिसला ख्यॅक ख्यॅक करून कळपाला सावधगिरीचा इशारा देत असे नी मिळतील ती ढाकं उपडून वांदरीणी पळ काढीत असत.

आता राखणीला बसलेला माणूस पाच मिनीटंही बाजूला जायचं झालं तरी कुकारे मारून घरातून दुसरं माणूस आल्याशिवाय चाळवेनासा झाला. सकाळी दिसायला लागलं की लगेच राखण धरावी लागे ती अगदी सूर्य मावळतीला जाऊन काळवं पडे पर्यंत. त्यात जरा चाल ढकल झाली तरी वांदर डाव साधीत. माणसानी कायम राखण धरल्यावर वांदरांची पंचाईत व्हायला लागली. कळपातल्या बहुतांश वांदरीणी गाभण असाव्यात कारण त्यांची पोटं टिळटिळीत दिसायला लागलेली. त्याचमुळे त्याना खावखाव सुटली होती काय न कळे..... वांदराची जात साली भलतीच तल्लख़ नी डॅम्बिस ! माणसानी खडा पहारा धरल्यावर त्यानीही शक्कल लढवली. खाडीकाठावर पाण्यात चिखलवटीत लगत कांदळ- चिपींची मोठमोठी झाडं वाढलेली. वांदरीणी खाजणातून सुरमत सुरमत जावून कांदळाची नी चिपीची झाडं गाठीत त्यांच्यावरून उड्या मारीत राखणा बसलेल्या विरुध्द म्हणजे खाडीकडच्या बाजूने मळ्यात शिरत. राखणा वरच्या कडेवर बसलेला. त्याचं लक्ष नसलं तर वांदरांची धाड पडल्याचं उशिरा कळायचं. नी लक्ष गेलच तरी तोउठून येईपर्यंत वांदराना कार्यभाग साधता येत असे.

काही वेळा कांदळाकडून वांदर मळ्यात शिरत नेमके त्या वेळी मच्छीमार होड्या खाडीतून जायला लागल्या की त्यांचा टेहळ्या ख्यॅक्क ख्यॅक्क करून इशारा देई नी तो आवाज ऐकून राखणा सावध होई . काही वेळा गरवायला किंवा पाग धरायला आकल्या घेवून तर कधी कुर्ल्या धरायला कोणी ना कोणी माणसं येत. मग घाबरून वांदरांचा टेहळ्या इशारत देई नी राखणा सावध होई. तरी त्या गडबडीतही वांदरांची हातचलाखी वाखाणण्या सारखी असे.... ते रिकाम्या हाताने पळत नसत. पण या प्रकारात नजर चुकवून वांदर मळ्यात घुसलेच तरी नासाडी फारच कमी व्हायची. त्याना खाताना जरा निवांतपण मिळालं की त्यांच्या मर्कट चेष्टाना उत यायचा, नी मग खाणं कमी नी नासाडी अधिक अशी गत व्हायची. वांदर खाडीच्या दिशेने यातला

लागल्यावर राखणे शेतात मध्यवर्ती मचाणावर बसून राखण धरायला लागले. काहीजणां सोबत कुत्रे असत. कुत्र्यांना जरा चाहूल लागली तरी ते भुंकायला लागत.काही वेळा कांदळात घुसून वांदरांचा ताणपट्टा काढीत. वरच्या अंगाला वस्ती नव्हती अशा ठिकाणी राखणा मचाणावर असला तरी गावदरीकडच्या बाजूला झाडकळीच्या आडोशाने वांदराना गुपचूप मळयात रिगायला मिळे नी राखणा येईपर्यंत काही ना काही डल्ला मारता येत असे.

आठ दहा वर्षात वांदरांच्या संख्येत वाढ झाली. कळपात नव्या हुप्याचे राज्य आले. जुना हुप्या नी कळपातल्या दोन तरण्या हुप्याना कळपातल्या नराने हाकलून लावले . दोन हुप्ये जोडीने रहात. पण म्हाताऱ्या हुप्याचे त्यांच्याशी झोंबट लागे म्हणून तो एकवशी पडला. तो कायम कळपाच्या मागून फिरत असे. गावात एकटं-दुकटं पोर, बाई माणूस दिसलं तर दात विचकून त्यांची पाठ घेई . एकदा दुपारच्या वेळी हरीभटाच्या चिंचेवर हुपट बसलेला होता. त्यांची मुलगी डोणीवर कपडे धुवीत असताना हुप्प्या पाणी खायला उतरला. कामाच्या नादात रजुताईचं लक्षच गेलं नाही. पाठीमागे ख्यॅक ख्यॅक आवाज आला म्हणून तिने वळून बघितलन नी जोरात बोंब मारलीन. आम्ही अंगणात खेळत होतो. रजुताईचा आरडा ओरडा ऐकून आम्ही लगेच विहीरीकडे धाव घेतली नी आम्हाला बघितल्यावर हुप्प्या चिंचेवर चढून गेला. या पूर्वी तावडीत गावलेल्या एक दोन पोराना त्याने चांगलंच फांजळून काढलन होतं . त्याची नख़ं लागून झालेल्या जखमा आब्रावून पुवळणाला यायच्या. तो हुप्प्या असाच एकदा घाटीत बसलेला असताना घाड्यांच्या पोरानी पाच सहा कुत्रे सोबत नेवून त्याला आडावून आडावून सड्यावर पिटाळलेनी. सडावळीला झाडं नसल्यामुळे तो उघड्या कापावरून झाळींच्या आडोशाने कुत्र्याना झुकांडी देवून पळत राहिला. तासेकभर त्याचा चांगला ताणपट्टा काढल्यावर तो टेकीला आला नी कुत्र्यांच्या तावडीत गावल्यावर कुत्र्यानी त्याला फाडून खाल्लेनी.

तरणे हुप्ये कायम कळपाच्या माग़ून फिरायचे. कळप येवून गेला की मागोमाग हुकुमी त्यांची फेरी व्हायची. त्यांची रात्रीची वस्ती कायम घोरीप चिंचेवर असे. ही जोडी मात्र भलतीच बिलंदर! दोघे दोन बाजूने मळयात रिगायला उतरत. राखणा हाकलायला गेला तरी हुप्या त्याला हुलकावण्या दाखवीत अंगावर घ्यायचा नी तेवढ्या वेळात दुसरा हुप्या घुशी करून हाताला मिळेल ते घेवून पसार होई. कधितरी कळप पुढे निघून गेला तरी एखादी मादी खाण्याच्या नादात मागे रहायची. त्यावेळी मागोमाग हुप्यांची जोडी आली की त्यांची दंगामस्ती सुरु व्हायची. काही वेळा कळपातून मागे ऱ्हायलेल्या दोन दोन माद्या सुद्धा ह्या हुप्यांबरोबर रहायच्या. टोळीतल्या नराची नजर गेली की तो चाल करून येई. जोडीतल्या एखाद्या नराशी त्याचं झोंबट लागे. नी टोळीच्या म्होरक्या हुपटाने त्याला फांजाळलन की तो पळून जाई नी माद्या पुन्हा कळपात रिगत.

गावात तीनचार चौसोपी - राजांगण असलेले वाडे होते. दुपारी माणसं जेऊन खाऊन पडायची.अशा निवांतवेळी वांदर राजांगणातून आत शिरत. घरात हुसकाहुसकी करून हाताला लागेल ती खाणे वस्तू घेऊन पोबारा करीत. काही वेळा माणसे उठल्यानंतर उसक पासक दिसल्यावर वांदर येवून गेल्याचे कळायचे. काही वेळा भांड्याचा किंवा फडताळ उघडल्याचा आवाज होऊन माणसाना चाहूल लागे नी वांदर घरभर सैरावैरा धावत. पर्ल्या बामणाच्या घराजवळ अष्टाचे झाड गगनावेरी उंच गेलेले. हा वांदरांचा आसराच होता. कैक वेळी रात्री त्या झाडावर वांदरांची बसल असे. पर्ल्याच्या आगरात चिकू, पेरू, रामफळीची मुबलक झाडे. केळीचे तर बनच होते. “माज्याकडे दर दोन दिवसान घड तुटता” असे पर्ल्या मोठ्या अभिमानाने सांगे. त्याला वांदरांचा त्रास फारच होई. त्याच्याकडे आल्सेशियन कुत्रा बाळगलेला होता . तो भलताच तिखट , परिचयाचे चार गडी नी पैरी वगळता कोण येईल त्याच्यावर कुत्रा तुटून पडायचा.

ओसरीवर पर्ल्याचे छोटेखानी दुकान असायचे त्यामुळे सारखी गिऱ्हाईकांची येतुक जातुक असायची. म्हणून कुत्रा बांधूनच ठेवावा लागे. त्यात वांदरांचे चांगले फावे. सुरुवातीला जरा चाहूल लागली की कुत्रा बेजान भुंके नी अगदी अष्टावर बसलेले वांदरही भिऊन पळ काढीत. पण दिवस गेले तशी वांदराना सवय झाली नी ते घाबरेनासे झाले. ओसरीवर कुत्रा बांधलेला असताना दुपारच्या शांत वेळी वांदर राजांगणातून पर्ल्याच्या घरात शिरले. ते छपरावर आल्यापासून कुत्र्याने भुंकून सकनात केला. पण ते नेहेमीचेच असल्याने कुणीच दखल घेतली नाही. वांदरानी ताकातला लोण्याचा गोळा काढून घेताना टेबलावर ठेवलेली चिनी मातीची बरणी ठो करून पडली नी त्या आवाजाने त्याची आई जागी झाली. ती स्वयंपाक घराकडे गेली नी आत वांदर बघून तिने घाबरून बोंबलायला सुरुवात केली. तेव्हा वांदरांची पळापळी सुरु झाली . बापये नेमके काठ्या घेवून राजांगणा भोवतीअसल्यामुळे वांदराना बाहेर पळायला मिळेना. त्यानी इतस्तत: धावायला, उड्या मारायला सुरुवात केली. उशिराने ही गोष्ट पर्ल्याच्या लक्षात आल्यावर “बाजूक होवा... तेंका जावंदेत ” असं ओरडल्यावर माणसं बाजुला झाली नी आल्या वाटेने वांदर छपरावर उड्या टाकून पळून गेले.

पर्ल्याची दुनळी काडतूसची बंदूक होती. परश्या सुतार ती शिकारीला नेत असे. तो पट्टीचा नेमबाज होता, तो बंदूक घेवून गेला की हुकमी कवडे, रानकोंबडे,लांडोरी, ससे, भेकर काही ना काही पारध आणायचा. त्यातला निम्मे वाटा पर्ल्याला मिळायचा. वांदरांची उपल्वट अतीच झाली तेव्हा त्याने परश्याला बोलावले. वांदर अष्टावरच बसलेले होते. पण वांदरावर बार टाकायला त्याने नकार दिला. “ ती मारुतीरायाची जातकूळ तेंच्यावर बार टाकीत तेचो वस वाढोचो नाय.... हवेत बार काडून पळवून लावया... पन तेंची हत्या आपल्याच्यान व्हनार नाय...” म्हणत त्याने हात जोडले. मग पर्ल्याने युक्ती योजली. त्यावेळी कलमावर फवारणी करायला एन्ड्रीन -डिमेक्रॉन ही

विषारी औषधे येत. त्याने शेरभर शेंगदाणे त्या औषधात घोळवून उन्हात सुकवून वांदरांच्या बसल बघून त्या जागांजवळ ठेवले. वांदर आले ....त्यानी औषधाच्या वासामुळे दाण्याना हातही लावला नाही. दोन दिवसानी चान्या, कांडेचोर मरून पडायला लागले. वांदरांच्या उच्छादाला कंटाळून त्याने राजांगणाला लोखंडी जाळी लावून घेतली. त्याचं बघून मग गावातल्या सगळ्याच चौसोपी घरांच्या मालकानी राजांगणाला लोखंडी जाळ्या मारून वांदरांचा घरात यायचा मार्ग बंद केला. वांदर जाळी वरून डोकावून बघीत पण आत जाता येत नसे.

हल्ली राखणीमुळे जवळ जवळ घरठेप कुत्रा बाळगलेला असायचा. कुत्रे सुद्धा ठायमूर मळ्यात बसून राखण थोडीच करणार? मालक राखणीला बसलेला असेल तेवढाच वेळ ते थांबत. मग कोणीतरी शक्कल लढवली . त्याच्या गळपट्ट्याला लांब रशी बांधून कुत्र्याला मळ्यात टांगलवून ठेवीत. वांदर आली की कुत्रा लांब अंतरापर्यंत धाव घेत जाई. कुत्र्याचा पल्ला हेरल्यावर त्याच्या बाहेरून वांदर मळ्यात रिगत. तरीही अंदाज फसून सुरवाती-सुरवातीला दोन तीन वांदर कुत्र्यांच्या कचाट्यात गावलेच. पण ते तेवढंच! या घटनां नंतर वांदर सावध झाले नी ही युक्तीही फुचूक झाली. काही जणानी चिव्याच्या काठीचे कागवळ त्याना आम्ही शिरड म्हणू. अशी शिरड नी भरीला कऱ्याचे - आंजणीचे टाळे (फाटे) वापरून सहा सात हात लांबनी अडीच तीन हात उंच तटकी बांधली . जित्राबाच्या चारी बाजूने अशी शिरडीची तटकी-सलडी उभी करून त्या कोंढाळ्यात कुत्र्याला कोंडून घालीत. कोंढाळ्यात जायला दोन हाती फ़ाडं ठेवून तिथे कवाडी लावीत. कुत्र्याला सलड्यांवरून उडी मारून बाहेर पडता येत नसे. शिरड मजबूत नी अशी गच्च आंथरलेली असे की तटक्यात कुठेच सांदी - फटी मिळत नसत. दुपारी कोणीतरी जावून कुत्र्याला भात-भाकरी नी थाटलीत पाणी ओतून येत. अगदी सकाळीच कुत्र्याला कोंढाळ्यात सोडीत नी काळवं पडल्यावर बाहेर काढीत.

पावसाच्या सुरवातीला आमच्या गावातून आवती, मलकी काठ्यांचे तीन-तीन ट्रक भरून जात. गावात चार दहा बारा ठिकाणी काठ्यांची घाऊक तोड व्हायची. हजारो काठी तुटायची नी ढिगानी शिरड साठायची. अंतू मिर्जुला नी त्याचे दोन पोरगे काठ्या तोडून नेणारा सुलेमान , बज्या भंडारी यांना पाचदहा रुपये देवून तिथली शिरड कबजात घेत. सराईबरोबर बाप लेक मिळून शे शंभर सलडी बांधून विकीत नी लोक खटखट न करता ती विकत घेत. मिर्जुला तटकी बांधायला कुंबयाचे बंद वापरी. तटकी उभी करताना कम जास्त सुंभाचे बंद घ्यावे लागत. दर वर्षी कोरम झालेला खूटखांबा बदलून अधे मधे सुंभाचे नवे बंद घेत राहीले की या सलड्याना आठेक सीझन तरी भंग नसे. थोडी कटकट नी उचापत पडे खरी पण वांदरांना आरेख पडला. मळयात जाय-यायच्या वाटा सोडल्या तर अशी शेकडो कोंढाळी असायची. क्वचीत एखाद्या वेळी वांदर घुशी करीत . तटक्याच्या फटीतून भोसकून भोसकून एखादे धाट ओढीतही. जुन्या कोरम झालेल्या तटक्यांची शिरड मोडून तिथे घबी पडत नी वांदरांच्या पाठलागात कुत्रे कोंढाळयातून बाहेर पडत. असे ढोबके पडत तिथे तोरणीची – वाघाटीची दोन काटेरी शिरडी आडवी बांधली की मग धास्ती नसायची. अर्थात वांदर तटकी पेचून आतली ढाकं ओढायचे हे प्रकार अगदी चुकार व्हायचे.

एकदा तर एकदम पाच सहा वांद्रीणी मिळून एका वेळी सलड्यावर चढल्या. सलडं तीनचार सीझन पावसाचं पाणी खावून जरा तकलादू झालेलं , त्याला भार सहन झाला नाही नी सलडं पोटावर घेवून वांदरीणी आडव्या झाल्या. कळपातून हाकलले दोन सडे हुपट मात्र माजोर्डे झालेले.... मळयात चवळीवर असताना एख़ादाच कुत्रा भुंकत अंगावर गेला तर वांदर दात विचकून त्याच्या वरच चाल करून जात नी त्याला दुशी बाजुनी घेरून फांजळून काढीत. पण बव्हंशी ही दुक्कल कुत्र्याला हुलकावणी देवून त्याने एकाची पाठ घेतली की दुसरा वांगी- काकड्या ओरबडून पळ काढी रवी यादवाच्या म्हाताऱ्या कुत्र्याचा तर वांदरांशी झालेल्या झोंबटात एक डोळाच फ़ुटला. अर्थात चांगला

दांडगा दुंडगा कुत्रा असला की हुप्यांची डाळ शिजत नसे. एकदा बाणेवाडी खालच्या मळयात कुत्र्याचे भुंकणे आयकून करट्यांची उतरंड रचून चिंध्यांचा चेंडू घेवून लगोरी खेळणारे दहावीस कुळवाड्यांचे पोर मळयात गेले.पोर आलेले बघितल्यावर हुप्ये खाडीच्या दिशेने पळाले. जोरगतीची सुकती असल्यामुळे खाडीत दोन्ही तडीना मोठी 'भाट' पडलेली (सुकतीचे पाणी ओसरल्यामुळे कोरडी झालेली जागा) नी मधल्या पाच सहा वाव भागात भांगलवणी व्हावत होते. पोर डोकेबाज, हुप्ये कांदळातून निसटून गावदरीत घुसू नयेत म्हणून त्यानी वरच्या भागातून आडावीत आडावीत नी दग़ड मेखलावीत हुप्याना भाटीकडे खालच्या दिशेने पिटाळलेनी. हा गदारोळ आयकून वाडीतले पाच पन्नास बापये खाडीच्या दिशेने धावले. "त्या भडयांक कांदळात घुसोक देवया नुको.... ते खाली उतारले काय पैलाडी पिटाळूया...." जमात वाढल्यामुळे हुप्यांचा निरुपाय झाला. खाली उतरून ते मोकळ्या खाडी पात्रातून धावायला लागले. आता लोकानी दगड मारायला सुरवात केली नी हुप्ये भांगलवण्यात उतरले. लोकानी चिखलडीतून पुढे जावून आरडा ओरडा केल्यावर हुप्ये पोहत पोहत पलिकडे गेले. ते जे गेले ते गेले , त्यानंतर पुनःश्च ते गावात दिसले नाहीत.

आंब्या फणसाच्या दिवसात एकदा का वांदरांचा कळप कलमावर आला की मग हरत्काळ बघवत नसे. वांदर साधारण जुन झालेले आंबे डासळवून टाकीत नी दुसरा आंबा काढीत. त्यांची दंगामस्ती, पाठशिवणी, धडाधड उड्या मारणं ह्यात झाडाखाली आंब्यांचा नुस्ता खच पडे. ते फणसावर आली की एकेक फणस चेपून बघीत नी शिर चाळवलेला पक्का जून फणस अचूक उमगून काढीत. मग दोन तीन वांदरीणी बोटानी उचकरून उचकरून चारखंड पेचीत नी एकेक गरा ओढून काढून खात. त्यांचा अगदी यथेच्छ फराळ चाले. जमिनीवर आठळांची नी पात्यांची पखळण व्हायची. वांदर निघून गेले की, उरला-सुरला भाग चान्या , कावळे खात नी सुकलेल्या पावी महिनोन् महिने

लोंबकळत रहात. गाववाले त्यांच्या उच्छादाने गांजले. वांदरांचा विषय निघाल्यावर आमचे आमचे आप्पा म्हणत की,"साधारण एक तपानंतर निसर्ग चक्रात म्हणा सामाजिक स्थितीत म्हणा काहीना काही परिवर्तन होत असते. ही वांदरांची विवशी आलीहे हा त्यातलाच प्रकार. एक तप सरले की चक्र फिरेल नी ही उपल्वट आपसूख कमी होईल..." कलमी आंबे म्हणजे उत्पन्नाची बाब. पन्नासपासून शंभर, दोनशे चारशे, पाचशे झाडं एवढ्या मोठ्या कलम बागा. त्यात राखणे बसवून घासलेटाचे रिकामे डबे वाजवून नी फटाके लावून वांदराना काय कर्म पळवून लावणार? सिझन पुरत्या करारावर बागा घेणारेसुद्धा वांदरांच्या भयाने बागा करायला तयार होईनात. करार केलेनीच तरी - "आदी शिजन पुरो होवने, वांद्रांच्या उच्छादात्सून काय ऱ्हवता नी कितपत आंग वाटावणी होता ती बगूया नी मग्ये काय तां देन....." अशी रड लावीत.

भलुखोतांची बाराशे कलमांची बाग सवत कड्याजवळ; गावदरी पासून जरा लांब. त्याना वांदरांचा उपद्रव सगळ्यात जास्त व्हायचा.लोक मळ्यात सलडी बांधून आडवस करायला लागल्या नंतर साधारण सुपारी एवढं तोर झाल्यापासून वांदर सड्यावर बसल धरीत. काळवं पडलं म्हणून राखणे वाटेला लागले की दडून ऱ्हायलेले वांदर बागेत शिरत... तिथेच मुक्काम करीत नी बागेची लंका करून सकाळी राखणे पाखडीपर्यंत आले की हुप्प् हुप्प् करीत पसार होत. दहा वर्षात कलमांचे पाचशे रुपयेपण उभे झाले नाय. वांदर आल्यापासून दरवर्षी त्यांच्या संख्येत वाढच होत होती. तरी एक बरं की, टोळीच्या म्होरक्या पोरांच्या शेपट्या वर करून तपाशी नी जे नर असतील त्याना हापटून टाकी. पोरांच्या आया पोरं वाचवायची शिकस्त करीत पण म्होरक्या हुपट अगदी टेळ ठेवूनच असे नी आयशीपासून पोर जरा बाजूला गेलं की धरूनहापटी. म्हणून वांदरांची संख्या थोडीतरी आरेखात ऱ्हायलेली होती.

जे सड्यावर तेच गावात. गावदरीतल्या झाड वाल्यानाही खायला आंबे मिळायची पंचाईत. कोणीतरी कातकरी (वांदरमारे) गावात आणून कायम

स्वरूपी बाळगायचा सल्ला दिला. भलुखोतानी वाडी प्रमुखाना बोलावून हा प्रश्न मांडला नी सगळ्यानी रुकार दिला. त्यावेळी फोंड्याजवळ कातकऱ्यांची मोठी वसती असायची. गोडकर गुरुजींची फोंड्याला सासरवाड, त्यांच्या मार्फतीन शंकर कातकरी, त्याची बायको रुकी नी पोरगा हरी अशी तिघंही आली. गावात नव्वद नांदता उंबरा होता. बिऱ्हाडागणिक वार्षिक आठ आणे पट्टी, प्रत्येक बिऱ्हाडा गणिक आळीपाळीने घरठेप दुपारची सहा भाकऱ्या दोन भाताची डिखळं नी भगुलंभर आमटी अशी वाडी द्यायची ठरली. वाडी न्ह्यायच्या निमित्ताने कातकरी दिवसाडी गावभर फिरत रहावा हा त्या मागचा मुख्य हेतू होता . भलुखोतानी त्याला सवत कड्याजवळ खोपटी बांधून रहायला दोन गुंठे जागा नी खोपटी बांधायला वासे, काठ्या, सुंभाचे बंद दिले. त्याने जमेल तसतसे वांदर मारून संपवायचे होते. बोली प्रमाणे पर्ल्या बामणाच्या घरापासून कातकऱ्याच्या वाडीची सुरुवात झाली.



काही असो पण कातकरी आल्या दिवसापासून वांदर कुठे दडी मारून बसले देव जाणे. बामणांचा अष्ट, घोरीप चिंच. हरीभटाची चिंच, गाबतडीतला ढोल्या वड, भरडातला नथू आग्र्याचा कळंब ही वांदरांची हुकुमी ठिकाणं पण कुठेच वांदर नजरेला पडेनासा झाला. शंकर तीरकामठा घेवून गावदरीत फिरे. रुकी नी हरी जेवणाची वाडी न्यायला येत. त्यांचा पायरव लागला की गावदरी पर्यंत आलेले वांदर सडा गाठीत. कातकरी सवत कड्यावर रहायला

लागल्यावर गावाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या दातकड्याकडे त्यानी आपला मुक्काम हालवला. वरच्या वाडीतली घरं संपून मधल्या वठारात दुपारच्या जेवणाची पाळी सुरु झाली. शंकर खोपटं बांधायच्या कामाला लागला. कातकरी आल्यापासून साधारण पाऊण महिन्यानंतर एक दिवस पल्र्याच्या घराजवळ अष्टावर वांदर आले. पल्र्याने लगेच गडी पाठवून शंकराला निरोप दिला. कुत्र्याच्या भुंकण्याने वांदर पळू नयेत म्हणून त्याला आगरात पार खाली न्हेवून बांधला. मध्यान्हीच्या टायमाला गडी नी कातकरी दोघेही आले. वारा खाडीकडून सड्याच्या दिशेला वहात असल्यामुळे वांदराना शंकराचा माग लागला नाही. तो दबकत दबकत पुढे येत होता. सगळी माणसं मजा बघायला अंगणात जमली. वांदर त्यांच्या कडेच बघित राहिलेले .

वांदर तीराच्या टप्प्यात आल्यावर शंकराने बाण सोडला. बारक्या फांदीवर बसलेल्या एका वांदरीणीच्या बगलेत बाण घुसला, त्याबरोबर ती हातभर पुढे उडवली पण लगेच हाताला मिळाली ती फांदी गच्च धरून ती जरावेळ लोंबकळत राहिली नी मग धप्पकन खाली पडली. तीला बाण लागल्या बरोबर डोळयाचं पातं लवण्यापूर्वी ‘किच्च किच्च किच्च’ असे आवाज काढीत धडाधड उड्या टाकीत वांदर सड्याच्या दिशेने पळाले . पल्र्या भलताच खूष झालेला. त्याने शंकराला जेवायला घातलंन. शिवाय दोन रुपये, पानं,सुपारीची खांडं, तंबाखू,भला खासा गुळाचा ढेपसा नी चार मुठी चहाची बुकी बांधून दिली. बामणीकडून लुगड्याचा धडपा घेवून सामानाचं गाठलं बांधून मारलेल्या वांदराची शेपटी धरून लोंबवीत शंकर खोपट्याकडे निघाला. जाताना वाटोवाट वाडी प्रमुखाना मारलेला वांदर दाखवीत तो संध्याकाळी घरी पोचला. वाटेत भेटलेल्या लोकानीही त्याला काय काय जिन्नस बक्षिस म्हणून दिले . घर गाठीपर्यंत मिळालेल्या सामानाचं मोठं बोचकं त्याला डोक्यावरून न्यावं लागलं.

त्यानंतर बरेच दिवस वांदर गावाकडे फिरकले नाहीत. पण मळ्यातल्या कडदणाच्या नी भाजीच्या मोहापायी वेगवेगळ्या वाटा शोधीत वांदर अवचित मळ्यात यायचे. गावात कुठेनाकुठे शंकर आलेला असायचा. त्याला वर्दी जायची नी तो येताना सुगावा लागला की वांदर पळत. तरीही वर्षभरात तीन वांदर त्याच्या तडाख्यात मिळालेच. एकदा तर कळपाचा म्होरक्या कचाट्यात मिळाला."पण तेला मारायचा नाय .... कळपात तो येकलाच नर हाय.... तेला मारला तर बियाणा नायसा व्हयील....."असे सांगून त्याने हुप्प्यावर बाण सोडला नाही. आंबा सिझनला वांदरांचा काहीच उपाधी गावदरीत झाला नाही. सवत कड्यावर कातकरी रहायचा तो भाग तर वांदरानी टाकलाच. दातकड्यावर मात्र किरकोळ दोनतीन बागात त्यांचा थोडा त्रास झाला. लोक असे हुषार.... शंकराच्या वासाला वांदर भितात म्हणून त्याला चांगले कपडे देवून त्याची नी बायको पोराची जुनी चिरगुटं बागेत नेवून उंच फांदीवर टाकून ठेवीत की मग त्या वासाने वांदर आत येत नसत . लोक आता निश्चिंत झाले. कातकाऱ्याला अन्नाची वाडी देण्यात कोणीच चाल ढकल करीत नसे. एखाद दुसरा खट सोडला तर घरठेप आठ आणे पट्टीही लोक खळखळ न करता देत नी रक्कम न दिलेल्यांच्या तुटीची भरपाई भलुखोत बिनबोभाट करीत.

सड्या माळावर गवत, कवळ, लाकडं आणायला गेलेल्या लोकाना कधितरी वांदर नजरेला येत. सड्यामाळावर बारमाही खाद्रपाची सोय नसल्या मूळे आता ते गावदरीत असताना सारखे चरबलेले दिसेनात नी त्यांची संख्यापण बरीच कमी झालेली असायची. बासष्ट साली दिवाळीच्या दरम्यान कोकणात मोठ्ठं जोऊळ (वादळ) झालं. खाडी किनाऱ्यावरच्या गावानी जोवळाचा दांडगा फटका बसला. बामणांचा अष्ट, घोरीप चिंच, हरीभटाची चिंच, गाबतडीतला ढोल्यावड, भरडातला नथू आग्र्याचा कळंब ही नावळ्यातली प्रख्यात असलेली मोठी झाडं तिन्हीसांजेला पहिल्याच तडाख्यात मोडून पडली. पुढच्या तीनचार तासात तर एकही उंच झाड शाबूत

रहिलं नाही. वादळात कोकणातली गर्द नी भरगच्च वनराई पार नष्ट झाली.गगनावेरी गेलेले उंचच्या उंच अष्ट, पायरी , कळंब, गोडे कांदळ नी सारीवले पार नाबूत झाले. वादळानंतर सड्या शिवरालाही वांदरांचा मागमूस कुठे दिसेना. ते जसे अकस्मात टोळधाडीसारखे आले तसे अयाश्चकर दिसेनासे झाले. आमचे आप्पा म्हणत, “ तेरा वर्षामागे वांदर आले नी त्यांचा उपल्वट सुरु झाला... आता आपसूख स्थित्यंतर झाले.....” पण वांदर संपले तरी पुढची काही वर्षं कातकऱ्याची दुपारची वाडी नी वार्षिक पट्टी सुरुच राहिली!

※※※※※※※※



# ०३. सापांचे दिवस

पुढिल दारच्या अंगणा पासून सात आठ हात अंतरावर पुरुषभर उंचीची डेग आहे . ती चढून वर गेले की सवथळ मरड लागते. त्याच्या कडेला काळयांच्या आगराची हद्द संपून सामाईक पाणंद लागते, नी त्या पलिकडे धारेला घडीव चिऱ्यानी बांधलेल्या पारावर वडा पिंपळाची दोन जुनाट झाडे आहेत. आमच्या काळे घराण्याच्या नवव्या पिढित समाधी घेतलेले आमचे पुर्वज ‘ स्वामी’ त्यानी ते वड पिंपळ लावून घडीव चिऱ्यांचा पार बांधून घेतला नी पिंपळाची मुंज केली अशी आख्यायिका मोठी माणसे सांगतात. पिंपळाच्या टिकाळीला घारी गरुड घरटी बांधित. पिंपळाचा एक फाटा वाळून कोळ झालेला नी त्याच्यावर कांडेचोरांच्या ढोली असायच्या. त्यांत कांडेचोरानी वीण घातली की महिनाभराने भर दिवसा त्यांची पिलावळ फांद्याफांद्यांवर दडाकुकू नी धावाधावी खेळायची. त्यांचा धिंगाणा चालु झाला की फांद्यांच्या बेचक्यातून नांदणाऱ्या चान्या भयाने सरसरत उंचावर सुरक्षित जागा धरून शेपटे फुलवून मोठ मोठ्याने च्रुक् ऽऽ च्रुक्क ऽऽ च्रुक्क असा आवाज काढीत रहात.

फांद्यांवरून दबा दबा धावणाऱ्या कांडेचोरांच्या पिल्लाना हुसकावण्यासाठी आम्ही अगदी हात मोडेपर्यंत दगड मारायचो. पण आमचे दगड इतक्या उंचीवर कसले पोचतायत्! पण बाणे वाडीतल्या नायतर सप्ते वाडीतल्या कोणातरी थोराड पोरांचे दगड मात्र वरपर्यंत पोचायचे. क्वचित एखादा दगड पिल्लाला लागायचा सुद्धा . दगडांच्या सडाक्याने भेदरलेली पिलावळ गबागबा ढोलीत दडी मारायची. आम्हा पोराना खूप मजा वाटायची. दुपारी वडिलधाऱ्या माणसानी टकली टेकलेनी की, आम्हाला रान मोकळे व्हायचे नी आम्ही तडक पार गाठायचो. वडाच्या पारंब्यांवर झोके घे, सूर

पारंब्या सारखा ‘पुडेक’ खेळ असा नुसता हुदुदू चालायचा. झोपलेल्या माणसांपैकी खालची काकू (म्हंजे काकूआज्जी) सगळयात आधी चाळवायची. ती उठल्या उठल्या “आँक्क.... छी .... छडाक्क” अशी दणदणीत शिंक द्यायची. त्याला मोठी माणसे तोफ झडली असे म्हणत. तिच्या शंकेचा आवाज हा आम्हां खेळणाऱ्या (मोठ्यांच्या भाषेत जीव घालवणाऱ्या) पोराना इशारा असायचा, नी आम्ही लगेच खेळ बंद करून दडदडत मोठी माणसं उठण्यापूर्वी साळसूदपणे घर गाठायचो. एकदा असेच घरी येत असताना डेगेवरच्या चिव्याच्या बेटाकडे एक भले मोठे लचांड सळसळत गेलेले दिसले . त्याबरोबर घाबरलेल्या बाळक्याने “ बापू ..... धाव..... साप... साप” अशी बोंब मारली.

एक हात डोळयावर आडवा घेवून, चवाळीचा ओला पंचा पांघरून पुढील दारी झोपाळयावर ‘घुर्रर .... फुस्स...’करीत आडवे झालेले बापू काका साप हा शब्द कानात पडताच तट्कन् उठून बसले. दाराआडची कऱ्ह्याची काठी ओढीत त्यानी इतर मोठ्या माणसाना ‘चिव्याच्या बेटाहारी साप आलाहे रे’ असे हाकारे घातले. अन दीड दोन मिनिटात दहा बारा माणसांची जमात दरड चढून वर आली. मग आबानी आम्हाला साप कुठे ... कधि दिसला अशी चौकशी केल्यावर सगळे सावधपणे बेटाच्या दिशेने निघाले. तशी आमचाही धीर चेपला नी आम्हीही त्यांच्या मागून निघालो. सगळयांच्या मागून अवकासाने येणारे दमेकरी आबा ओरडले, “पोरानो सगळेजण आधी मागे व्हा बघू भोसडीच्यानो, साप म्हंजे काय खायची कामे वाटली काय रे तुम्हाला ? ” नी ते तिथेच एका सप्पय दगडावर टेकले.

आता मोर्चेबांधणी सुरु झाली. “विनू (आबा हे सगळयात मोठे म्हणून ते अप्पां सकट सगळयाना नाव घेवून अरे तुरे करीत) तू हिगडे डाव्या कुशीला ऱ्हा , बापू तू पलिकडच्या अंगाला ऱ्हा, सदू - वासू तुम्ही मध्ये थांबा; पुर्षातू बापुच्या कडेला नी धोंडू तू कांबेरू घेवून विनू सोबत ऱ्हा. बबन तू दरडीखाली जावून

थांब, न जाणो भेदरलेले जनावर दरडी खाली दखी घालून घेईल .... काय नेम सांगता येनार नाय... ” बसल्या जागेवरून बूडही न चाळवता आबांनी सुचना दिल्या.



काळयांच्या घरवडीत ते पोक्ते पुरवते! सगळे जण त्यांचे आयकत. आबांच्या सुचनेप्रमाणे जागा धरल्यावर बेटाच्या मुळातला पातेरा हुसकीत बापये सापाला हुडकायला लागले. थोडा वेळ गेला नी “ बबन सावध ऱ्हा रे साप डेगे खाली उतरतोहे बहुतेक ” असे आबांचे वाक्य पुरे होण्या आधीच साप घसाक्कन सरसरत डेगेखाली अंगणात उतरला सुद्धा ! सावध असलेल्या बबनने साप पुढे सरकण्यापूर्वीच काठीचे दोन सणसणीत तडाखे वर्मी लगावले. आबा ओरडले “त्याचे मस्तक फुटले काय बघ नी पुरे कर आता उगाच त्याची चिचण करू नको. ” तेवढ्यात बबनची आई , धाकटी काकू लाशी सारखी पुढे धावत आली नी बबनचे बचकोट धरून त्याला मागे खेचीत म्हणाली , “तू कशाला

पुढे धावलास रे... ? भलतेच अतिरेकपण करणे चांगल्याचे नाय हो .... बरें तर बरें, उगाच नेम बीम चुकला असता तर जीवाशी बेतले असते... !” हे तिचे नेहेमीचेच असे.... कामाधंद्यात सुद्धा आपल्या मुलाना तकस लागू नये म्हणून ती नेहेमी दक्ष असे.

एवढा मोठा दीड वाव लांब कृष्ण सर्प पहिल्यांदा मारण्याचा मान आमच्या वखलात बबनला मिळालेला. त्या पूर्वी मारलेले साप दीड दोन हात लांबीचे, हळदव्या रंगाचे ‘अक्करमाशे’ असायचे. काळा कृष्ण सर्प आमच्या भागात सहसा आढळत नसे. साप उताणा करून आबा त्याचे ‘पारे’ म्हणजे ‘प्रहर’ निरखू लागले. सापाच्या तोंडापासून सहा एक आंगूळ अंतरावर काळसर रंगाचे दोन पूर्ण नी एक अर्धा असे पट्टे दिसले. हा साप अडीच प्रहराचा निघाला. म्हणजे याचा दंश झाला तर माणूस अडीच प्रहरात मृत्यूमुखी पडला असता. आमच्या भागात दीड , दोन , अडीच किंवा तीन प्रहर असलेले साप असायचे. आता डोळ्यांवर पाण्याचे सपकारे मारून , खळखळावून चुळा भरून खांद्यावरच्या फडक्याने तोंडे पुशीत सगळी पुरुष मंडळी आमच्या सोप्यात शिरली. आम्ही पोरे त्यांच्या गप्पा ऐकायला जमिनीवर फतकल मारून बसलो. माझ्या आईचे करणे सवरणे चांगले नी तिचा हात पण मोठा म्हणून कायतरी निमित्त झाले की आबा, बापू काका हक्काने तिला सांगायचे “ सुने, जरा आलें - बिलें घालून चांगला ठसठशीतसा चहा कर बघू.... ” आईने झटपट चहा गाळून कप भरल्यावर आप्पानी स्वत: परातीत कप भरून सगळ्याना नेवून दिले. भुरके मारीत चहा पिऊन झाल्यावर पान जमवता जमवता या पुर्वी कधि कुठे नी कसे साप मारले त्या गप्पा रंगल्या. दरवेळी साप मारून झाल्यावर मोठ्यांची अशी गप्पाष्टके रंगायची. काकू आज्जी मात्र या असल्या गप्पाना ‘ चर्वित चर्वण’ नायतर ‘एरंडाचे गुऱ्हाळ’ म्हणायची. पण आम्हा पोराना मात्र ते आवडत असे. आम्ही जीवाचा कान करून ह्या गप्पा ऐकत असू. पुढे मोठेपणी या गप्पांचे महत्व प्रकर्षाने जाणवले. त्या गप्पा नुसते भुशाचे मळण नव्हते. त्या

मधून खूप मौलिक माहिती उलगडायची. सापांची ठीवे कुठे आढळतात, ती कशी ओळखायची, त्यांचा रहिवास कसा ओळखायचा ? सर्प विष उतरणाऱ्या औषधी वनस्पती कोणत्या? त्या कोठे सापडतात ? अशी चतुरस्त्र माहिती त्यात असे. एवढेच नव्हे तर सर्पा विषयीचे लोकभ्रम, सर्पाविषयीचे पौराणिक संदर्भ, नाग देवतेची उपासना पद्धती, स्तोत्रे अशी सर्वस्पर्शी माहिती एरंडाच्या गुऱ्हाळात मिळे नी त्याहीपेक्षा आम्हां पोरांच्या मनातली दडस कमी व्हायची.

मुळात आमचे काळ्यांचे अख्या गावात एकच घर ! पण तिसऱ्या पिढीत गोविंद आणि गोपाळ या सख्ख्या भावांचे आपापसात पटेना. वितुष्ट एवढ्या टोकाला गेले की, आगर अर्धे अर्धे वाटून घ्यायचे , एकाने जुन्या घरात रहायचे नी दुसाऱ्याने त्याच्या हिश्शाच्या भागात स्वतंत्र घर बांधून रहयचे असे ठरले. पण घरभाटाचे दोन भाग कुठून कसे करायचे यावर खडाजंगी सुरु असताना आगराच्या मध्यात असलेल्या ढोल्या फणसाच्या मुळातून दोनेक वाव लांबीचा नाग सरसरत आला. तो फणा पसरून थोडावेळ डोलला नी नंतर पुन्हा सरसरत आगराच्या टोकापर्यंत जावून मळ्यात नाहिसा झाला. तो गेला त्या जागी सकेर बाजूला होवून मातीत पट दिसू लागला. दोन्ही बंधूना या संकेताचा अर्थ उमगला. नागराजाने आखलेल्या मार्गावर सीमा निश्चित करून मूळ घर मोठ्याने घेतले नी पलिकडचा भाग धाकट्याने घेवून स्वतंत्र घर बांधले. तेव्हा पासून आमचे वखल हे वरचे काळे नी आगराच्या खालच्या अंगाला असणारे ते खालचे काळे म्हणून गावात रुढ झाले. गोविंद गोपाळ यांच्या पश्चात मात्र पुढच्या पिढ्यांमध्ये तेढ उरली नाही. वेळे गरजेला हातातले काम टाकून एकमेकांच्या मदतीला जायचे नी दोन्ही वखलांमध्ये जो कोणी वडिलधारा असेल त्याचा शब्द उभयपक्षी मानायचा हा रिवाज पडला. उभय पक्षी कुठेही कार्य कर्तूक असले तर पूर्व तयारी पासून तो कार्य उलगे पर्यंत एकीकडे चूल पेटायची. ही प्रथा आजतागायत माझ्या नवव्या पिढीतही निर्वेध सुरू राहिली आहे.

आमचे घरभाट मळयाच्या कडेला. त्यात आणि आगरभर पानाची बीये नी केळी लावल्यामुळे बारमास थंडावा. आगरभर हिरव्या- पिवळया नी लाल रंगाच्या असंख्य पिटपिट्या बेडक्या आढळायच्या. मेरेच्या कडेला तर उंदराचे आदस्थान ! उंदिर नी बेडक्या म्हणजे सरपटणाऱ्या प्राण्याना जसे आमंत्रण! दर चार – आठ दिवसानी कुठे ना कुठे कोणीना कोणी किरडू हुकमी आढळायचेच. सगळीच किरडवे विषारी नसतात.आधेल/ दिवड, वानेरू, पाणसाप/ वयाळे, सर्प टोळ याना आम्ही चुकुनही मारीत नसू. वानेरू तर खेपेने सात- सात आठ- आठ निघायची. पण त्याना कुणीच मारीत नसे. फुरशी, डुरवे नी कुसडे घोणस, मण्यारी, नानेटे , कांडर , अक्करमाशी साप , नी वीतभर लांबीचे दाभणे साप / तक्षक या जातीचे साप विषारी . मण्यारी सहसा चावत नसत , पण त्यांची सावली पडली (त्यांच्या उच्छवासातून विष कण बाहेर पडतात, त्यांचा संपर्क झाला की) माणसाला श्वास घेणे कठिण व्हायचे, छाती कोंदायची , हळू हळू अंगावर ढाणे उठायला लागायची. अशावेळी रुग्णाला योग्य उपचार मिळाले नाही तर श्वासावरोध होवून तो दगावू शकतो. कांडर , नानेट्या यांचा सर्रास वावर वेलींवर असायचा.

विषारी किरडू कधीही कुठेही उमगले तरी काळे मंडळी त्यांचा पिच्छा पुरवायची. हातातला कामधंदा टाकून ते विषारी किरडू शोधून काढून त्याला मारणार म्हंजे मारणार. आगरात मेरे कडेला उंदरांच्या बिळात शिरलेला साप बाहेर पडण्या साठी मिरच्यांची - जांभीच्या (काजू) बीयांची धुमी करून धुर बाहेर पडेल ती छिद्रे चोंदून आम्ही बीळ संपे पर्यंत खणती घेत असू. हा उद्योग काही वेळा विरड विरड क्वचित पुरा दिवस चालायचा. अशा वेळी एकेक बापया आळीपाळीने जेवून यायचा. पण किरडू मिळेपर्यंत काम निर्वेध सुरु रहायचे. हे करणे योग्यच होते. कारण फुरशाचा दंश आणि मण्यारीची विषबाधा यावर प्रभावी वनौषधी उपलब्ध आहेत. पण अन्य विषारी सर्पदंशा वर अशी वनौषधी आजही उपलब्ध नाही. एंजेक्षन सुद्धा ठराविक मुदत उलटल्यावर

निरुपयोगी ठरते. आम्हा काळ्यांना निरुद्योगी माणसांचा मनस्वी तिटकारा. रिकामपणी चकाट्या पिटित बसणे, काम धाम सोडून वायफळ उद्योगात वेळ दवडणे याचे आम्हाला अतीव वावडे. म्हणून कुठे लग्न मुंजीला गेले तरी अक्षत पडली जेवणावळ झोडायला तासन् तास दवडण्या पेक्षा यजमानाला आढळीत रहाण्याच्या फंदात न पडता. काळे मंडळी घरी येवून आमटीभात खाणे पसंत करायचे. रात्री सत्यनारायणाची पूजा, मंत्रपुष्प अशा कार्यक्रमाना गेल्यावरही मुख्य कार्यक्रम उरकल्यावर पत्त्यांचे डाव न मांडता काळे मंडळी घर गाठणार. एकदा तर म्हणे आमची पुरुष मंडळी कुणाकडेशी षष्ठी पुजनाला गेलेली. तो यजमान म्हणजे हालगे मालगे, होते आहे.....चालले आहे अशातला ! सगळा संथ कारभार . माणसे जमली. दीड दोन तास उलटले तरी घुगऱ्यांचा पत्ता नाही . मग कंटाळून काळे मंडळी घुगऱ्या न खाताच उठून घरी आली. ही आख्या खालची काकू आज्जी अगदी रंगवून रंगवून सांगायची.

मराठी शाळेत असताना आम्ही मधल्यासुट्टीत देवराईत मजायचो. तिथे सुरंगीची गर्द झाडकळ असायची . जुनाट सुरंगीच्या खोडात पोपट,साळुंख्या, सुतार पक्षी यांच्या ढोली असत.अशाच एका बेताची उंची असलेल्या झाडावरच्या ढोलीतून एक पोपट बाहेर पडताना दिसला. आमच्या वर्गातला सतीश कांडले भारी उपद्व्यापी. तो लगेच सुरंगीवर चढला. त्याने ढोलीत हात घालून बघितल्यावर तीन अंडी हाताला लागली. आता आम्हाला एक नवीन व्यवधान मिळाले. दर एका दोन दिवसानी आम्ही देवराईत गेलो कि सतीश सुरंगीवर चढून धोलीत हात घालून बघायचा. दहा बारा दिवसानी अंडी फुटून पिल्ले बाहेर आली. आता सतीश ने झाडावर चढून ढोलीत हात घातला कि आई आली असं समजून पिल्ले च्रॉं .... च्रॉं असा आवाज करीत. त्यांचा आवाज झाडाखाली थांबलेल्या आम्हां पोरानाही ऐकायला यायचा.

घोडेमुखाच्या जत्रेच्या सुट्टी नंतर आम्ही शाळेत गेलो. त्या दिवशी आमच्या तिसरीच्या वर्गाचे लोके गुरुजी रजेवर गेलेले. आम्ही पाट्या बाहेर

काढून अभ्यासाचे ढोंग करीत फुली शून्याचा खेळ सुरु केलेला. कोणीतरी धोलीतल्या पिलांचा विषय काढला. मग लघवीच्या सुटीत आमची दहा बारा जणांची फरड देवराईत शिरली. सतीश नेहेमी सारखा सुरंगीवर चढला. त्याने ढोलीवर हाताने फटका मारला . नेहेमी असे केल्यावर आतल्या पिल्लांचे च्राँ ... च्राँ सुरु व्हायचे पण आज काहीच आवाज येईना.“ पिलां भडवी झोपली हतशी वाटता” असे म्हणत त्याने ढोलीत हात घातला मात्र..... “आय्येऽ ग्येऽऽ कायतरी चावला सा वाटता ” असे म्हणत त्याने झटक्यासरशी हातबाहेर काढला नी तो खाली उतरला. त्यावेळी ढोलीतून किरडवाने टोकरी बाहेर काढलेली आम्हाला दिसली . कोणी तरी दगड मारल्यावर सापाने फणा पसरली आणि आम्ही घाबरून धूम ठोकली. मग कोण धावाधाव झाली नुसती. शाळे जवळच्या घाडी वाडीतला खेमाजी घाडी वैदगिरी करी त्याने विष वर चढू नये म्हणून कसलासा लेप त्याच्या हातावर काढला.

दरम्याने वाडीतल्या बापयानी डोळी बांधून आणली. सतीशला डोळीत घालून सगळे मोंडात जायला निघाले. त्यावेळी मोंडातले पोकळे डॉक्टर पुऱ्या दशक्रोशीत सर्पदंशाच्या रुग्णावर हुकमी ईलाज करणारे एकमेव डॉक्टर! जवळजवळ साताठ मैलांची चाल मारून माणसं मोंडाच्या सड्यावर भैराईच्या देवळा जवळ पोचली. चाल मारून दमलेले खांदेकरी जरा इस्वाटा घ्यायला म्हणून देवळाजवळ थांबले. नी सतीश आचके द्यायला लागला. त्याला पाणी पाजीत असतानाच त्याने मान टाकली नी खेळ खलास झाला.

सराईला भात कापणी झाल्यावर नी भरडात नाचण्याची कणसे वेटताना मेरेच्या कडानी हारीने उंदराची बीळे दिसायला लागत. अशावेळी किरडवांची खूप भिती - म्हणून अशा ठिकाणी कामाला जाताना हातात काठी घेवून जायचा शिरस्ता असे. सराईच्या वेळी तर किरडवांचा नुसता सुळसुळाट असे. तेंव्हा गोठ्या बाहेर , संडासाच्या खोरणा जवळ, विहिरीकडे दोणी जवळ नी आगर-घरभाटात ठिकठिकाणी हुकमी सापडाव्या म्हणून कायम काठ्या ठेवलेल्या

असत. हा रिवाज सगळेच अगदी कटाक्षाने पाळीत. म्हणून कुठेही साप-किरडू उमगले की ते सहसा जिवंत सुटून जात नसे नी पोराबाळाना धोका रहात नसे. या काठ्यासुद्धा विशिष्ठ प्रकाराच्या असायच्या. आवती किंवा मलकी चिव्याच्या , निगडीच्या, आंजणीच्या किंवा कऱ्ह्याच्या जून - जडशीळ, पायाच्याआंगठ्या एवढ्या जाडीच्या खास शोधून आणाव्या लागत. अडीच ते तीन हात इतक्या बेतवार लांबीची किंचीत बाक असलेली ( सरळ सूत काठी जमिनीवर मारली तर हाताची बोटे चिंबटण्याची शक्यता असे) चांगली जून काठी निवडून घासून तासून गुळ गुळीत करून उजू करावी लागायची. जनावर



किरडू मारल्यावर नारळाच्या किशीने घासून धुवून पुसून परत जागच्या जागी ठेवण्याकडे कटाक्ष असायचा.

गिमात (एप्रिल मे चा काळ) आंबे, काजू. करवंदे, चारणे आणायला आम्ही आडीत- सड्या शिवरात फिरून यायचो. अशावेळी दोन-तीन खेपा झाल्या कि दुखाव्याचा साप गेलेल्यांचा माग काढीत घरापर्यंत आला नाही असेसहसा होत नसे. एकदा आमच्या विजू आक्का कोनीत फिरून जांभीच्या बिया ,बोंडू नी पडीचे आंबे घेवून आल्या. रात्री मागिलदारी त्या भांडी घाशीत असताना चिकवीणीच्या मुळात असलेल्या नळयांच्या ढिगातून फुस्स ऽऽ फुस्स ऽऽ असे आवाज आल्यावर त्यानीघाबरून मोठ्या माणसाना हाका मारल्या. जवळ जवळ अर्ध्या

पडवीच्या छपरावरचे नळे उतरून रचलेला ढीग..... कंदिल बॅटऱ्या घेवून सगळे मागिलदारी जमले. नळयांचा ढीग हालवून बाजुला रचून झाला. आता जमिनीवर फुटक्या नळयांची खापरे विखुरलेली शिल्लक राहिली. अप्पानी सुचना केली, “आता अवघाती हात घालू नका. काठीने फुटके बाजूला करा. ” थोडीशी फुटके चाळवल्यावर आंगूळभर फटीतून जनावराच्या पोटवळाचा भाग दिसला. आप्पानी सप्पकन् कांबेरू मारून दाबून धरल्यावर तोंडवळाचा भाग बाहेर काढीत फुस्कारा टाकून सापाने फणा फुलवला. धोंडूकाकाने नेमका तडाखा मारला तो सापाच्या मस्तकावरच. एकाच फ़टक्यात साप लोळा-गोळा होवून पडला. अडचणीच्या जागी, सांदी फटीत उमगलेले जनावर जख़डून ठेवायला चौधारी कांबेरू म्हणजे हुकमी एक्का! त्याची अणकुचीदार टोके किरडवाच्या अंगात रुतली की ते जखडबंद झालेच समजा! मात्र जनावरावर फटका मारताना तो अवघाती कांबेरूवर बसणार नाही एवढे पथ्य पाळले की बस्स!

त्यावर्षी गोम्या बंडब्याला खंडाने कसायला दिलेले भरडातले दळे आम्ही काढून घेतले. त्यावरकस जमिनीत मजुरीने जोते लावून आम्ही नाचणा टोवला. दसरा झाला आणि आमची फरड कणसे वेटायला भरडात गेली. अर्धा भांगा वेटून झाला आणि नाचण्याच्या धाटांमध्ये सुस्त पडलेले दोन वाव लांब नी पायच्या पोटरीएवढे जाड जनावर उमगले. आम्ही चार भावंडे नी आप्पा....एवढे जनावर कसे मारणार? मी धावत जावून घरी वर्दी दिली . मग बापू काका, बबन, सोन्या नी धोंडू काका, काठ्या कांबेरू घेवून आले. दोघानी दोन कांबेरू - एक तोंडा जवळ नी दुसरे त्या मागे दीड हातअंतरावर मारून जनवराला जखडून धरले. नी बाकीच्यानी कणसे झोडतात तसे धडाधड काठ्यांचे दणके मारायला सुरुवात केली. जनावर एवढे जबरदस्त की कठ्यांच्या दणक्या गणिक त्याने अंग फुलवायला सुरुवातन केली. “हे लचाण्ड काठ्यानी मरणारे नाय रे विनू ” म्हणत बापूकाकानी कुदळ घेतली आणि त्या

जनावराच्या तोंडवळा कडचा भाग छिन्न विछिन्न करून टाकला. ते जनावर आर म्हणजे अजगर होता. त्याला मारायला खरेतर बंदूकच लागते.

आम्ही सातवीत असताना वरंडावरच्या रानडे बाई बदली होवून आमच्या शाळेत हजर झाल्या. वरच्या वठारात बाबा दिक्षितांच्या घराजवळ त्यांच्या चुलतभावाचे छोटेखानी दोनखणी घर, ती माणसे मुंबईत स्थायिक झालेली. ते घर भाड्याने घेवून बाईनी तिथे बिऱ्हाड थाटले. त्यांच्या मागिलदारी पडवीत पाणी तापवायची थाळी नी मोरी आणि बाजुला जुनेवासे, खांडबारे, सऱ्या नी रिफांचे बलाट डाळलेले. त्यावर्षी बाबांच्या मुलीची मंगळागौर झाली. सगळयांबरोबर पत्री काढायला रानडेबाई आडवणात गेलेल्या. त्या रात्री जेवण -खाण झाल्यावर बाई भांडी घासायला मोरीच्या कठड्यावर बसलेल्या असताना बलाटातून सापाने हळूच टोकरी काढून फुत्कार टाकल्यावर घाबरून बाईनी आरडा ओरडा केल्यावर माणसे जमली. बलटाखाली सांदी फटीतून बॅटऱ्यांचे फोकस मारून शोढ घेतला पणजनावर काही उमगले नाही. तासभर शोधाशोध करून माणसे परत गेली. दुराऱ्या दिवशी संध्याकाळी शाळेतून आल्यावर बाई पाय धुवायला गेलेल्या असताना पुन्हा सापाने बलाटाबाहेर टोकरी काढून फुत्कार टाकले. पुन्हा माणसे जमली. पण शोध घेतला तरी जनावर काही उमगले नाही. एवढे मोठे बलाट तरी कसे कोसळणार? मग कोणीतरी धुमी करायची शक्कल काढली . शेणी पेटवून मिरच्यानी जांभीच्या बीया घालून बलाटाच्या तळी दमदार धुरी केली. सगळी पडवी धुराने भरली. पण जनावर बाहेर पडताना काही उमगले नाही. त्या नंतर पंधरवडाभर जनावर दिसले नाही. धुरीला भिवून जनावर पळून मार्गस्त झाले असा बाईंसकट सगळयांचाच समज झाला. बाई ही घटना विसरूनही गेल्या. त्यानंतर आठवडाभराने सकाळी उठून मशेरी लावीत बाईनी मागिलदार उघडून उंबऱ्या बाहेर पाय टाकला मात्र.... उंबऱ्याबाहेर दबा धरून राहिलेल्या सापाने पायाची दवण शीर धरूनच दंश केला. बाईनी प्राणांतिक बोंब मारली. बाबांच्या आणि

बाजुच्या घरातली माणसे धावत आली. बाई उंबऱ्या जवळच बसलेल्या.... आजू बाजूला शोध घेतल्यावर मात्र अंगणाकडेला कर्दळीच्या गजकटात जनावर मिळाले. बाईना मोंडात डॉक्टरांकडे न्यायला माणसानी डोळीची बांधाबांध सुरु केलेली असतानाच बाईंची प्राणज्योत मालवली.

मिरजेतले आमचे काका दिवाळी- मे महिन्यात सुटीला मुलाबाळांसह घरी यायचे. काकूचे माहेर तिकडे सांगलीलाच. तिला कोकणात आल्यावर तिन्हीसांजा झाल्यावर भिती वाटायची. साप किरडवाना तर ती जामच घाबरायची. कुठल्याही सरपटणाऱ्या जनावराला ती 'जीव ' म्हणायची. आगरात फिरणारे आधले (धामण) बघून तिने बोंबच मारली. "बाई बाई बाई ..... केवढा मोठा जीव तो.... माझी तर पाचावर धारण बसली... अगदी प्राणच कंठात आले " ती आईला सांगू लागली. आम्ही पोरे तिचा जीव हा शब्द धरून तिला चिडवीत रहायचो. आमच्याकडे कुळवाड माळवाड बाया, बापये सुद्धा नाग सर्प या नावाचा उच्चार करणंही टाळीत. त्याचा उल्लेख 'मोटो' किंवा 'थोरलो ' असा करीत. तसे काकूही साप/नाग हे नावही घेणे टाळायची. रात्री जेवणे उरकल्यावर सोप्यात मध्ये कंदिल ठेवून आम्ही आठजणे दोन कॅट एकत्र करून झब्बू खेळत बसलो.

काकूही आमच्या सोबत खेळायला बसलेली. हातातल्या शेवटच्या गुलामाचा झब्बू देवून "चला सुटले बाई...आता कोणाचा नंबर लागतोहे बघूया "असे म्हणत काकू जरा बाजूला सरकली. नेमका त्याचवेळी भिंतीकडेच्या भाताच्या कणगीखालून मोठे पिवळे धम्मक जनावर बाहेर पडले.आम्ही नुस्ती बोंबाबोंब सुरुकेली नी त्या गडबडीत जनावर भेदरून कोपऱ्यातल्या मोरीत शिरले. आमची मोरी एक दिव्यच होते. आम्ही बॅटरीचा फोकस मारल्यावर साप मोरीच्या मुशीत रिगला. प्रसंगावधान राखून मी धावतच बाहेर गेलो तिथेच गावलेला गोणपाटाचा तुकडा चुरगाळा करून तो बोळा मुशीत चोंदला.

दोन-तीन मिनिटातच मोठी माणसं जमली. बॅटरीचे फोकस मारून नीट काळजीपूर्वक निरखून बघितल्यावर मुशीत सापाच्या पोटवळाची दुडत दिसली. काकानी शक्कल लढवली. काठीला चिंध्या गुंडाळून त्या पलित्यावर रॉकेल नी गोडेतेल ओतून तो पेटता पलिता मुशीत घातला. युक्ती लागू पडली. ज्वाळांची झळ लागताच साप मुशीतून बाहेर पडला नी वासूच्या कांबेरूच्या तडाख्यात गावला. तिथे काठी मारण्यासारखी नव्हती. त्याला पलित्याचा होरपळा देवून जितेपणीच धगवून मारला. दुसरे दिवशी आम्ही जमिनीत खड्डा खणून त्यात त्याचे वेटोळे ठेवून वर जानवे नी पैसा सुपारी ठेवून त्याला मूठमाती देत असू. त्या घटनेची काकूने एवढी दडस घेतली की त्यानंतर ती कधिही वस्तीला घरात राहिलेली नाही.

मध्यंतरीच्या काळात आम्ही मुले शिक्षण नोकरी या निमित्ताने दाही दिशाना पांगलो. आबांचे घर तर बंदच झाले. त्यांचा मुलगा अंतू कलकत्त्याला प्रायव्हेट कंपनीत नोकरीला लागला. त्याने तिकडचीच बंगालिण बायको केलीन. आबानी त्याचे नावच टाकले. लग्नानंतर बायकोला घेवून पाया पडायला आलेल्या अंतूला पाणी सुद्धा घेऊ न देता त्यानी अक्षरश: हाकलून लावले. तो जो गेला तो आबा निवर्तल्याची तार केल्यावर तिसऱ्या दिवशी आला. दिवस कार्य झाल्यावर आईला घेवून घराला टाळे मारून तो जो गेला तो पुनश्च गावी आला नाही. वरच्या घरात सुद्धा बापू काका काकू नी त्यांचा शाळामास्तर मुलगा वासू त्याची बायको नी दोन मुलं , आमचे आप्पा नी आई एवढीच माणसे राहिली. आम्ही दोन्ही भाऊ नोकरीनिमित्त मुंबईत स्थायिक झालो. कधितरी सुटीला चार दिवस घरी जाऊन येतो इतकेच.

आमच्या ठिकाणासह सगळ्याच गावाचा नव्हे तर पुऱ्या देवगड तालुक्याचाच चेहेरा मोहरा पार बदलून गेला. खायच्या पानाची बीये, केळी नी माड पोफळीही कधिच मारून झाली. आता आगर लख्ख उघडे झाले ले आहे. मळ्यात सुद्धा चुकार न कुठे कुठे भात शेती केलेली दिसते, बाकी दळे पड

टाकलेले आहेत. पूर्वी पाऊस काळ सुरु झाल्यावर मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूशनची व्हॅन देवगडला येवून हजारो फुरशी प्रतिविष बनविण्यासाठी घेवून जात. सड्यावर इतस्तत: पडलेले दगड उचलले तर दर दोन तीन दगडांखाली हमखास फुरशी मिळायची पण आता नांदगाव पासून देवगडला जाई पर्यंत पुरा सडा पार स्वच्छ झाला... तिथे एन. ए. प्लॉट पाडून हजारो खाजगी बंगले नी हौसिंग कॉलन्या उभ्या राहिल्या. इतर गावानी सुद्धा कातळात ब्लास्टिंग करून डबरे पाडून त्यात माती भरून हापूस कलमे लावलेली आहेत. करवंदी, आंजणी, उक्षी, पंचकोळी, तिवरे डोळी या झाळींचा अगदी मागमूसही राहिलेला नाही. सापांचे दिवस कधीच इतिहास जमा झाले . मुलाना तर आमच्या खणकथा खऱ्याच वाटत नाहीत.

※ ※※※※※※※※



# ०४. भाव तोची देव

“भाव तोची देव भाव तोची देव ये अर्थी संदेह धरू नका। “मंगलाचरण झाले आणि अंबूताईनी नाथांचा भंग निरूपणाला घेतला. अंबूताई या काही व्यासंगी कीर्तनकार नव्हत्या. अकाली वैधव्य आल्यावर पंचवीस तीस माणसांच्या कुटूंबात मोलकरणी सारखे लाजिरवाणे जिणे हे खरे तर त्यांचे प्राक्तन! माहेरची परिस्थिती यथा तथाच.....त्यामुळे सासरी नणंदा जावांच्या धाकाखाली मुठित नाक धरून आला दिवस ढकलणे भाग होते.हे भवितव्य ओळखून त्यांच्या चुलत सासऱ्याने त्यांच्या योगक्षेमाची शाश्वत सोय लावण्यासाठी त्याना पांगऱ्याच्या दत्त मंदिरात सेवेकरी म्हणून रुजू केले. संस्थानचा कारभार पहाणारे दत्तावधूत स्वामी हे अंबू ताईंच्या चुलत सासऱ्यांचे गुरू. त्यानी स्वामींकडे शब्द टाकला आणि अंबूताई मठात सेवेकरी म्हणून रुजू झाल्या.

दत्तावधूत हे साक्षात्कारी पुरुष म्हणून आसमंतात प्रसिद्ध होते. मठाचा कारभार स्वच्छ असल्यामूळे मठाला उदार लोकाश्रय लाभलेला होता. मठात कायम भाविकांची वर्दळ असायची. मठात दैनंदिन व्यवस्था पहाण्यासाठी सुमारे तीन महिला आणि बावीस पुरुष सेवेकरी मठात कायम वास्तव्याला असायचे. दस्तुरखुद्द स्वामी, पर्शुरामशास्त्री लळित, बंडूबुवा जोग आणि फडकेशास्त्री हे चौघे वगळता उर्वरित सगळ्या सेवेकऱ्याना मोफत भोजन, निवास सुविधेसह रोख पंधरा ते पंचवीस रुपये वर्षासन दिले जात असे. तो स्वस्ताईचा काळ होता. अंबूताईना मुदपाक खाना आणि दैनंदिन पूजेची व्यवस्था या जबाबदाऱ्या देवून वीस रुपये वर्षासन ठरले. नवरा वारला त्या वेळी

अंबूताईंच्या पायाखालची वाळूच जणु सरकली..... आता लाजिरवाणे आश्रिताचे जीणे नशिबी आले म्हणून त्या भलत्याच धास्तावलेल्या होत्या. मठाच्या सेवेत सन्मानाने रहायची संधी मिळाली या जाणीवेने मठात रुजू झाल्या दिवसापासून अंबूताई जाणीवेने आणि समर्पण भावनेने दिसेल ते काम तत्परतेने करू लागल्या.

अंबू ताईंचे वडिल तबला वाजवायचे. त्यामुळे त्यांच्या सहवासात अंबू ताईना तालाचे ज्ञान होते. उपजत गोड गळा लाभलेला आणि वडिलांच्या तालमीत चिपळयांच्या साथीने अभंग म्हणायचा सराव होता. मठात सायंसेवेच्या वेळी आरत्या झाल्यावर पेटी तबल्याच्या साथीत संगीत सेवा सादर केली जायची. स्वत: स्वामी, लळित शास्त्री, बंडू बुवा आणि प्रसंग विशेषी उपस्थित भाविकांपैकी कुणीतरी अभंग, भक्ती गीत सादर करीत. सेवेत रुजू झाल्यावर आठवडाभराने अंबू ताईनी धीर करून अभंग म्हणायची इच्छा व्यक्त केली. त्या अक्षरशत्रू होत्या. त्या सोनार ज्ञातीच्या आणि आडवळणी खेड्यात अधिवास असल्यामूळे ‘न / ण ‘ हे उच्चारदोष व्हायचे. पण त्यांचे स्मरण तल्लख होते.त्यांना शेकडो अभंग मुखोद्गत होते.“हरी भजनावीण काळ घालवू नकोरे” हा त्यानी म्हटलेला अभंग ऐकल्यावर स्वामीनीही त्यांची प्रशंसा केली. त्या दिवसा पासून सायंसेवेत गायकाना चिपळयांची साथ त्या देत. अधून मधून अंबू ताईंना अभंग म्हणायचा आग्रह व्हायचा.

मठात दर गुरूवारी,एकादशी,पौर्णिमा आणि गुढी पाडवा, दसरा, दिवाळी असे सण, दत्तजयंती, नृसिंह सरस्वतींच्या निर्वाण दिनाला, आणि चातुर्मासात तर प्रतिदिवशी प्रवचन, कीर्तन व्हायचे. अंबूताई अशा कार्यक्रमांत व्यासपीठालगत बसून एकतानतेने श्रवण करायच्या. मठातल्या कार्यामध्ये फडके शास्त्री, लळित शास्त्री आणि बंडू बुवा यांच्या इतकीच अंबूताईंच्या शब्दालाही किंमत असायची. मठात गुरुचरित्र पाठ पारायण करायला येणाऱ्या सेवेकऱ्यांची व्यवस्था त्यांच्या लगामी लावलेली असे. नित्य पूजेची चांदीची

उपकरणे त्या जातीनिशी स्वच्छ करायच्या. मुदपाक खान्यात दैनंदिन रांधपाचा शिधा काढून देणे, रोजच्या प्रासादातले पदार्थ योजणे या खेरिज एखादी भाजी, चटणी किंवा मिष्टान्नाचा पदार्थही वेळ मिळेल त्याप्रमाणे अंबूताई मोठ्या श्रद्धेने करायच्या. विशेषत: पारायण करणारे सेवेकरी यांच्यासाठी वेगळी पाक सिद्धी आणि उपवासाचे जिन्नस त्या स्वत: जातीनिशी रांधीत असत.

सेवेकरी माणसाना वर्षातून एक दोन वेळा त्यांचे नातेवाईक – सगे सोयरे याना भेटायला जायची मुभा असे. अंबूताई नवऱ्याच्या तिथीला दोन दिवस सासरच्या गावी जावून येत. तसेच वर्षातून चार दिवस माहेरी नाद – गवाण्याला जावून येत. नादात कार्तिकी दशमी ते द्वादशी तीन दिवस गावतल्या विठ्ठल मंदिरात वार्षिकोत्सव व्हायचा.मंदिरा लगतच त्यांचे माहेर घर असल्यामुळे एखादा दिवस तरी अंबूताई खेप करायच्या. मंदिराची व्यवस्था आबूकाका घाटे पहायचे. त्यांची परिस्थिती तशी सामधामच.वाडीतली वीस बावीस बिऱ्हाडे आणि गावातले काही सधन लोक स्वेच्छा वर्गणी देत त्या रुटू खुटू उत्पन्नातून आबूकाका वार्षिकाचा खर्च भागवीत.पुराणिक बुवा गावतलेच बापूशास्त्री मोघे आणि कीर्तनकार बेताची बिदागी घेणारे कुणीतरी शोधून त्याना पाचारण केले जायचे.

गोवा मुक्ती झाल्यावर गवाण्यातल्या दात्ये खोतांच्या मुलाला गोवा कोनशीतल्या बर्वे पुराणिकबुवांची मुलगी सांगून आली.लग्न गोव्यात झाले आणि दोन दिवसानी गवाण्यातल्या लोकांसाठी गाव जेवणाचा बेत दात्ये सावकारानी योजला. रात्री व्याही बर्वे बुवांच्या कीर्तनाचा कार्यक्रम ठेवलेला होता. बर्वे काही पट्टीचे कीर्तनकार नव्हते. पण गोव्यातल्या बहुतांश मंडळीना उपजतच संगिताची जाण असते. तशी बर्वे बुवानाही होती. पुराण सांगायचा सराव असल्यामुळे त्या सामुग्रीवर बर्वे बुवानी रेटून नेले इतकेच. पण यानिमित्ताने आबुकाकांनी मोठ्या चतुराईने विठ्ठल मंदिराच्या वार्षिकाचा प्रश्ण सोडवला. बर्वे बुवानी बिदागीची अटही न घालता विठ्ठल मंदिराच्या वार्षिक

उत्सवाची सुपारी घेतली. गेली पाचसहा वर्षे विठ्ठल मंदिराचा उत्सव म्हणजे कीर्तनाला गोव्याचे बर्वे बुवा असणार हे जणु समिकरणच जुळले.

त्याकाळी नाद गवाण्यात येणे त्रिस्थळी यात्रे पेक्षाही अवघड होते. विजयदुर्ग डेपोच्या रत्नागिरी. कोल्हापूर, वैभववाडी, खारेपाटण, फोंडा नी कणकवली या इन्यागिन्या गाड्या नाद गवाणे तिठ्यावरून तरळयाला जात.जात्या गाड्या सकाळी आणि परतीच्या खारेपाटण, रत्नागिरी अपराण्ह काळी. कोल्हापूर, वैभववाडी अडीच ते तीन वाजता आणि फोंडा, कणकवली या दोन गाड्या दिवसमावळतीच्या वेळी यायच्या.बर्वे बुवाना कोनशीतून आई-दोडामार्ग मार्गे सावंतवाडी, तिथून कणकवली किंवा तरळयातून नाद गवाणे तिठा नी तिठ्यावरून तासभर चालीचे मकाण मारून मुक्कामी यावे लागे.बुवा प्राय: नवमीच्या दिवशी संध्याकाळी आबुकाकांकडे मुक्कामाला यायचे. ते रात्री कीर्तन झाल्यावर तिथेच टकली टेकून सकाळी त्यांच्या घरून अर्ध्यातासाच्या अंतरावर व्याह्यांच्या घरी जात. संध्याकाळी काळवं पडण्यापूर्वी आबूकाकांचे घर गाठीत. उत्सवाच्या काळात बुवांचा हा ठरीव कार्यक्रम असायचा.

त्या वर्षी बुवा सावंतवाडीवरून कणकवलीला येईतो विजयदुर्ग गाडी सुटून गेली होती. मग बुवा फोंड्यावरून येणारी गाडी गाठायला तरळयात आले. त्या दिवशी अचूक फोंड्याचा बाजार असल्यामुळे विजयदुर्ग गाडी उशिराने येईल असे तरळयातल्या कंट्रोलरनी सांगितले. बुवा बाकड्यावर बसून गाडीची प्रतिक्षा करीत बसले. स्टॉपवर त्याच गाडीसाठी दहा बारा इतर पॅसेंजरही होते. त्यात गवाण्यातले दोघेजण होते. बघता बघता सात वाजले, आठ वाजले, तरी गाडीचा पत्ता नव्हता. नेहेमीच्या लोकाना याचा अनुभव होता. गवाण्यात उतरणारे दोघेजण म्हणालेही, “तुम्ही काय काळजी करू नुको..... येकेकदा राती नव धा दुकू वाजतत...पन गाडी नक्की येनार म्हंजे येनार..... तुमच्याकडे ब्याट्रि असा ना? आमी तुमका देवळासर पोचवू... भियो

नुको.....” त्यावर बुवा म्हणाले, “मला ती काळजीच नाही आहे. गेली चार पाच वर्षे मी आबूकाका घाट्यांच्या विठ्ठल मंदिरात उत्सवाला कीर्तनकार म्हणून येतो आहे. मला न्यायला आबुकाकांचा गडी आलेला असणार. तसा रिवाजच ठरलेला आहे. पण नऊ वाजता कीर्तन उभे राहणार त्या पूर्वी कसे काय पोचणार? बुवांची मोठीच पंचाईत झाली.”

बुवांची अटकळ होती त्या प्रमाणे साडेचार वाजताच धाकू बंडबे बुवाना आणायला जायचे म्हणून फानस (कंदिल) घ्यायला आबुकाकांच्या घरी गेला. त्याला येताना बघताच स्वयंपाक घराकडे मोहरा वळवून आबूकाका हाकारले, “ग्येऽऽ आईकलेस काय..... म्हटले धाकू आलाहे हो लिखीवर जायला.” घाटीण काकूने निखाऱ्यावर तापत ठेवलेली चहाची तांबली फडक्यात धरून उचलली नी कुडवाळयांसाठी ठेवलेल्या पितळी फुलपात्रात चहा ओतून बाहेर नेवून दिला. चहा घेवून भांडे धुवून ओसरीवरच्या खांबाच्या मुळाशी उपडे घातल्यावर धाकूने पानाच्या तस्तातली चवडभर पाने, पाच सहा ओले बेडे नी चिमटीभर तंबाखू चंचीत भरूनघेतला. मग खुंटीवरचा फानस , साण्यातली काड्यापेटी आणि लाकडी पडग्यात ठेवलेले भाजलेले चणे मुंड्याच्या खिशात भरून घेवून धाकू जायला बाहेर पडला. पाळंदीतून जाताना, “ हय्यऽ ऽ

आयकलास काय..... मी लिखीवर बुवांक हाडूक निगालय्.....’ असे हाकारीत निघाला.

नाद गवाण्यात एक सार्वत्रिक प्रथा होती. गावदरी पासून तासभर चालीच्या अंतरावर तरळे विजयदुर्ग रस्ता होता. त्या तिठ्यावर एस्टीचा स्टॉप होता.त्या तिठ्याला ‘लिखी’ असे म्हणत. स्टॉपवर एकट्या दुकट्याने जाणे असुरक्षित होते. म्हणून गावातले लोक घरातून बाहेर पडले की पाळंदीतून जाताना हाकारीत जात असत. पाळंदीच्या दुतर्फा असलेल्या घरातल्या माणसानी ही हाकारणी ऐकली की, वडिलधारी माणसे घरातल्या रिकाम्या पोराना हाकारणाऱ्यासोबत जायला सांगत. “बाबीऽ बाबी जरा त्याच्या

सोबतीला जाऽऽरे.... माझा बाबा तो .....” पोराने खळखळ केलीच तर त्याला लालूच म्हणून मूठभर भाजलेल्या चवळया, कुळीथ, कडवे, फणसाच्या आठिळा नाहीतर चंचोके दिले जात. ते खिशात भरून खात खात पोरं अगदी आनंदाने जायला राजी होत. हा प्रघात इतका मान्य होता की प्रसंगी भाऊबंदकी – भांडण तंटाही बाजूला ठेवून लोक एकामेकाना सोबत करीत. धाकू सोबत सत्या बंडबे नी न्हाव्याचा विष्णू हे दोघे लिखीवर जायला निघाले.

तिघे लिखीवर पोचले नी स्टॉपवरच्या खोपटात फळकटावर टेकले. अर्ध्यातासाने पानवाल्या भिक्याचा पोरगा झमन्या आला. त्यादिवशी फोंड्याचा बाजार असल्यामुळे भिक्या पान करंड्या आणायला फोंड्यात गेला होता. तो दर आठवड्याला फोंडा बाजारातून दोन पानकरंड्या आणी नी पुढे हप्ताभर वाडीत फिरून विक्री करी. आज बाजारामुळे विजयदुर्ग गाडीला यायला रात्र होणार ही बातमी त्याने दिली. हे ऐकल्यावर खोपटात लटकावलेला मोघा घेऊन सकेरीतल्या कोंडक्यातून पाणी आणायला धाकु बाहेर पडला. खोपटाच्या मावळत अंगाला कुत्र्याच्या भुंकी एवढ्या अंतरावर गोड्या पाण्याची कोंड होती. पावसाळी व्हावटीत चार वाव ऐसपैस तव्यासारखा खोलगट भाग होता. त्यात पावट्या- चिंचोक्या एवढ्या आकाराचे गोल चपटे लाल पिवळया रंगाचे खड्यांचे ढीग वहात्या पाण्याबरोबर येवून खोलगट भागात साचून राहिलेले होते. त्या ढिग़ोळयांमध्ये कर्नाटकीच्या फळात बिट्टी असते तेवढ्या लांबट आकाराच्या संगमरवरा सारख्या शुभ्र पांढऱ्या रंगाच्या गुळगुळीत गारगोट्या असायच्या. काही गारगोट्या रायवळ बिटकी एवढ्या नी काही अगदी बचक्या इतक्या मोठ्या असत. गारगोट्या एकामेकावर घासल्या की आगीची किटळं पडत. काहीजण त्या दगडाना चकमकीचे दगड असेही म्हणायचे. सकेरीत बहुसंख्येने पांढरे गारेचे दगड असत म्हणून त्या पाणवठ्याला गारेची कोंड म्हणत असत.

धाकू कोंडीवर पोचला नी पहातो तर तीन भेकरी पाय फाकून कोंडीतल पाणी पित होती. ती पाठमोरी होती, वारा गावदरीकडून सडावळीकडे वहात होता. म्हणून धाकू अगदी तीन चार वाव अंतरापर्यंत पोचला तरी भेकऱ्याना पत्ताच लागला नाही. धाकूने खाकरून “तुमच्यो माऽऽरी मी” म्हणत हाकारा केल्यावर भेदरलेल्या जनावरानी जागच्या जागी चारी पायावर पुरुषभर उसळी मारून ताड् ताड् उड्या मारीत हां हां म्हणताना ती नजरेच्या टप्प्या बाहेर गेली. कोंडीच्या वरच्या अंगाला दरडीच्या खबदाडीत हात भर लांब रूंद नी वीतभर खोल घब होती त्यात जिवंत गोड्या पाण्याचे बारमाही उमळ होते. घबीच्या विरुद्ध अंगाला किरंगळी एवढ्या धारेने वहाणारी पन्हळी खाली कोंडीपर्यंत वहात सकेरीच्या ढिगात मुरायची. तेच पाणी कोंडीच्या मध्यभागी साठून राहिलेले असे. तिथे ऐन मे महिन्यातही पाऊलभर पाणी साचलेले असे. घबीत्ल्या उमळाला एवढा जोर होता की कलमाचे शिपणेकरी तिथून तेलाचे रिकामे डबे भरभरून नेवून कलमे शिपीत. सडावळी कडून गावदरीकडे घसारीला मातीच्या मरडा- मरडातून दात्ये, मराठे, घाटे, झोरे, तेली, राऊत, बंडबे, चव्हाण लोकानी हजारोनी हापूस कलमांच्या बागा उठवल्या होत्या. त्या सगळ्याना गारेच्या कोंडीतले पाणी पुरून उरले होते.

धाकु पाण्याचा मोघा भरून माघारी आला तेंव्हा सूर्य मावळला. चांगला काळोख पडल्यावर धाकूने फाणस लावला. खिशातले चणे खात खात गाव पारधीच्या जुन्या थविका धाकूने सुरू केल्या. त्या ऐकता ऐकता कधी नऊ वाजले ते कळलेच नाही. घड्याळ कोणाकडेच नव्हते. झमन्या अंदाजाने म्हणाला, “भवतेक नव वाजोक इले असा वाटतां.” काळजीच्या सुरात धाकु म्हणाला,“ आजून यश्टीचे पत्त्या नाय.....येवड्यात पालकी भायर् पडली आसात. आता गाडी येनार कदी... बुवा देवळात पोचनार कदी नी किर्तान उबा ऱ्हवणार कदी. आजचा केर्तान भवतेक रद होनार सां दिसता.....” धाकुचे हे बोलणे पुरे होते न होते तेवढ्यात गाडीचा घरघराट ऐकू आला.सगळ्यानी

खोपटाच्या बाहेर जावून तरळया कडच्या दिशेला नजर वळवली. वळणावरून गाडीच्या हेडलाईटचे झोत दिसले नी मिनीटाभरात गाडी स्टॉपवर येवून थांबली.

आठ वाजल्यावर जेवण खाण उरकून माणसं विठोबाच्या देवळात जमायला सुरुवात झाली. सालाबाद प्रमाणे बाबी घाट्याने गाभाऱ्यासमोर प्रवचनकाराचे पीठ मांडले नी पंचारत पेटवून धुपदाणी फुलवली. बापू शास्त्र्यांचे प्रवचन संपले. मानकऱ्यानी 'पुंडलिक वरदा हारी विठ्ठल' घोष करीत पालखी उचलली नी मंदिरा भोवतीच्या ओवरीत भोवत्या सुरू झाल्या. भोवत्या पुऱ्या होवून पालखी देवळात आली.धडक्यात आरत्या झाल्या नी तेंव्हा बुवा अजून आलेले नाहीत... आता काय करायचे अशी कुजबूज सुरू झाली. अजून बुवाना आणायला गेलेला धाकू परत आलेला नव्हता. म्हणजे बुवांची गाडी यायला उशिर झालेला होता हे नक्की.... पण आता पुढे काय? बुवा येणार कधी नी किर्तन उभे रहाणार कसे नी कधी? मोठाच पेच निर्माण झाला होता.

त्या दिवशी अंबूताई उत्सवाला आलेल्या होत्या. बुवाना उशिर झाला नी कीर्तन बहुतेक रद्द करावे लागणार ही परिस्थिती उभी राहिल्यावर अंबू ताईंच्या भावाला अकल्पितपणे सुचले की आपली बहिण मनात आणील तर वेळ साजरी करू शकेल. त्याने ही बाब बापूशास्त्र्यांच्या कानी घातली. अंबू ताई मठात अभंग वगैरे म्हणतात हे त्याना माहिती होते. त्यानी लगेच जाणत्यांशी चर्चा करून सगळ्यानी अंबूताईना उत्सवाची प्रथा मोडू नये म्हणून कीर्तन नाही तर निदान चार पारमार्थिक उपदेशपर गोष्टी सांगून अडलीवेळ साजरी करायची गळ घातली. आबूकाका भावरथीपणे म्हणाले, " अंबू ताई तुम्ही काय काळजी करू नका तुम्ही सुरवात करा काय चुकले माकले तर सांभाळून घ्यायला आम्ही आहोतच." त्याबरोबर जोरदार हशा पिकला. खो खो हसत बापू शास्त्री म्हणाले,"वा रे पठ्ठ्या... नाटकात प्राम्टिंग करतात तसे पुढे काय निरूपण करणार ते तू सांगणार की शिनेमात दाखवतात तसे मागी राहून साऱ्या दिंड्या म्हणणार? तें असो.. अंबूची श्रवण भक्ती दांडगी आहे....पोक्ता

पुरवता म्हणून माझे आशिर्वाद आहेत. अंबू.... शेवटी कीर्तन म्हणजे देवाचे नामस्मरण, तुला जे जमेल जसे जमेल ते आम्ही श्रोते गोड मानून घेवू. तू जी सेवा करशील ती पांडुरंग पावन करून घेईल."

बापूशास्त्रीनी आपले उपरणे काढून अंबू ताईंच्या खांद्यावर घातले. मग त्यांच्या पायापडून पिशवीतून चिपळया काढून अंबूताई कीर्तनाला उभ्या राहिल्या. त्यानी मंगला चरण सुरू केले. 'वक्रतुंड महाकाय' नी 'काषाय वस्त्रं' श्लोक झाल्यावर अंबूताईनी नेत्र मिटून अत्यंत श्रद्धापूर्वक दत्तावधून स्वामींचे स्मरण करून 'मूकं करोती वाचालं पङ्गूम् लंघयते गिरीम् यत्कृपा तमहम् वन्दे परमानन्द माधवम्' श्लोक सुरू केल्यावर त्यांच्या अन्त:चक्षूंसमोर मठात प्रतिष्ठापित केलेल्या नृसिंह सरस्वतींच्या चांदीच्या पादुका तरळून गेल्या. त्या क्षणी कीर्तनाला उभं राहिल्यावर त्यांच्या मनावर आलेलं दडपण क्षणार्धात दूर झालं नी, नारदीय साम्प्रदायिक कीर्तनाचा आकृतीबंध त्यांच्या मुखातून उलगडत गेला.

त्यांनी श्रोत्याना आवाहन केले की, " मी काही व्यासंगी कीर्तनकार नाही. मी अशिक्षित अडाणी जानपद बाई.....आज प्रथमच या नारदांच्या गादीवर कीर्तन सेवा सादर करायचं धारिष्ट्य करत्ये आहे..... सोनाराच्या नीच कुळी जन्म घेवून गावढ्या गावात बहुजन समाजात राहून जी बोली अंगवळणी पडली तीही अशुद्ध.... प्रयत्ने करूनही अद्यापी मला उच्चार शुद्धता अवगत झालेली नाही. तुम्ही श्रोत्यानी उदार अंत:करनाने चुक माफ करावी . मठात राहूण चार चांगली प्रवचने कीर्तने ऐकता आली. पुष्पसंगे मातीस वास लागे या न्यायाणे आजवर घडलेल्या श्रवण भक्तीतून जे उच्छिष्ट मी पदरी साठविले ते सेवेच्या रूपाणे तुम्हासमोर मांडून अडली वेळ साजरी करीत आहे ."

निरुपणासाठी अंबूताईनी एकनाथांचा भाव तोची देव हा अभंग आळवायला सुरुवात केली. त्या तालाला पक्क्या होत्या. उपजत गोड गळा

लाभलेला होता आणि मठात पेटी तबल्याच्या साथीवर अभंग गायनाचा सरावही होता.

“भाव भक्ति फळे भावे देव मिळे
निजभावे सोहाळे स्वानंदाचे॥
भावचि कारण भावचि कारण
यापरते साधन नाही नाही ॥
एका जनार्दनी भावाच्या आवडी
मनोरथ कोडी पुरवी तेथे॥ ”

अंबूताईनी गोड आवाजात ताल-सुराचे भान ठेवून चिपळयांच्या



तालावर गायिलेला अभंग चांगलाच रंगला. सराईत कीर्तनकाराप्रमाणे अंबूताईनी मार्मिक दाखले नी दृष्टांत देवून श्रोत्याना चकित करून सोडले. सद्य सामाजिक स्थितीचे वर्णन करताना संसार पाशात गुरफटून ईश्वर बक्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या माणासाचे वर्णन करताना

“बालपण आलं खेळण्यात गेलं।
तारुण्य आलं गुंगण्यात गेलं।
म्हातारपण आलं खोकण्यात गेलं।
अखेरचं येईल जेंव्हा रे प्राण्या
राम राम म्हणशील तेंव्हा।”

ही कैकाडी बुवांची पंचपदी झोकात सादर केली.

सुरुवातीला अंबुताईंच्या कथनाचा जानपद लहेजा आणि 'न ण'च्य उच्चारातली गल्लतसुजाण श्रोत्याना थोडीशी खटकली.पण कथन रंगत गेले तसतसे त्यांचे चपखल दृष्टान्त आणि आशयपूर्ण निरुपण ऐकल्यावर त्यांची कथन शैली श्रोत्याना भावली. कसलीही अयोग्य अनुचित टीका टिप्पणी न करता त्यानी उपासना आणि ईश्वर भक्तीवर प्रभुत्वाने भाष्य केले. पूर्व रंग आटोपून मूळ अभंगाचा चरण सुरू झाल्यावर घाटीण काकूनी चाफ्यावी फुलं आणि तुलसी मञ्जिरी गुंफून केलेला हार घालून प्रथेप्रमाणे त्यांचा सन्मान केल्यावर अंबू ताईनी चरित्र भाग सुरू केला. पूर्व रंगात मिळालेला श्रोत्यांचा प्रतिसाद पाहता अंबूताईचा आत्मविश्वास चांगलाच दुणावला होता. त्यानी एकनाथ महाराजांनी काशीची कावड तहानलेल्या गर्दभीच्या मुखात रिती केली तो कथाभाग त्यानी योजला. समयोचित 'नसे राउळी वा नसे मंदिरी जिथे राबती हात तेथे हरी' हे त्या काळी गाजत असलेले पद त्यानी घेतले. त्याच वेळी धाकूसोबत बर्वे बुवा मंदिरात प्रवेशते झाले.

अंबूताईनी पुढे होवून त्याना चरण स्पर्श करीत "तुमच्या आज्ञेने इथवर सेवा मी सादर केली आहे. एकनाथ महाराजांचा चरित्र भाग तुम्ही मांडित असाल तर मी श्रोतृवृंदात बसायला तयार आहे. चक्री कीर्तनात पूर्वरंग एकाने आणि चरित्र भाग दुसऱ्याने सादर करावयाची प्रथा आहे.तसेही मी काही व्यासंगी कीर्तनकार नाही.अडली वेळ राहू द्यायची नाही म्हणून मी कीर्तनाला उभी राहिल्ये एतकेच. " बुवानी काही बोलण्या आधीच श्रोतृ वृंदा पैकी वयोवृद्ध भालुकाका जोशी म्हणाले," बुवा गोव्यापासून दीर्घ प्रवास करून थकून भागून आलेले आहेत. गाडीला इतका उशीर काळ तिष्ठन्ती झालेली आहे की, आता उभे रहावयाचे ही त्राण राहिलेले नसेल बर्वे बुवाना."

त्यावर मान डोलावीत बर्वे बुवा म्हणाले,"तुम्ही अगदी माझ्या मनीचे बोललात भालू काका. बाई, तुमचे नाव मला ज्ञात नाही....मी तुम्हाला ताई

म्हणतो तुमचा विनम्र भाव मला भावला. मी सुद्धा शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेला कीर्तनकार थोडाच आहे? तेव्हा ही सेवा आता तुम्हीच पूर्णत्वाला न्या! चरित्र भाग पुढे सुरु झाला. शेकडो कावडधारी सोबत संत एकनाथ काशीहून कावडीत गंगाजल आणत होते. ही कावड यात्रा महामाई पार्वतीसह कैलासाधिपती पहात असता महामायेने त्याना प्रश्न केला. या सर्व भक्त गणात तुम्हाला कोणता भक्त अति प्रिय आहे?



महादेव बोलले आपण प्रत्यक्ष तिथे जाऊन सर्वांची परीक्षा घेवून कोण श्रेष्ठ ते ठरवूया. त्यानी आपली योजना कथन केली. ते स्वत: बेलदार झाले. महामाया झाली बेलदारीण आणि नंदिकेष्वराने गाढवीचे रूप घेतले. तिघेही

क्षणार्धात रामेश्वराच्या मार्गातल्या वाळवंटात अवतीर्ण झाले. तहानेने व्याकूळ झालेली गाढवी पाय झाडीत मरणोन्मुख अवस्थेत तटपटू लागली. बेलदार आणि त्याची पत्नी कावडधारीना विनवू लागली. पहा हो मायबाप माझी ही गाढवी तहानेने व्याकूळ होऊन मृत्युपंथाली लागली आहे. तुमच्या कावडीतलं ओंजळभर गंगाजल तिच्या मुखी ओतून कुणीतरी तिचे प्राण वाचवा होऽऽ .....

अंबूताईनी प्रसंगोचित “द्याऽहो गाडवीला पाणी...” हे पद आळवून तहानेने मृत्यूपंथाला लागलेल्या या मोन गायत्रीचे प्राण वाचवून पुण्य मिळवा....देव सर्वाभूती राहे या उक्ति प्रमाणे या गाढवीच्या ठायी साक्षात परमेश्वर आहे. असे निरूपण मांडले. बेलदारणीची ही विनवणी ऐकल्यावर तिची हेटाळणी करीत कावडधारी म्हणाले, “ आली मोठी ब्रह्मज्ञान सांगणारी वेदवेत्ती.... काशीहून हे पवित्र गंगाजल इथवर आणितो आम्ही किती कष्ट भोगले ते तुला कसे कळावे. आता अगदी अल्पावधीत रामेश्वराचे मंदीर गाठून त्या सांब सदाशिवाला अभिषेक करून महान पुण्याचे भागिदार आम्ही होणार आहोत. ही क्षूद्र गाढवी मेली काय नी जिवंत राहिली काय आम्हाला त्याचे सोयर सुतक नाही. चल हो बाजूला.”

अल्पावधितच नाथ महाराज तिथे येवून पोहोचले. बेलदार आणि त्याची पत्नी कावडधारीना पूर्वी प्रमाणे विनवणी करू लागले. नाथांच्या सोबतचे कावडधारी त्यांच्याकदे तुच्छतादर्शक कटाक्ष टाकीत पुढे निघाले. त्यांचा सोबत नाथ महाराजही चार पावले पुढे गेले नी तेवढ्यात गर्दभीने घर्र घर्र असे भीषण ध्वनी सुरू करताच नाथांची पावले थबकली. त्यांची सदसद्विवेक बुद्धी त्याना सांगू लागली, भलेही हे गंगाजल शिवसांबाच्या मस्तकी ओतून महान पुण्य मिळेल. पण इथे एक अश्राप जीव तहानेने व्याकूळ होवून मृत्यूपंथाला लागला आहे, या क्षणी वैयक्तिक पुण्य संचयाची आस बाजुला थेवून अश्राप जीव वाकवणे हा खरा मानव धर्म आहे .......बस्स नाथ तत्क्षणी माघारी वळले आणि गाढवी समोर उभे राहून कावडीतल्या गंगोदकाची धार गर्दभीच्या मुखी

ओतली मात्र.... क्षणार्धात समोरचे चित्र पालटले. गाढवीच्या जाग़ी साक्षात शिवशंभू स्थापना झालेले होते आणि नाथांच्या कावडीतल्या गंगोदकाची धार त्यांच्या मस्तकी पडत होती. महामाया पार्वती आणि नंदिकेश्वर अनिमिष नेत्रानी हा सोहोळा पहात होते.

साकी, दिंडी,आर्या आणि उचित पद्य रचना सस्वर गायना सह सादर करीत अंबुताईनी पठडीत साजेशी कीर्तन सेवा सादर केली होती. चरित्र कथाभाग संपून मुळ अभांगाचा चरण आळवून अंबू ताईनी ‘हेची दान देगा देवा सुरू केले’ तेंव्हा श्रोतृवृंद भानावर येवून उठून उभा राहिला. मात्र त्यांच्या अंत:चक्षूं समोर अद्यापिही नाथांच्या कावडीतल्या गंगोदकाने अभिषिक्त होणारे साक्षात शिव आणि नंदिकेश्वरासह अनिमिष नेत्रानी तो सुख सोहोळा पाहणारी जगज्जननी हेच दृष्य तरळत होते!



******

# ०५. जिगरबाज

गेले तीन चार दिवस रतन आंबा ओवळायला लागला होता. काल तिन्ही सांजेला मावळतच्या फाट्यावर चार पिवळे जर्द पिके आंबे पव्याच्या नदरेला पडले होते. पण दिवस मावळलेला होता. तसं म्हणजे पव्या चढला असता पण घरात मोठी माणसं डाफरली असती म्हणून तो गप्प बसला होता. सकाळी उठल्यावर दात घासून झाल्यावर मळयात संडासला जावून येताना त्याने पुन्हा रतन आंब्याकडे नजर केली. आज आणखी पाचसा उजळलेले दिसले. दोणीवर हातपाय धुवून तो दडदडत स्वयंपाक घरात गेला. आई चहा गाळीत होती. तिने चहा गाळून तांबलीतलं निरसं दूध घालून सहा कप भरले. पव्याला आणि राधाला चहा देवून उरलेले कप ताटलीत ठेवून ती ओटीवर गेली. चहा पिऊन झाल्यावर त्याने राधाच्या कानाशी लागत हळू आवाजात सांगितले , "रतन आंब्यावर दहा आंबे पिकलेले आहेत . भाऊ कलमं शिपायला गेले की आपण जावूया. मी आंब्यावर चढून फांदा हांदळतो, नी तू पिके आंबे कुठे पडतात ते नीट लक्ष ठेवून बघ."

रतन आंबा म्हणजे नामांकित. एकेक फळ म्हणजे बचक्याएवढं.आंबा कापा म्हणजे घट्ट रसाचा, साधारण पायरी सारखा वास नी चवीला एकदम गोड. तीन गड्यांच्या वेंगेत मावणार नाही एवढं मोठं चार पाच उंच सरळसोट खोड नी त्यानंतर पाच डेळे फुटलेले. खोडाला वेंगाटून चढणं मुश्किल होतं म्हणून दहा हाती पिकाव वेळू तोडून त्याचे फाटे वीतभर राखून छटून तो आंब्याच्या खोडाला टेकून ठेवलेला असे, त्याला कणक म्हणत. कणकाच्या डेळयांवर पाय देत वर पोचलं की मग खांद्यावर चढणं तसं कठिण नव्हतं. तचचे दोन फाटे जमिनी समांतर आडवे गेलेले होते. त्यावर चढणारा रुखाडी

असेल तरच जावू शके. पव्या जेमेतेम नऊ वर्षाचा. पण लहानपणापासूनच तो जिगरबाज.झाडावर चढण्यात हुंबल्याला मागे टाकील असा रुखाडी. धाकूबरोबर राहून त्याने हे कसब लहान वयातच आत्मसात केले.

बर्व्यांची परिस्थिती बाताबेताची होती. घरातली सगळीच मंडळी कष्टाळू होती. शेती स्वत: करीत असत. माड पोफळीचे शिंपणे दोन्ही भाऊ आठवड्याचा पाळीने करीत. म्हणून मुलानाही सोकळ सोडले जात नसे. भाऊ नी नानाकाका शिपण्याचे डबे घेवून बाहेर पडले. आता हुंदडायला रान मोकळं होतं. राधा नी तो धाव मारीत आंब्याकडे निघाले. आंब्याखाली त्यांचे चुलत भाऊ जन्या . शिरी नी हम्या थांबलेलेच होते. त्याकाळी पोराना टोपण नावानी हाका मारयची पद्धत असे. जनार्दनाला जन्या. हेमंताला हम्या, श्रीधरचे शीरी तसे प्रवीणचे पव्या झालेले होते. दोघांकडे दोन दोन पिके आंबे होते. पव्याला बघून येंगडावीत हम्या म्हणाला, “आता काय नाय मिळणार आम्ही तुमच्या आधी येवून सोधलं म्हणून आम्हाला मिळाले आंबे,” पव्या त्याला नाचून दाखवीत म्हणाला, “आता तू बघच.... सकाळीच परसाकडेला जावून येताना उगवतच्या डेळयावर आठ नवू आंबे पिकलेले आहेत... मी आता त्यावर चढून हांदळणार की सगळे पिके आंबे पडतील.”

मग तो कणकावर सावध पावलं टाकीत चढू लागला. वरच्या डेळयात पोचल्यावर उगवतच्या आडव्या फांद्यावर बसत बसत पुढे सरकला. दोन वाव अंतरावर फांद्या फुटलेल्या होत्या. त्या पकडून उभा राहिला आणि बरंच पुढे जावून नेटाने फांदी हालवायला लागल्यावर पिकलेले आंबे बदाबद पढायला लागले. तीन चार हांडळण्या झाल्यावर . तो मागे फिरला. नीत लक्ष करून आणखी दोन तीन ठिकाणी हांदळणी करून खाली उतरला . पिके पंधरावीस आंबे नी चार कच्चे हिरवे आंबे मिळाले होते. आता मगाशी चिडवणारे जन्या नी हम्या लाडी गोडी लावीत दुपारी पत्त्यानी खेळाचे आमिष

दाखवून चार पिके नी दोन हिरवे आंबे चटणीसाठी मागून घेतले. पव्याने अंगातला गंजीफ्रॉक काढून त्यात आंबे भरले नी सगळी पोरं घरी निघाली.

पव्या बाळपणा पासून सगळ्या कसबात तरबेज होता. चुलत भाऊ त्याच्या पेक्षा साताठ वर्षानी मोठे. पव्या त्यांच्याशी बरोबरी करण्याच्या अट्टाहासाने इशीम मारून प्रयत्न करायचा. तो स्वभावत: हूड नी बेडर होता. आज्जी तर त्याला जिता समंध म्हणे. गड्यांच्या बरोबरीने माडा पोफळींवर चढे.गड्यांबरोबर दोन दोन तास पायरहाटावर पाणी लाटायला बसे. चुलत भाऊ वयाने मोठे नी आडदांडही होते, पण पव्या त्याना हार जात नसे. नाना काका नी मधुभाऊंचे वेगळेचार झालेले असले तरी वितुष्ट नव्हते. दोघांचे आर्थिक व्यवहार अलग होते पण शेती भाती एकत्रातच केली जाई. नाना भिक्षुकी करीत. ते संध्याकाळी मुलाना हव्य-कव्य शिकायला बसवीत. पव्या जात्याच तल्लख होता. तिन्ही भावांचा पाव रुद्र व्हायच्या आधीच पव्याचा पुरा रुद्र पाठ झाला. मग बाकीच्याना शिकयायचे कामनानानी त्याच्यावर सोपवले होते.सहा महिन्यानी तिघे भाऊ चुकत माकत म्हणायला लागले तेंव्हा पव्याचे षोडशापचार पुजा. त्रिसुपर्ण नी देवे पाठ झालेले होते. नाना त्याचे कौतुक करीत म्हणून तीन्ही चुलत भाऊ त्याच्यावर खार खात.

आंबे पिकायला लागल्यावर तिन्ही चुलत भाऊ आळीपाळीने लक्ष देवून असत. त्याना जादा आंबे मिळत. पव्या नी राधा लहान होती. त्याना पडीचा आंबा क्वचितच मिळे. चुलत भावांशी सांगी मारण्यासाठी दोन तीन दिवसाआड आंब्यावर चढून फांदे हांदळून पव्या आंब्याची बेगमी करी. त्या दिवशी संध्याकाळी शाळेतून आल्यावर वरयांच्या पिठाचा लाडू खात खात राधेला घेवून पव्या आंब्याकडे निघाला. जन्या हम्या तोथे थांबलेलेच होते. हम्याने पिके आंबे टेळून ठेवलेले होते. त्याने पाळंदीत न्हेवून पव्याला ते दाखवले. लाडू खाल्ल्यावर नेहेमीप्रमाणे कणकावर चढून पव्या पिकलेले आंबे दिसले होते त्या फाट्यावर गेला. फांदी फार मोठी नव्हती. पव्या वेंगाट

घालून सरसरत निम्म्यापर्यंत गेला नी सावध उभा राहून फांदी हांदळायला लागला.

त्या फांदीला रोठा लागून ती कोरम झालेली होती. जोरदार हालवल्यावर अवास्तूकपणे फादी देळयातून पेचली नी फांदी सकट पव्या खालच्या निवडूंगाच्या काटेरी झाळीत पडला. खाली पडल्यावर



निवडूंगाच्या बारदार फाट्यावर डोके आपटल्यामुळे पव्या बेशुद्ध झाला. पोरानी घाबरून पव्या पडला अशी बोंबाबोंब केल्यावर माणसं आंब्याकडे धावली. फांदी खूप उंचावर होती. तिथून पव्या थेट जमिनीवर पडला असता तर साफ लोळा गोळा होवून मेला असता पण निगडाच्या झाळीवर पडल्यामुळे मुका मार लागला नी काटे लागूग फराटलं असलं तरी पव्या वाचला होता.“ पव्या रतन आंब्यावरून पडला” पोरांचा ओरडा ऐकल्यावर सगळयात आधी हम्याची आई सुधा काकू धावली.

येताना प्रसंगावधान राखून तिने दोणीत तांब्या भरून पाणी आणलेले होते. निगडाचे काखे बाजुला करून तिने पव्याला मोकळयावए आणून त्याचे डोके मांडीवर घेवून पाण्याचे हबके मारले नी कुळच्यात पाणी घेवून त्याचे ओठ विलग करून पाणी ओतले. त्याची दातखीळ बसली होती. तिने त्याच्या गालोडीत बोट घालून दाताची फट विलग केल्यावर दातखीळ उघडली. दोन घोट पाणी पोटात गेल्यावर पव्या सावध होवून कण्हायला लागला. तेवढ्यात त्याची आई वेणूताई तिथे पोचली. पव्याला कुरवाळीत “बाबा सावध झालास काय रे..... कुठे लागलं ” पण पव्याकडून काःईच उत्तर आलं नाही. त्याला कुशीवर परताना डावा हात उचलल्यावर तो लोंबायला लागला. मनगटाचं हाड, पंजा नी मनगटाचा सांधा मोडलेला होता.

अर्धातास उलटला तरी पव्या शुद्धीवर येत नाही म्हटल्यावर प्रसंगाचे गांभीर्य ओळखून त्याला वेंगुर्ल्याच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये न्यायचे ठरले. त्यावेळी तिथे डॉ. सिटन हे मेडिकल ऑफिसर होते. ते तज्ञ आणि सहृदय म्हणून जिल्हाभर ख्यातकीर्त होते. असंख्य गंभीर रुग्ण त्यानी बरे केलेले होते. उन्हाळी हापूस आंबा सिझन सुरू असल्यामुळे पडेलात ठाकूरदेसायांची ट्रान्स्पोर्ट सर्व्हिस सुरू होती. त्यानी वेंगुर्ल्या पर्यंत जायला ट्रकाची व्यवस्था केली. माणसं गेली तेंव्हा सिटन डॉक्टर नेमके रजेवर गेलेले होते. ड्युटीवर असलेले मेडिकल ऑफिसर काही आर्थोपेडिक तज्ज्ञ नव्हते.पव्याच्या मनगटाच्या हाडाचे तुकडे झालेले होते. ओपन सर्जरी करून ते तुकडे नीट जोडून मग प्लॅस्टर करायला हवं होतं. पण डॉक्टरानी बहेरूच हाड सारखं करून प्लॅस्टर घालून टाकलं. पव्या दोन दिवसानी शुद्ध्दीवर आला. दहाबारा दिवस मागे पडल्यावर पव्या आंगजोरावर हिंडाफिरायला लागला नी आता पेशंट बरा झाला असं समजून त्याला डिस्चार्ज मिळाला.

हातावर योग्य उपचार झालेले नसल्यामुळे पाऊण महिन्याच्या भरीला प्लॅस्टरमध्ये हात उबला. संपूर्ण मनगटात ठुसठुसणी सुरू होती नी सगळा भाग शिवशिवत होता. ते असह्य होवून पव्या तळमळायला लागल्यावर प्लॅस्टर कापून काढलं. हात काळानिळा पडलेला होता . असंख्य जखमा झालेल्या होत्या नी त्यातून पू वहायला लागलेला होता. चार दोन दिवसात मनगटाच्या हाडांचे मोडलेले तुकडे एकेक करून कातडी फाडून बाहेर पडायला लागले. पव्याचे आजोबा बाबुकाका नामांकित वैद्य होते. वेणूताईला बऱ्याच औषधांची माहिती होती. आजोबानी निगडीच्या पाल्याचे पोटिस गरम करून त्याचा शेक द्यायचा उपाय सांगितला. कसली कसली मलमंही त्यानी पाठवून दिलेनी. मनगटाच्या हाडांचे तुकडे पडून गेल्यावर पडून गेल्यावर हाताच्या जखमा सुकायला लागल्या. पण तसतसा हात आक्रसत गेला. त्या हाताने फार काही काम करता येईना. मनगटाच्या पुढे मुळी आधार नसल्यामुळे पंज्या पर्यंतचा भाग लांब फडक्याच्या पट्टीचे वेढे देवून बांधून ठेवावा लागे. या प्रसंगा नंतर मात्र पव्या समजूतदार झाला.

कोणीतरी पव्याची पत्रिका ज्योतिषाला दाखवायचा सल्ला दिला. त्याकाळी देवगडचे रानडे ज्योतिषी नामांकित ज्योतिषी म्हणून प्रसिद्ध होते.त्यानी पत्रिका बघून सांगितले की, सातव्या वर्षी नी बाराव्या वर्षी अनिष्ट योग होते. त्यातही बाराव्या वर्षी मोठेच गंडांतर संभवत होते. त्यातून वाचला तर मात्र पुढे तो मोठा नाव लौकिक मिळवील. हे गंडांतर टळण्या साठी शिवावर उसाच्या रसाचा अभिषेक करायचा उपाय त्यानी सुचवला. पव्याचे काका चांगले भिक्षुक होते. हात बरा झाल्यावर त्याची मुंज झाली. त्यानंतर काकानी त्याला रुद्र शिकवायला सुरुवात केली. पाठांतरातली त्याची गती बघून ते अक्षरशः थक्क व्हायचे. वेद विद्या शिकवायचे रिवाज बाजुला ठेवून तो लौकर धर्मकृत्यात पारंगत व्हावा म्हणून शोडषोपचार पूजा, वडाची पुजा,

गणपती, हरताळका, सत्यनारायण, तुळशीचे लग्न, ही भिक्षुकीतली चलनी नाणी म्हणावी अशी महत्वाची कृत्ये त्याला शिकवली.

त्याचे उच्चार तांब्यासारखे खणखणीत. तो पठण करायला लागला की दशग्रंथी ब्राह्मणही मान डोलावीत असे. श्रावणात सोमवारी एका दिवशी पहाटे तीन साडेतीन वाजल्या पासून तो अपरान्ह काळापर्यंत तीन-तीन चार-चार रुद्राच्या एकादष्ण्या तो करी.पोर असा हिकमती की जिद्दीने खणकाम. तोडकाम करण्यापासून तो जोत धरून नांगरटी पर्यंत सगळी कामे एका हाताने करी. एका हाताने पाणी कापीत माशासारखा पोहत असे. शाळेत अभ्यासा प्रमाणे खेळातही तो पुढे असायचा. खो खो च्या टीम मधून राज्यस्तरापर्यंत तो पोचला होता. एका हाताने बॅट धरून उत्तम बॅटिंग करी. त्यावेळी गावोगाव क्रिकेट टूर्नामेंटस् चे पेव फुटले होते. पव्या आऊट न होता शेवटपर्यंत बॅटिंग करी. लांबच्या गावानी जाणाऱ्या टीम त्याला योजून न्हेत असत आणि एकट्याच्या जीवावर पव्या शिल्ड जिंकून देत असे.

त्याचे व्यंग लक्षात घेवून आई त्याला सतत बजावीत राही. तू कोणाच्या कळी कफावतीत पडू नको. जगाशी वैर धरून आपला अभ्युदय व्हायचा नाही. वितुष्ट आले की तुझे सोबती, सवंगडी तुझ्या व्यंगावरून तुला टोंबलीत राहणार. उलट तू सगळयांशी सलोख्याने राहिलास, भांडण तंटा न व्हावा यासाठी पडते मिळते घेवून राहिलास तर तर सगळे तुला मदत करतील. महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळी वाचती असे म्हणतात. आईचा हा उपदेश पव्याने पुढे आयुष्यभर आचरणात आणून लोक संग्रह वाढवला. आलेल्या वैगुण्या मुळे खचून न जाता पुरं कसब पणाला लावून तो अनंत गोष्टींमध्ये पारंगत झाला. त्याचं वागणं बोलणं इतके लाघवी होतं की, सहवासात येणारे त्याचे मित्र मैत्रीणी त्याच्यावरून जीव ओवाळून टाकीत असत.

नाना काकानी त्याला रुद्र शिकवल्यावर रोज न चुकता रुद्राचा एक पाठ म्हणायचा दंडक घालून दिलेला होता नी पव्याने तो पाळलेला होता. पव्याला बारावं वर्ष लागलं. या वर्षात त्याच्यावर काही तरी गंडांतर येणार



असं रानडे ज्योतिषानी भाकित केलेलं होतं. तीन चार महिने मागे पडले. पाऊस काळ सुरू झाला. रविवारी सड्यावर खरीत लावणी लावायचं काम सुरू होतं. वाटेली, त्याची बायको यांच्या बरोबर पव्या नी त्याची बहीण राधा सड्यावर गेली. दळा नांगरून चिखल करून झाली. चिखल करायला बाजूच्या कोंडकातलं पाणी पाट काढून दळ्यात सोडलेलं होतं. दाढ लावण्यापूर्वी पाण्या पाट बंद करण्यासाठी खोरं घेवून पव्या पाट बुजवायला लागला. अर्ध्या अंतरावर पाटाच्या कडेला असलेल्या बचक्या एवढ्या दगडावर त्याचा डावा पाय पडून दगड निसटला. त्या बरोबर त्याखाली

असलेल्या बिळात पव्याचा डावापाय रुतला नी किरांगळी जवळच्या बोटाला कोणीतरी चावल्यासारखी जाणीव झाली.

“आय्य ग्ये....कोणतरी चावलं ” असं ओरडत पव्याने झटक्या सरशी पाय वर खेचल्यावर जनावराचा डास सुटला. बोटातून रक्त पाझरत होतं. पाय वर खेचताना सरपटणाऱ्या जनावराचा तोंडवळाकडचा भाग दिसला होता. पव्याने खपाखप खोरं मारून माती उसपल्यावर साप उमगला. पव्याने त्याला खापलून बाहेर काढला. राधा बाजुलाच होती तिलाही जनावर उमगलं होतं. वाटेली जोत टाकून धावत आला. त्याच्या बायकोने आजूबाजूला लावणी करीत असणाराना हाकारलं. आजुबाजूचे दोघे तिघे जोतये तिथे आले. त्यानी साप उपडा करून पारे बघितले. पारे म्हणजे जनावराची फडा संपते तिथे मानेवर काळ्या रेघा असतात. या सापाच्या मानेवर दोन अखंड रेषा नी एक अर्धी रेषा होती, म्हणजे ते अडीज पाऱ्याचे होते. याचा अर्थ दंशकऱ्याचे आयुष्य फक्त अडीच प्रहर इतकेच उरले होते. दीड , दोन. अडीच, तीन आणि साडेतीन असे पाच पाऱ्यांचे सर्प कोकणात आढळतात.

दहा वाजायचा टाईम होत आलेला होता. त्यावेळी दहाच्या दरम्याने विजयदुर्ग नवानगर मार्गे देवगड गाडी यायची. ती नव्यानगरातून आली की सौंदाळयाच्या घाटीत वळून येवून पडेलातून देवगडला जायची. त्या गाडीने पडेल हॉस्पिटलात जा असं लोक म्हणाले. कारण त्यावेळी गावात डॉक्टर नव्हता. सर्प दंशावरची इंजेक्षन्स ग्रामपंचायत कार्यलयामध्ये ठेवलेली असायची. आता वेळ न दवडता पडेल गाठणं महत्वाचं होतं. हे बोलणं होईतो बावळीच्या खरीतून विजयदुर्ग देवगड गाडी वर येताना दिसली. गाडी बर्व्यांच्या घराखालून असलेल्या रस्त्याने जायची. ती गावदरीत जाण्यापूर्वी घर गाठायला हवे होते. म्हणून दोन्ही बहिण भावंडं फ़डक्याच्या लुकटीत बांधलेला साप घेवून उरी फुटेपर्यंत धाव मारीत सुटली.

पव्या घरामागचा आखाडा ओलांडित असतानाच घराखालून गाडी निघून गेलेली दिसली. आत्तापर्यंत न डगलेला पव्या आता मात्र पुरता खचला. पडेल हॉस्पिटल त्यांच्या घरापासून दोन अडीज किलोमीटर लांब . तिथपर्यंत चालत जाणे शक्यच नव्हते. फारतर डोळीत घालून गड्यानी



पोचवलेनी असता. पण तो शेतीचा समा. वाडीतले सगळे बापये मळ्यात नायतर सड्यावर गेलेले. ते येणार कधी ....डोळी बांधणार कधी नी पडेल गाठून इंजेक्षन मिळणार कधी सगळे त्रैराशीक वय लहान असूनही पव्याने घातले होते. त्यामुळे त्याचा धीर सुटला मागच्या पडवीत आडवा पडून "आई , लौकर ये, मला सड्यावर साप चावला ....आता मी मरणार " म्हणत तो रडायला लागला.

मागोमाग राधाही आली. आज्जी, काकू आई पडवीत धावल्या. राधाने त्याना सगळी हकिकत सांगितली. थोडक्यासाठी गाडीची चुकामुक झाली नसती तर वेळेवर पडेल हॉस्पिटल गाठता आले असते. आता मोठी पंचाईत झाली. वेणूताई लग्न होवून सासरी आली तेंव्हा काही महत्वाच्या औषधींचे कंद नी वेली तिच्या घरी आणून लावल्या होत्या. त्यात हाड सांधीचा कांदा, सर्पदंशावरचा आणि सुलभ प्रसुती साठी वापरायचे कंद मागिलदारी केळी नी अळूच्या खोरणात कडेलाच लावलेले होते. तसेच मुळव्याध, कावीळ यावरच्या औषधी वेली डेगे जवळ फुलझाडांजवळ लावलेल्या होत्या. आईने त्याही स्थितीत न डगमगता सर्पकंदाच्या मुळाशी कोयतीने टोकरून पाचसहा मुंडळ्या काढल्या त्या पाट्यावर ठेचून त्याचा थलक दंशाच्या जागी आणि सगळ्या पावलाला लावला. काकूने त्याला जवळ घेवून पाणी पाजले. त्याला कुरवाळीत ती म्हणाली, “ मी नारळ ठेवून ठिकाणदाराला सांगणं केलेलं आहे. तू मरणार नाहीस. गाडी गेली तरी मुकुंदाकडे सायकल आहे . मी त्याच्याकडे निरोप धाडलेला आहे एवढ्यात तो येईल नी तुला पडेल हॉस्पिटलात घेवून जाईल. जनावर अडीच पाऱ्यांचे होते ना? आत्ता जेमेतेम अर्धा प्रहर सुद्धा झालेला नाय्ये.....अजून भरपूर अवधी आहे. तो पर्यंत पडेल गाठून तुला इंजिक्शन मिळेल. तू धीर सोडू नको. आम्ही तुला मरायला देणार नाय.”

तेवढ्यात घराखाली मळ्यात काम करणारे घाडी वाडीतले गडी बर्व्यांच्या घरी जमले. त्यांच्या घरापासून दहा मिनीटाच्या अंतरावर मराठ्यांच्या मुकुंदाचे रेडिओ टेप रेकॉर्डर दुरुस्तीचे दुकान होते, त्याची सायकल होती. निरोप मिळाल्यावर सायकलीत हवा भरून तो निघेपर्यंत उशीर झाला. जमलेल्या लोकांमध्ये बाळ्या राघव दांडगा गडी होता. तो पव्याला पाठुंगळीवर मारून चालत निघाला. पडेलात जायला दोन मार्ग होते. एक पायवाट होती. त्या वाटेत मध्ये खाडी होती. तिथे उतरणावर होडीने

पलिकडे जावे लागे. गाडीरस्ता थोडा लांबून खाडीवर बांधलेल्या पुलावरून जाई. बाळया राघव नी सोबतीला निघालेले गडी खाडीच्या उतरणावर गेले तेंव्हा होडी नेमकी पलिकडच्या तीरावर होती नी होडीवाला घरी गेलेला होता. बाळया सोबतचा मन्या बाईत खाडी पोहून पलिकडे जावून होडी घेवून आल. माणसं होडीत बसून पलिकडे पोचली. पलिकडे गेल्यावर माळगवे वाडीत वाट गाडी रस्त्याला मिळे.

मुकुंदा बर्व्यांच्या घरी पोचला तेंव्हा माणसं पव्याला घेवून मधल्या वाटेने रवाना झाली होती. तरीही मुकुंदा जीवाच्या कराराने तो सायकल दामटीत निघाला.तो माळगवे वाडीत पोचला त्यावेळी माणसं पव्याला घेवून येताना दिसली. आता जेमतेम दहा बारा मिनीटाचे मकण उरलेले होते, पव्याला सायकलीच्या दांड्यावर दबल सीट घेवून मुकुंदा निघाला. हॉस्पिटल पासून पाच मिनीटांच्या अंतरावर असताना पव्याला झापड आली नी तो कलंडला. मुकुंदा सावध होता . त्याने पाय तेकून त्याला सारखा केला नी पुन्हा सायकल दांबटली. ते हॉस्पिटला समोर गेले तेंव्हा तिथले मेडिकल ऑफिसर कुलकर्णी डॉक्टरजीपमध्ये बसून कुठेतरी व्हिजीटला बाहेर निघाले होते. सर्प दंशाची केस म्हटल्यावर त्यानी वॉर्डबॉयना हाक मारली. पव्या अर्धवट शुद्धीत होता. त्याला ऑपरेशन थिएटरमधे ठेवले.मुकुंदाने सायकलच्या दांडीला फडक्यात बांधलेले जनावर डॉक्टराना दाखवले.

त्यावेळी सर्पदंशावर द्यायची ॲण्टिव्हेनम इंजेक्शन्स ग्राम पंचायतीत ठेवलेली असत. पंचायतीतून ॲण्टिव्हेनम आणीपर्यंत पव्याचे हार्ट बीट मंद होत आले होते. हिरड्यांमधून रक्त यायला लागले होते. डॉक्टरनी एका पाठोपाठ दहा ॲण्टिव्हेनम चडवली तरी पव्याची झापड उतरेना. पडेल ग्राम पंचायतीतली ॲण्टिव्हेनम संपल्यावर तिर्लोट ग्राम पंचायतीत जीप पाठवून तिथून दहा ॲण्टिव्हेनम आणली. त्यातली सहा ॲण्टिव्हेनम चढवल्यावर पव्या सावध झाला नी कण्हायला लागला. मुकुंदाला आणखी मिनिटभर

उशीर झाला असता तर डॉक्टरांची नी त्यांची चुकामुक झाली असती नी पव्याचा अंक आटोपला असता. पण दैव बलवत्तर होते. पव्याने केलेली रुद्राची पुरश्चरणे कामी आली होती. म्हणून अनंत अडचणी नी आडमेळी येवूनही पव्याला वेळेवर उपचार मिळाले नी तो मरणाच्या दारातून परत आला. पव्याला चावलेला साप कोकणात ‘अक्करमाशी’ या नावाने ओळखला जातो. तो एवढा विषारी असतो की त्याचा दंश झाल्यावर तासाभरात इंजेक्शन नाही मिळाले तर पेशंट वाचणे कठिण असते. पव्याला हॉस्पिटलमध्ये आणि पर्यंत भलताच उशीर झालेला होता. खरंतर माणूस तेवढ्या वेळात दगावतो. मात्र सड्यावरून आल्यावर लावलेल्या सर्प कंदाच्या मुंडळीमुळे विष पावलाच्या भागातच थोपून राहिलेले होते आणि ॲण्टिचेनम दईपर्यंत बाराच उशीर झालेला असूनही सोळा ॲण्टिव्हेनम दिल्यावर कां होईना? पव्या जगला.

आठवडाभराने कडू पाण्याचे न्हावण घातल्यावरही दंश झालेल्या पावलाची सूज उतरेना. पायाला असंख्य जखमा झाल्या होत्या नीत्या चिघळून त्यातून पाणी वहायचं.असं म्हणतात की फुरसे किंवा कुसडा घणस खाल्लेला असला तर दंशकऱ्याला दुहेरी विषाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्याच्या जखमा बऱ्या न होता चिघळत राहतात. जवळ जवळ महिना दीड महिनाभर पव्याची शाळा बंदच होती. पव्या हिंडा फिरायला लागला होता पण पायाच्या जखमा चिघळलेल्या होत्या नी दंश झालेले बोट अजून सुजलेलेच होते म्हणून त्याला अनवाणी चालता येत नव्हते. घरात दारिद्र्य तर असं की मधली रास होती म्हणून दोन वेळा अन्न मिळायचं. घरात दातावर मारयलाही पैसा नव्हता, मग़ पव्याला बूट – चपला घ्यायला दहा बारा रुपयांची जम कशी करायची? आईने डोकीत घालायचं सोन्याचं फुल विकलं नी पव्याला बूट आणले. त्या प्रसंगापासून मात्र पव्या सावध झाला. त्याला भिक्षुकीत मिळणारे दक्षिणेचे पैसे तो घरात न देता वेगळे साठवायला

लागला. त्याकाळी दहावी झाल्यावर अकरावी बारावी साठी देवगडात जावे लागे.

सौंदाळे देवगड वस्तीच्या गाडीने सकाळी सहा वाजता

पातळ भात खावून पव्या देवगड गाठी. दुपारी अडीजच्या गाडीने घरी येईपर्यंत साडेतीन वाजून जात. भुकेने जीव जायची पाळी येई. तशाही परिस्थितीत पव्या साठ टक्के मार्क मिळवून बारावी झाला. बारावी पूर्ण झाल्यावर मुंबई गठायचे त्याच्या मनाने घेतले. तिथे काहीतरी नोकरी धंदाकरून डिस्टंट एज्युकेशनमधून डिग्री मिळवायची असे त्याचे स्वप्न होते. भाऊंची परिस्थिती सामधाम. मुंबईत रहायचे कुठे हा ही मोठा प्रश्न. पव्याने भिक्षुकी करून साठवलेले पाचशे रुपये पोस्टातून काढून आणले आणि तेवढी पुंजी घेवून मुंबई गाठली. त्याचा मामा, दोन मुलं नी बायको गोरेगावात मोतीलाल नगरमध्ये पत्र्याच्या दहा बाय दहाच्या झोपडीत रहायचा आजू बाजूला बहुसंख्य अ-मराठी वस्ती. चाळीस झोपड्याना मिळून पाच सार्वजनिक संडास अशा बकाल अवस्थेतही मामाने त्याला आपंगला. त्यांच्या झोपडी शेजारी शिवसेनेचा शाखा प्रमुख साळुंखे पक्क्या घरात रहायचा.

साळुक्यांच्या घरात पाईपलाईन आलेली होती, त्यावर आणखी चार टॅप जोडून आजुबाजुच्या दहा बिऱ्हाडाना प्रत्येकी पाच पाच बादल्या पाणी तो देई. त्यातही सार्वजनिक संडासात फारच घाण असल्यामुळे जादा पाणी लागायचं. सुरुवातीला मोतीलाल नगरातच एका कॅप्सुल कंपनीत दीडशे शे रुपये हप्त्यावर जॉब मिळाला. तो करून त्याने मराठी इंग्रजी टायपिंग शिकून घेतले आणि बी.कॉम. ची डिग्री मिळवली. गोरेगावात रहयला आल्यावर त्याचे पव्या हे संबोधन मागे पडले. त्या एरियात त्याला सगळेजण आदराने प्रवीण दादा म्हणायचे. मामाकडे राहिल्या दिवसापासून तो आपल्या खानावळीचा खर्च दरमहा देत असे. त्याला भिक्षुकीची कामंही भरपूर

मिळायची. त्यावेळी बहुजन समाजातली माणसं ब्राह्मणाला डाळ, तांदूळ, बटाटे अशी जेवणी देत. प्रवीणला मिळणारी जेवणी सगळया कुटूंबाला पंधरवडाभर पुरेल इतकी असायची. म्हणून मामी खानावळीचे पैसे नको म्हणे. मग प्रवीण दरमहा खानावळीची त्याने मनाने ठरवलेली रक्कम तो देवासमोर ठेवीत असे.

झोपडी पासून जवळच गणपतीचे देवूळ होते. आठवडा भरात तिथल्या व्यवस्थापकांशी ओळख झाल्यावर पव्याला एकादष्णीची कामे नी इतरही भिक्षुकीची कामे मिळायला लागली.पाणी देणाऱ्या शाखाप्रमुख साळुंखे यांच्याकडे तो सत्यनारायणाची पुजा सांगायला गेल्यावर ते चकितच झाले. त्या दिवसापासून त्याला नंबर न लावता दहा बादल्या पाणी मिळायला लागले नी रात्री गणपतीच्या देवळात झोपायची सोय लागली. बी. कॉम. होईपर्यंत रात्री देवळात झोपायची नी अभ्यासाची चांगली सोय झाली. कुठे कुठे शोध चौकश्या करून पव्या चांगली नोकरी मिळवायची खटपट करीत होता. टायपिंगची शेवटची परीक्षा दिल्यावर मामाच्या मित्राच्या ओळखीने एस्. एन्. डी. टी. युनिव्हर्सिटीत अकौंटण्टच्या पोस्ट साठी त्याने अर्ज केला. आठ दिवसानी इंटरव्ह्यूचा कॉल आला. पव्या नीट तयारी करून गेला होता. इंटरव्ह्यूला चाळीस लोक आलेले होते. प्रवीणच्या आशा मावळल्या होत्या.पण आठ दिवसानी त्याचे सिलेक्शन झाल्याचे मामाच्या मित्राने सांगितले आणि प्रवीण युनिव्हर्सिटीत दूरस्थ शिक्षण विभागात नोकरीला लागला.

विद्यापीठाचा कारभार मोठा होता. ऑफिस मध्येतर वेगवेगळया सेक्शन्सनध्ये शेकडोच्या संख्येत स्टाफ होता. दादरला एका वृद्ध जोडप्याचा मुलगा अमेरिकेत स्थाईक झालेला होता. डिपार्टमेंट मधल्या मित्राच्या ओळखीने त्यांच्या फ्लॅटमध्ये रोजची देवपूजा करायच्या अटीवर त्याची मोफत रहायची सोय झाली. प्रवीणने त्यांचा विश्वास संपादन केला.

कंपनीतला जॉब सांभाळून तो एम्. कॉम. झाला. त्याची आई भाऊ अधून मधून मुंबईला आले की प्रवीणकडे दादरला येवून रहायचे. त्याची हुषारी, कर्तबगारी आणि सद्वर्तन यांची कदर करून त्याच्या व्यंगासह त्याला स्वीकारणारी, विद्यापीठात जॉबला असलेली मुलगी त्याची सहधर्मचारिणी झाली. त्याचं प्रेम जमल्याचं कळल्यावर दादरमधल्या आजी आजोबानी त्याला लग्न करून आपल्याच बिऱ्हाडातच रहायची ऑफर दिली. तीन चार वर्षं त्यांच्याकडे राहिल्यानंतर तो स्वत:च्या फ्लॅटमध्ये बोरिवलीला रहायला गेला.

प्रवीणने आपल्या तीनही भावंडाना व्यवस्थित शिकवून मार्गी लावले. त्याची दोन सख्खी भावंडे त्याच्या छायेखाली राहून मुंबईतच स्थिर स्थावर झाले. वर्षं मागे पडली. विद्यापीठात युनियनचा अध्यक्ष म्हणून त्याने पंचवीस वर्षं काम केलं. कोकण विभागात अनेक शहरांमध्ये विद्यापीठाच्या शाखा सुरू करण्याच्या कामातही त्याने भरगोस योगदान दिलं. नोकरीत अकौंटण्ट पदापासून आरंभ करून त्याने ‘ऑफिस अधीक्षक’ पदापर्यंतचा पल्ला गाठला. त्याचा बोरिवलीला तीन बी. एच्. के. फ्लॅट आहे नी अपंगांचे पुनर्वसन करणाऱ्या सेवाभावी संस्थेचा तो अॅडव्हायझर आहे.

******

# ६. नाटकाचं वेड

त्या वर्षी दसरा झाल्यावर नकुल गावडे मुंबईतली खोली विकून कुटुंब कबिल्यासह खामडोशीत वापस आला. गिरणीतून मिळालेला फंड आणि खोलीचे पैसे; मोठी रक्कम बाळगणारी असामी म्हणून गावातले लोक त्याला मान द्यायचे. त्याचा मुलगा शकुनी मुंबईत वाढलेला..... भटासारखा शुद्ध बोलायचा. तसा तो मॅट्रिकच्या उंबऱ्यापर्यंत जावून आलेला. मॅट्रिकला असताना गिरणगावातल्या नाटकवाल्यांच्या संगतीने नाटकात कामं करायच्या नादात परीक्षेत तीनदा आपटी खाल्लीन. झालंच तर कधी मधी घोट ही मारायचा. पण बापूस ठासबंद पिणारा त्यामुळे शकुनीच्या पिण्याची घरात कोणीच फिकीर केली नव्हती. पण गेले पाच सहा महिने नाटकात कामं करणाऱ्या अर्ध्या वयाच्या नटीच्या नादाला लागल्याची कुणकुण बापसाला लागली. त्याच दरम्याने त्याची नोकरी संपली. पोरगा साफ वाया जाण्यापेक्षा मुंबई कायमची सोडून मुलखात जाऊया असा धोशा बायकोने लावला. जाणत्यानीही तोच सल्ला दिला नी खोली विकून तारकर मंडळी खामडोशीत रहायला आली.

गावातली पूर्वाई देवी खामडोशीतली ग्रामदेवता. गावात बहुसंख्य गाबीत, गावडे आणि भंडारी समाज. गावाच्या मावळत अरबी समुद्र नी दक्षिणेकडे विजयदुर्ग खारेपाटण खाडीचे फासूक खामडोशीच्या कुशीला भिडलेले. दर्याचे नस्त नी खाडी यांच्या दरम्याने नजर फाटेल एवढा धनांतर मळा. सड्यावर पूर्वाईच्या मंदिरा जवळ रांबोळाची बारमास व्हाळी उगम पावून

अर्ध्या मळयातून वहात खाडीला जावून मिळायची. त्या नस्तावर पाषाणी वळिवांचा पक्का बंधारा घालून उंडलीचा भक्कम दरवाजा बसवून खाडीच्या खाऱ्या पाण्याचा बंदोबस्त केलेला. पाऊस काळ संपला की अर्ध्या मळयात आणि दरवाज्याच्या अलिकडे दोन ठिकाणी आडवस करून गावकरी व्हाळीचं पाणी तुंबवीत. ऐन मे महिन्यातसुद्धा ढोराना पिण्याजोग पाऊलभर पाणी साठलेलं असायचं.

गावाला पावसात भातशेती नी उन्हाळी भाजीपाला पिकवणारा मळा लाभलेला. तो परखड रेशनचा काळ, जग दुनिया डुकरी (म्हणजे लाल रंगाचा अमेरिकेत डुकराना घालीत तो मिलो, कॉंग्रेस सरकारच्या कृपेने रेशनवर मिळायचा)खायची. पण खामडोसकर मोठ्या अभिमानाने सांगत, आमची ढोरांदुकू डुकरी खायनत नाय. आमी म्हनशात तर कमेटीत्सून (रेशन दुकान) साकरे शिवाय काय्येक घेयत् नाय. तांव कशाक आमच्या गावात हजामती करून 'पडपावनी'वर (वर्षभरच्या हजामतीच्या मोबदल्यात दिलेले धान्य) जगणारे न्हावी, तेंचा कुटूंब पोसतत." बहुसंख्य लोक स्वत:च्या होड्या नी मोठे पडाव सांभाळणारे. सराईनंतर मासेमारी सुरु झाल्यावर आजूबाजूच्या साताठ गावातले अडिज- तीनशे कामगार खामडोशीत होड्यांवर खलाशी म्हणून तर काहीजण मोठ्या सधन कुटुंबात माडांचं शिपणं, भाजीपाला जित्रब करणं अशी सिझनभर कमाई करीत. इतर गावांपेक्षा खामडोशीत चढ्यादराने मजुरी तीही जेवून खावून मिळायची. मच्छिमार कामगाराना भेस्तरवारी (गुरुवार) हप्त्याला पगार नी शुक्रवारी दिवसभर सुटी मिळायची. मोठे पडाव नी बलाव दर्यात रापणीने मासेमारी करीत. छोट्या होड्यांवाले खाडीत म्हावरं पकडीत.सगळा सधन , तालेवार समाज. गावातली जवळ जवळ सगळीच घरं मागेपुढे ओसरी पडवी असलेली चौसोपी.

पूर्वाईची जत्रा पौषात द्वादशी पासून ते पौर्णिमेपर्यंत भरायची.चतुर्दशीला आजूबाजूच्या बारा गावातले देव देवीला भेटायला यायचे नी पौर्णिमेला

समुद्रस्नान करून समराधनेचा प्रसाद घेवून परत जायचे. शेती वाडी ताठ नी मच्छिमारी करणारे सधन खामडोसकर उत्सवावर अमाप पैसा खर्च करीत. जत्रासुद्धा खूप मोठी; मालवण, खारेपाटण फोंडा, तरळा इकडचे कापडाचे, भांड्याचे नी मिठाईचे व्यापारी दुकाने लावायचे. एकादशीच्या संध्याकाळ पासून तो पौर्णिमेच्या दुसरे दिवसापर्यंत येणाऱ्या सर्व भाविकां साठी देवस्थानातून दुवक्त अन्न वाढले जाई. रोज रात्री स्थानिक भजने, एखादे दिवशी घाड्या - गाबतांचा तमाशा असे.



रोज देवीची पालखी बाहेर पडली की खामडोसकरांचे लाठी, बनाटी, चौरंगी नी दांडपट्ट्याचे खेळ होत ते तर पुऱ्या आसमंतात प्रसिद्ध. केवळ ते खेळ पहाण्यासाठी दशक्रोशीतले हजारोनी लोक रात्री तोबा गर्दी करीत असत. हातभर लांब लाकडी रिफांच्या फुलीला चार टोकाना चार हाती लोखंडी साखळ्या गुंफवून त्यांच्या टोकाला कापडी बोळ्यांवर करंजेल ओतून ते पेटवून कसबी खेळकरी चौरंगी फिरवीत असे. तसेच लाठीच्या एका टोकाला नी बनाटीच्या दुशा तोंडाना कापडी बोथे बांधून ते पेटवून खेळ होई. अधून मधून

घासलेटाचे हिलाल म्हणजे रॉकेलची चूळ भरून ती थुंकून पेटता बोळा धरला की भक्कन दोन तीन हात लांब अगीची ज्वाळ पेटायची.

काही कसलेले खेळकरी पायाना दोन- दोन तीन- तीन हात लांब लाकडी खुटे बांधून त्यावर उभे राहून तोल सांभाळीत लाठी बनाटीचे हात खेळून



दाखवीत ते कसब बघून प्रेक्षक थक्क व्हायचे. पालखीच्या वेळी उखळीबारही काढले जात. जवळ जवळ घरठेप एक बापया उखळ घेवून असायचा. विजयदुर्गा पासून ते फोंडा- कणकवली पर्यंत पैसेवाले लोक लग्नकार्यात

वरातीच्या पुढे खेळायला त्या स्वस्ताईच्या काळातही पन्नास - पन्नास रुपये सुपारी देवून खामडोशीतला लाठी दांडपट्टा बोलावीत असत

नकूळ गावात आला त्यावर्षी जत्रेचा कार्यक्रम ठरवण्यासाठी मेळ बसल्यावर शकुनी तारकराने गावड्याना हाताशी धरून तमाशा ऐवजी ग्रामस्थांचे नाटक करायचा बूट काढला. त्याला सगळ्यानीच होकार भरला नी ती सगळी जबाबदारी त्याच्यावरच सोपवली. जात्रेला महिनाभर अवकाश होता पण नाटक हा विषय तसा नवींनच असल्यामुळे दुसरे दिवशा पासून तयारीला सुरुवात झाली. शकुनीने सत्यवान सावित्री हे पौराणिक नाटक त्याच्याकडे असलेल्या पुस्तकातून निवडले. सत्यवानाच्या मुख्य पार्ट्यासाठी संपाती गावडे, सावित्री म्हणून दुष्यंत गावडे, यम कण्व गावडे, नारद धौम्य गावडे, तसेच इतर पात्रांसाठी माल्यवान, अंगद, मारीच, बभ्रुवाहन, दुर्योधन, जाम्बवान, द्रोण, सात्यकी अशी गावडे वाडीतली मंडळी निवडली. यात एक गम्मत अशी होती की गावडे वाडीत पौराणीक नावे ठेवायचा दांडगा रिवाज होता.जयद्रथ, माल्य, शल्य, चित्रसेन अशी रामायण महाभारतातलीच नव्हे तर नामकरणा पूर्वी पोथ्या पुराणे शोधून शोधून पौराणिक नावे निवडली जात.

शकुनी गावडे दिग्दर्शन करणारा शिवाय नाटक हा विषयच मुळात नवीन असल्यामुळे बाकीची सगळीच जोखीम त्याच्यावर म्हणून नाटकात कसलाही पार्ट करणार नव्हता. पार्टी निवडल्यावर प्रत्येक पात्रासाठी त्याच्या त्याच्या संभाषणाची लेखी प्रत करून द्यायचे ठरले. अर्थात दोन पार्टी सोडले तर झाडून सगळे अक्षरशत्रू. बरे ते इतर कोणाची मदत घेतील म्हणावे तर गावात सुद्धा एका हाताच्या बोटावर मोजावे इतकेही साक्षर मिळणे शक्य नव्हते. तेंव्हा रोज नेमाने संपूर्ण नाटकाची तालिम घ्यायची यावर सर्वांचेच एकमत झाले. रोज ऐकून ऐकून प्रत्येकाला हळू हळू आपापले भाषण आपोआप पाठ होईल असे अंगद नी कण्व गावड्यानेही छातीठोक सांगितले. सगळ्याच पार्ट्यांच्या घरी

किमान तीन चार कायम गडी ठेवलेले असल्यामुळे रोज नेमाने तालमीना हजर राहणे शक्य होते.

दुसरे दिवसापासून गावडे वाडीत जालंधर गावड्याच्या घरी तालीम सुरु झाली. त्याच्या घरातले दोन्ही बाप्ये कुटूंब कबिल्यासह मुंबईत रहायचे. घरी त्यांची विधवा बहिण , म्हातारे आई बाप नी दोन घरगडी एवढीच माणसे नी ते घरही एकवशी म्हणून निवडलेले. दुपारी जेवण वगैरे आटोपल्यावर दोन च्या सुमाराला नट मंडळी जमू लागली. तालिम सुरु झाल्यावर शकुनीच्या एक अडचण लक्षात आली की, शुद्ध छापील भाषेत बोलणे कोणालाही जमणे महाकर्मा कठिण. पहिल्या दिवशी दिवेलगणी पावेतो जेमतेम दोन प्रवेश उरकले. कंटाळलेले पार्टी एकेक करून गूल व्यायला लागले. द्युमत्सेनाचे काम करणारा सात्यकी गावडातर ठासबंद बेवडा.तो तालमीला येताना दारवेची बाटली सोबत घेवूनच यायचा. जालंधर गावड्याच्या घराशेजारी गवताची उटी (गंजी) डाळलेली होती. तिथे बाटली दडवून ठेवी नी मध्ये मध्ये लघवीच्या निमित्ताने बाहेर जावून घोट मारून येई. काही वेळा शेवटचा प्रवेश सुरू झाला कि सात्यकीला तोंडावर पाण्याचे हाबके मारून हालवून हालवून जाग़ा करावा लागे.

नित्यनेमाने वेळ उशिर करून कां होईना पण सगळे पार्टी हमखास येत मात्र. पण शुद्ध उच्चार होण्यासाठी एकच वाक्य पुन्हा पुन्हा म्हणायला लागले की कंटाळून काही ना काही मोडी मारून न सांगताच तालिमीतून मध्येच निघून जात. शकुनीने दुसरे दिवशी त्याबद्दल संबंधिताला हटकलेच तर तो बाजूलाच ; तिसराच पार्टी त्याची कड घेवून शकुनीशी हुज्जत घाली. "आता भटाची शुद्द भाशा आमका नाय उलटत तेका काय करनार? सगळाच एकाम कसा जमनार?" हा प्रकार फारच वाढायला लागला नी एकदा प्रकरण हातघाईवर आले. तेंव्हा ज्याच्या घरी तालीम होई त्या जालंधर गावड्याचा म्हातारा सात्यकी गावडा म्हणाला, " रे शकुन्या, द्येवान अक्कल वाटल्यान तवां तू

हगोक गेलं हुतंस काय रे? सुद्ध बोलोक तां काय किर्तान हां की पुरान (पुराण/प्रवचन) सोडूचा हा? नी बघूक येनाऱ्यात धा ईस भट - बामनांची लोकां सोडली तर सुद्ध बोलणां समाजणार कोनाक? बगनारे सगळे ल्वॉक अडानी...... नी गावड्या- गाबताची जात म्हंजे माशे खावन् खावन् येकेकाची जीब म्हनशी तर भोळसावलेली, तू कितीव शिकस्त क्येलस तरी काय उपेग नाय....जां काय चल्लां हा ना तां तसाच चलाने..... जेका जसा जमात तसा तो बोलॉने, ल्वॉक कायपन म्हननार नाय..... "

म्हातारा बोलला त्याची प्रचिती हळू हळू शकुनीला आली. कितीही घटवून घेतलं तरी दरवेळी तीच चूक आणि दर वेळी नवीन चूक. शेवटी कंटाळून पार्टी जसं बोलेल तसं रेटून नेत शकुनीने तालमी रेटून न्यायला सुरवात केली. गावडे मंडळी नाटक बसवताहेत ही वार्ता षटकर्णी झाल्यावर एकदिवशी मराठी शाळेतले गोडवे गुरुजी शकुनीला भेटायला आले. कुठचं नाटक , काय याची चौकशी केल्यावर गुरुजी म्हणाले, " काय हो, शकुनीभाऊ, नाटकात पदें आहेत की नाय? आता नाटक म्हटल्यावर मुख्य मुख्य पात्राना तरी थोडीफार पदें ही हवीच. तुम्हाला गाण्याचे कितपत अंग आहे? म्हणजे गरज पडली तर पदें बसवायला थोडीफार मदत करीन मी पण." असे बोलून त्यानी "जा भय न मम मना " हे पद आळवून आळवून गाऊन दाखवले.

दुसरे दिवशी गोडवे मास्तर हातपेटी घेवून पदें बसवायला हजर झाले. नाटकातले सावित्री ला असलेले एक गाणे " नच मी निर्बला मी तर सबला" या पदाला चाल लावून त्यानी ते गावून दाखवले आणि सावित्रीचा पार्टी दुष्यंत गावडे, त्याला शिकणे सुरु केले, त्या बापड्याला निर्बला हा शब्द काय धड उलगडेना निभरला - निबदला- निबुदला करता करता काळवं पडलं बोंबलून बोंबलून बापड्याचा घसा बसला. दोन तीन दिवस हा प्रकार बघितल्यावर मग दुष्यंत गावड्याला येणारं घाड्यांच्या तमाशातलं 'सखा सजना हो मनहरना' हे पद घ्यायची मुभा मिळाली. सत्यवानाच्या पार्ट्याला पण असच मूळ पदा

ऐवजी 'देवातुज्या दरबारी रे' हा भजनातला अभंग आणि नारदाला 'देवा पांडुरंगा माज्या माईबापा' अभंग देवून मास्तरानी प्रश्न सोडवला. यमाचा पार्टी कण्व गावडे तमाशात बतावणी करणारा त्याला गौळणी तोंड पाठ. पण नाटकात बापड्याला एकही पद नव्हतं. त्याने खूप हांजी हांजी केली पण डायरेक्टर नी, "यम गाणं म्हणायला लागला तर लोक टर उडवतील" अस बोलून नकार दिला. गोडवे मास्तरानी पण सक्त नकार दिला.

नाटक दहा दिवसांवर आलं आणि दोन सोबती घेवून शकुनी पडदे आणायला मुंबईला रवाना झाला. कापड घेवून नवे पडदे शिवून घ्यायला अवधीच नव्हता. नशिबाने मुगभाटला एका डबघाईला आलेल्या कंपनी कडे ड्रॉपच्या मखमली पडद्यासह महालाचा सेट आणि एक प्रवेश पडदा मिळाला. रोखीचे गिऱ्हाईक मिळाले म्हणताना अल्प स्वल्पात सौदा पटला. मग दादरला मेकपचे सामान खरेदी करून मंडळी चौथ्या दिवशी गावात हजर झाली. त्रयोदशीला नाटक करायचे ठरले. गावकरी हौशीने मदतीला सरसावले. ऐस पैस स्टेज घालून झाला. मागच्या बाजूला घोंगड्यांचा आडवसा करून रंगपट करण्यात आला. ड्रॉपचा पडदा मखमली. त्यावर कडेनी नक्षीकाम केलेलं आणि शिरोभागी चम् चम् करणारी सोनेरी झालर लावलेली. दोन बाजूना कमळात उभ्या राहून किंचीत् पुढे झुकून दोन्ही हातांची ओंजळ करून फुलं उधळणाऱ्या कंचुकीधारी देखण्या अप्सरा काढलेल्या विंगा. बत्त्यांच्या (पेट्रोमॅक्स) लखलखाटात दिसणारा रंगमंचाचा नजारा पाहणाऱ्याला खिळवून ठेवणारा होता. मुळात बत्ती हेच मोठ्ठं अप्रूप. जत्रेला आलेली मंडळी कुतुहलाने समोरचा ड्रॉप बाजुला करून घोळक्याने आत काय आहे ते बघायला बिन दिक्कत स्टेजवर चढत. असं करता करता गर्दी वाढली नी एकच झुंबड उडाली. ओढाखेचीत ड्रॉपच्या बाजूला बांधलेली कनात फाटून खाली लोंबायला लागली. मग मात्र जाणते गावकरी धावले. पाचसहा दांडग्या बापयानी अंगावर मारायला धावून जात बघ्याना पिटाळून लावले नी दहा बारा बापये हातात दांडे

घेवून आळीपाळीने राखणीला थांबले तेंव्हा मात्र लोकांची उपल्वट कमी झाली.

शकुनीने शोध चौकशी केल्यावर वाड्याचे वामनराव तावडे मेकप करतात असे कळले. नाटका दिवशी संध्याकाळी वामनराव हजर झाले. पेटीसाठी गिर्यातल्या बाबा देवधराना पाच रुपये मेहेनताना आगावू त्यांच्या पायपेटीसह बोलावले. तबलजी गावातलाच हरी नळेकर असा सगळा संच सजला. जत्रेच्या आधी दोन दिवस तालीम झाली होती. पण त्यानंतर सगळ्या गावातच तयारीची गडबड उडालेली . एकही पार्टी शकुनीला भेटला नव्हता. नाटकाच्या संध्याकाळी शकुनी रंगपटात आला. मेकपवाले तावडे , पेटीवाले बाबा देवधर वेळेवारी हजर झाले पण एकाही पार्ट्याचा पत्ता नव्हता. गावातली समंजस तरणी पोरं मात्र हात जोडून मदतीला उभी होती. एकेकाला एकेका पार्ट्याच्या घरी बोलावायला पिटाळून शकुनी सचिंत मुद्रेने वाट पहात राहिला. घंटाभरात एकेक पार्टी उगवायला लागला, वामनरावानी मेकपचे सामान मांडले. आधी मुख्य पार्टी आणा. त्यानी फर्मान सोडले. सावित्री आणि सत्यवानाची म्हातारी आई या स्त्री पार्ट्यांची उस्तवारी जास्त म्हणून पार्टी बभ्रूवाहन आणि दुष्यंत गावडे याना आधी रंगवायचे असे ठरले. त्यांचे अवतार बघितल्यावर वामनरावानी कपाळावर हात मारून घेतलेनी. त्यानी दोन दिवस गडबडीत दाढीच केलेली नव्हती . 'अरे न्हाव्याला बोलवा आधी ' त्यानी फर्मान सोडले.

गावात तेली, कुणबी, म्हार, चांभार, परीट, सुतार, सोनार, भट, भंडारी, सगळ्या जातीचे लोक होते. फक्त धनगर, न्हावी आणि मुसलमान गावात औषधालाही मिळाला नसता. गावात सुपिक मळा, विपूल भात शेती व्हायची नी लोकही सढळ हस्ते पडपावणी द्यायचे. त्याखेरिज लग्नात रेग़ धरणे, लेकरांचे जायवळ या विधीना पैशाने गबरगंड झालेले गाबीत, भंडारी हात सोडून पैसे देत. म्हणताना बाजुच्या गावतले तीन न्हावी घरं वाड्या आपापसात वाटून घेवून

आठवडाभर कोणा ना कोणाच्या ओसरीवर पडशी टाकून मुक्कामी रहात. ते जिथे पडशी टाकीत त्या घरची होवरेकरीण त्यांना मजबूत ठाय वाढून द्यायची. न्हावी आठव्ड्यातून एकदा रविवारी आपल्या गावी जात. ते पुन्हा मंगळवारी भिणभिणताना हजर होत. स्टेजची राखण करणारांपैकी कुणीतरी गेले नी दहा मिनिटात धोकटी घेवून दोन न्हावी हजर झाले.

दुष्यंताची दाढी होत आली तशी तो बाजूला सरकला. त्यावर तावडे म्हणाले," रे येडझव्या बाजूक काय व्हतं , आदी मिशी काडून घी......" त्यावर जोरात मुंडी हालवीत दुष्यंत म्हणाला, " माज्ये आवस् बापूस जिते आसत् आजून...... मी मिशी नाय भादरणार..... काय तां व्हवने....!" शकुनी, वामनराव तावडे नी गंग्या बाबल्या न्हावी चोघेही परोपरीने समजूत काढून दमले पण दुष्यंत कसाच ऐकायला तयार होईना. स्टेज राख़ायला थांबलेल्यातला धृतराष्ट्र गावडे पोक्ता पुरवता त्याने शक्कल लढवीत म्हटले," वंयच् दम धरा..... ह्येचो तोडगो मी सोडून येतय्....." नी तो चालू पडला. त्याने सरळ दुष्यंत गावड्याचे घर गाठले. अंगणातूनच दुश्याच्या आयशीला हाकारीत तो ओरडला, " ग्ये गंगाय... आदी भायर् ये." मागिलदारी भांडी घाशीत बसलेली गंगाय घाबरून राखभरल्या हातानी तशीच पुढीलदारी आली. तीला पहाताच धृतराष्ट्र गावडा म्हणाला, " आता तूच सांग.... हे प्वॉर नाटाक करतंहत तां देवीच्या वार्षिकाचा काम हां ना? धा गावची मान्सा इली हत तेंच्या सामनी तुजो झील गावाचा नाक कापुक निगालोहा ह्यां बरोबर हा काय? तूच सांग?"त्यावर फडा फडा थोबाडित मारून घेत गंगाय म्हणाली, " दाजीनुं, झालां काय ? काय केल्यान माज्या झिलान?"

आवाज चढवीत धृतराष्ट्र बोलला, " काय केल्यान्? तुजो झील साईत्रेचा काम करतांहा ना नाटकात? ही साइत्री म्हंजे गावदेवी पूर्वाई सारकी मूळ मायाच ना? तीचा रूप जर सारक्या दिसला नाय तर पूर्वाय नी मूळमाया ह्जेंचो कोप व्हयत् की नाय सांग तू? " बिचारी गंगाय गर्भगळित होवून थरथर

कापायलाच लागली. हात जोडीत ती म्हणाली, 'दाजीनुं ..... तुमी काय म्हनतास तां माका काय उलगडय ना..... नीट समज पाडून सांगा." मग आवाज नरम करीत धृतराष्ट्र बोलला, " तर ती साईत्री मिशी सकट उबी ऱ्हाली तर कसां दिसात आदी सांग तू.....बायल मानसाचो पार्टी म्हटल्यार मिशी काडून सोंग करूक व्हया की नको.....?" आता दुष्यंताचा बापूस विदुर तोंड उघडता झाला. " व्हय तर , आता घाडयांचे प्वॉर तमासो करतत तवां गवळणीचा स्वांग घितलेले बापये मिशी काड्डत ना?" त्याला थांबवीत धृतराष्ट्र म्हणाला, " ह्यां जरा तुमच्या येडझया दुष्यंताक सांगा..... तो मिशी काडून घेवक् तयार व्हयना नाय..... म्हंता माजे आवस् बापूस जिते हत, मी मिशी न काडताच साईत्रीचो पार्ट करणार....किती सांगला तरी कसोच आयकत नाय हा...आमी हात टेकलंव तेच्या फुडे..... "

धृतराष्ट्र गावड्याचे सगळे बोलणे ऐकल्यावर ओसरी वरच्या गडव्यातले पाणी हातावर ओतून पदराला हात पुशीत गंगाय म्हणाली, "चला भावजीनुं, दुस्यन कसो आयकत नाय बगतंय मी...." जाता जाता आंगणात पेळेवर टाकलेल्या तुरीच्या भाऱ्यातले दोन हात लांबीचे ठोंबस ढाक खेचून घेत ती तरा तरा निघाली. गंगाय रंगपटात शिरली तेव्हा दुष्यंत फुरंगटून बाजूला बसलेला होता. काय होते आहे हे कळण्या आधीच गंगायने हातातल्या ढाकाचा असा वादाडा ओढला की, दुष्यंत कूळकूळत "आयायग्ये....म्येलय" असे ओरडला. " म्येल्या मिशी न काड्ट्टा साईत्रीचो पार्टी करणार तू...... ल्वॉक तोंडात श्यान घालतीत ना...चला रे पोरानो ह्येका आडवू घालून मिशी खरडवा ह्येची..... कसो आयकनां नाय बगतंय् मी...." त्यावर हात जोडीत दुष्यंत म्हणाला, " मी घेतय् मिशी काडून.... तू घरा जा आये."

बाबल्याने वस्तरा पाजळून घेत चिमटीने गालफड ताणून धरीत अल्लाद मिशी उतरली.तेवढ्यात द्युमत्सेनाचे, सत्यवानाच्या बापाचे काम करणारा पार्टी सात्यकी आला तोच मुळी तलमत तलमत... त्याला आणणारानी आत आणून

शकुनी समोर बसवल्या बरोबर तो तिथेच आडवा झाला. सत्यवानाचा पार्टी संपाती गावडे , त्याला शोधायला गेलेला जनमेजय खवळे हात हालवीत म्हणाला, "शकुनी भाऊ. संपाती घरी नाय .... कल राती घोव बायलेचा भांडान झाला नी फाटपटी संपात्याची बायल् पळॉन ग्येली..... दोपारसर ती इलीली नाय म्हंताना होडी घेवन् बायलेक् सोदू साटना संपाती सासरवाडीक, मीट्मुंबरीत ग्येलो...आता काय तो येयत् नाय नी तुमचां नाटाक काय उब्या ऱ्हवत नाय आज..... "

देवीच्या पालखीच्या भोवत्या आटोपल्या नी लोक समोर येवून बसले. दरम्याने गावतल्या पुढारी माणसानी विचार विनिमय करून लोकाना वस्तुस्थिती काय आहे ते सांगून हात जोडून माफी मागायची असे ठरवलेले होते. स्टेज समोर गर्दी जमलेली पहाताच जाणत्यानी पडदा वर करायला सांगितला. पोलिस पाटील, पुर्षा भंडारी, तातू पुजारी, भलुकाका लळित आणि वामनराव तावडे अशी दशक्रोशीतली तालेवार मंडळी स्टेजवर हात जोडून उभी असलेली दिसली. त्यानी हात उंचावीत लोकाना शांत रहायची खूण करताच कालवा थांबला, भलुकाका म्हणाले," लोकहो, तुम्ही ज्या नाटकाची डोळयात प्राण आणून वाट पहात अहात, ते नाटक आज काही अडचणीमुळे होवू शकत नाही."

आता पुढे सरसावत पुर्षा भंडारी खड्या आवाजात बोलला, " आता काय अडचण म्हंशात तर सत्यवानाचो पार्टी संपाती गावडो, तेची बायल् घोवाच्या रागान् पळान् ग्येली त्येचा म्हायार मीट मुंबरीत आसा... तां थंयच गेल्ला आसनार म्हनान तेका सोदूक तकडेच गेल्लो.... तो काय अजून इलेलो नाय.... दुसरा म्हनशा तर सत्तेवानाच्या बापसाचा काम करनारो झिंगो सात्यकी गावडो, तेका म्हनशात तर ह्या येडझायानी नाटकात घितलानी ह्यांच मुदलात चुकलंला हा... तो झिंग़ॉन पडलोहा तो काय उजवाडासर उटात असा वाटत नाय. म्हंताना मंडलीनुं आजचा नाटाक रद्....."

पोलिसपाटील भीमराव खवळे म्हणाले, " तर मंडळीनु संपातीक आमी उद्या परत हाडतलंव नी उद्या राती नाटाक करतलंव..... नाटाक करूची खामडोसकरांची म्हनशा तर पयलीच येळ हा. आता असली अतरी आफत येयत् ह्या आमकातरी काय म्हायत्......मी तुमच्या पाया पडतंय तुमी निरूस व्होवचा नाय. नातकाच्या बदली आमचे दांडपट्टेवाले, पालक्ये सामनी खेळले तेच्यापक्षी वेगळे प्वॉर खास नवे ख्याळ करून दाकवतलेहत ते बगा.... नी आमका मापी करा. "

सकाळी सुकू पडण्या आधीच गावातली बुजुर्ग मंडळी होडी काढून संपातीच्या मागावर रवाना झाली. सूर्य मध्यान्हीला आला नी संपाती, त्याची बायल् याना घेवून मंडळी गावात आली. सात्यकी झिंगून पडू नये म्हणून दोन पोरगे दिवसभर त्याच्यावर पहारा धरून राहिले. रात्री पालखीच्या भोवत्या संपल्यावर माणसानी स्टेज समोर गर्दी केली. दोन घंटा झाल्या. पेटीवाले, तबलजी स्टेज समोर जावून बसले. बाबा देवधरानी पट्टी धरली. हरी नळेकराने तबला लावला. थोड्या वेळात तिसरी घंटा झाली. अशी मध्ये मध्ये घंटा कां वाजली ते लोकाना खरंतर कळलंच नव्हतं. नाटक सुरू होण्याआधी तीन वेळा घंटा होतात हा संकेत लोकाना कुठे माहिती होता?

स्टेजवर पडद्याआड बत्तीच्या उजेडात बरीच मंडळी जमल्याचा अंदाज तलम पडद्यातून दिसणाऱ्या धूसर छटांमुळे येत होता. आता आतली लोकं गाणं बोलायला लागली. पेटीचे सूर ऐकू आले नी तबला कडकडू लागला. लोक गप्पकन् शांत झाले नी आवाक् होवून गीत ऐकू लागले. ती नांदी होती. नांदी संपली, पडदा वर गेला आणि "नारायन नारायन " म्हणत नारदाचा पार्टी तंबोरा वाजवीत ' देवा पांडुरंगा माज्ये माईबापा " हा अभंग घोळवून म्हणत राहिला. " ग्ये बाय माज्ये ह्यो नारद, " म्हणत बाया बापड्या पुढे धावल्या नी स्टेजसमोर जावून डोकं टेकून पाया पडून कडोसरीचा पैसा नारदाकडे भिरकावून हात

जोडीत त्या परत फिरल्या. आता स्टेज समोर पाया पडाणारांची एकच झुंबड उडाली.



लोक पाया पडताना बघून पार्टी धौम्य गावडे भलताच चेवाला आला.अभंग म्हणून झाला तरी अजून गर्दी आरेखत नव्हती. मग तारतम्य राखून त्याने दुसरा अभंग सुरु केला. साधारण पंधरा मिनिटानी पाया पडणी संपली नी पुढचा भाग सुरु झाला. भाषण कोणाचेच धड पाठ नव्हते. प्रॉम्प्टर बंडू मास्तर लळित नी गोडवे गुरुजी दोन विंगात उभे राहून संवाद वाचीत होते. गोंधळात त्यांचेच वाचणे मागेपुढे होत असल्याने पार्टी अधिकच बावचळत. पण एक अंक होईतो हळू हळू सगळयांचा धीर चेपला. दरम्याने प्रॉम्पटरांची गल्लत शकुनीच्या ध्यानात आल्यावर गोडवे गुरुजीना थांबवून नव्याने कुठून सुरु करायचे ते दाखवले. प्रेक्षकांमध्ये काही जाणकारही होते, दीनानाथ, बालगंधर्व यांची नाटके पाहिलेले सुद्धा नाटकाचे पडदे बघून चाट झाले. बालगंधर्वांच्या

रंगमंचाच्या तोडीस तोड असा तो भव्य दिव्य सेट बघून मध्यंतरात शकूनीची भेट घेवून जाणत्यानी त्याची पाठ थोपटली.

तिसरा अंक सुरु होवून यमाची एंट्री झाली नी भाविकानी पुन्हा स्तेज समोर्र पाया पडणीला झुंबड केली. लोक भक्तिभावाने पैसे फेकू लागले. एवढा गदारोळ झाला की सावित्री नी यमाला संवाद म्हणणे अशक्य झाले. मग तारतम्य राखून यमाने मागचा पुढचा विचार न करता गौळण म्हणायला सुरवात केली. शकुनीने कपाळावर हात मारीन घेतला. पण प्रेक्षक मात्र खुष होवून टाळ्यांचा कडकडाट करू लागले. त्याना यात काहीच गैर वाटले नाही. तो प्रवेश संपला नी शेवटचा प्रवेश सुरू झाला. सत्यवानाचे म्हातारे आईवडिल स्टेजवर आले. दोन मिनिटे झाली तरी कोणच काय बोलेना. बंडू मास्तराने बाईला हाक मारून इशारा केल्यावर ती एक वाक्य कसेबसे बोलली पण सत्यावानाचा म्हातारा द्युमत्सेन काहीच बोलेना**....** प्रेक्षकात समोर बसलेले कोणतरी चाबरट पोर मोठ्याने ओरडले, अरे कायतरी बोल म्हाताऱ्या .... त्यासरशी कातावत विंगेतल्या प्रॉम्प्टरकडे तोंड वळवीत पार्टी ओरडला, ' अरे जरा मोट्यान वाच रे गोडये मास्तरा.... तु काय वाचतंस तां माका झ्यॉट पन आयकोक् येयना नाय रे......" गोडवे मास्तरानी मोठ्याने वाचून दाखवल्यावर पार्ट्याने गोळाबेरीज करीत वाक्य म्हटले. मग म्हातारी बोलली. सत्यवान सावित्रीने प्रवेश केला. यावेळी परत म्हाताऱ्याची गाडी अडकली. सत्यवान हळूच बोल बोल म्हणून खुणा करू लागल्यावर पार्टी ओरडला, " गोडये मास्तर येकाम लांबडा लांबडा वाचून दाकवू नुको , तां माका काय उलटत नाय. तुकडे पाडून दिवा." आता बंडू मास्तर गोडवेंच्या जागी गेले नी त्यानी म्हाताऱ्याचे संवाद तुकड्या तुकड्याने द्यायला सुरुवात केली. शेवटी कसेबसे नाटक संपले नी पडदा पडला.

झालेल्या प्रकारामुळे शकुनी फारच नाराज झालेला. पण प्रेक्षक मात्र भलतेच खुष झालेले. रंगपटाबाहेर आल्यावर लोकानी शकुनीच्या भोवती कडे

केले, नी त्याच्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव केला. खामडोसकरानी नाटकाचा नवीन पायंडा पाडल्याबद्दल लोकानी मुक्तकंठाने तारीफ केली. जत्रा उरकली नी पंच मंडळी हिशोबाला एकत्र बसली. नारद , यम यांच्या पाया पडणीचा बराच गल्ला साठलेला. शकुनीला रंगपटाचा भाडेखर्चासुद्धा हिशोब देवून पंचानी त्या बाहेर सवाशे रुपये बक्षिसी केली. गावडे मंडळींचे नाटक झाले नी पुढच्या मोसमात नाटकांचे जसे पेवच फुटले. पहिली जत्रा देवदिवाळीला चौंडेश्रीला भरायची. तिथल्या लोकानी शकुनीला पाचारण करून गिर्यातल्या लोकांचे नाटक बसवून द्यायची त्याला गळ घातली. त्यानी महाभारतातल्या कथानकावर कुठलेसे नाटक बसवले. आता कुठेही नाटक़ असले तर पडदे शकुनी कडून भाड्याने नेत. काही गाव तर त्याला मेहेनताना देवून दिग्दर्शन करायलाही बोलावीत.

त्या नंतर पुरळ गावात 'एकच प्याला' हे नाटक झालेलं. ह्यात काम करणारी सगळी पांढरपेशी मंडळी. त्यानी शिस्तीत तालमी घेतलेल्या. सगळ्या पार्ट्यांचे संवाद तोंडपाठ. सगळी संगितप्रेमी नी गाण्या बजावाण्याचा व्यासंग जोपासलेली मंडळी.नाटकाला आजुबाजूच्या गावावतली झाडून सगळी मंडळी जमलेली. बरोब्बर नऊ वाजता तिसरी घंटा झाली नी नांदी सुरु झाली.नाटक बहारदार झालं. पहिला अंक संपल्या पासून बक्षिसांची खैरात सुरु झाली. बक्षिसाच्या रकमेतून नाटकाला केलेला सगळा खर्च वसूल होवून दीड दोनशे रुपये शिल्लक राहिले. सिंधू -गीता अशी स्त्री पात्रं पुरुषानीच सादर केलेली. पण ती इतकी हुबेहूब वठवलेनी की जुणे जाणते म्हणाले, बालगंधर्वाच्या तोडीचे नाटक केलेनी हो पुरळकरानी.नाटकात सिंधूचे हाल बघून बाया बापड्या हमसा हुमशी रडल्या.पुढे त्याच नाटकाचा प्रयोग खामडोसकरानी खर्चवेत देऊन पूर्वाईच्या जत्रेवेळी केलेनी.

पुरळकरांचे नाटक गाजले म्हणताना वाडे गावातल्या नी आमच्या पडेल गावातल्यांचीही कुय चाळवली. या तीनही गावातल्या ग्रामस्थां मध्ये अंतर्गत

एक सुप्त स्पर्धाच होती म्हणाना. वाड्यातल्या जाणकार लोकानी पुण्यप्रभाव नाटक बसवलं. त्यावेळपर्यंत वामनराव तावडे हे रंगकर्मी म्हणून प्रसिद्ध झालेले. शिवाय त्यानी नेपथ्याचाही स्वत:चा संच उभारलेला. वाडेकरांचं नाटकही चांगलंच वठलं. त्यांच्या नाटकाचे खामडोशीत, मोंडात नी त्या नंतर कट्ट्यावर तिकिट लावून प्रयोग झाले. तिन्ही ठिकानी भाऊतोबा गर्दी झालेली. वाडेकरांच्या मागोमाग आमच्या गावातल्या मुंबईकरानी 'दर्या सारंग सावळया तांडेल' हे नाटक बसवलं. वारीक वाडीत दरवर्षी थोरल्या दिवाळीनंतर त्यांच्या कुळाव्याची समाराधना होई. तो मोका साधून त्यानी नाटकाचा बेत योजला. नाटकाच्या तालमी मुंबईत घेतलेल्या होत्या. वाडीतले लोक फक्त स्टेज घालून देणार होते. बाकी सगळा सरंजाम मुंबईतून यायचा होता. आजूबाजूच्या गावात लोकाना समजण्यासाठी मुंबईत पेंटर कडून ड्रॉईंग पेपरवर मोठ्या अक्षरात वीस बोर्ड बनवून घेतले. नाटका पूर्वी आठवडाभर खास माणसं रवाना करून आजूबाजूच्या गावांमध्ये चवाठ्या चवाठ्यां वर बोर्ड लागले.

या नाटकाचं खास वैशिष्ट्य म्हणजे त्यात इंदू काणकोणकर, सुमन नाईक या दोन नट्या काम करणार होत्या. नाटकाच्या दोन दिवस अगोदर मुंबईकर मंडळी नट्यांसह यायची होती. ही बातमी गावभर पसरलेली. त्याकाळी मुंबईवरून बोटीने लोक यायचे . तसेच मुंबई विजयदूर्ग एस्टी ही सुरू झालेली. स्टॉपवर नट्या बघण्यासाठी दोनशे माणसं जमलेली. गाडी थांबली नी नाटकवाले खाली उतरले. आलेल्या माणसांत बिन काष्ट्याच्या (पाचवारी गोल साडी) साडीतल्या दोन वेण्या घातलेल्या त्या नट्या असणार हे लोकानी अचूक ओळखलेनी. नाटकाला चार दिवस अवकाश होता. पण नट्या बघायला त्या दिवशी संध्याकाळ पासून ते नाटकाच्या दिवसापर्यंत आजूबाजूच्या गावची माणसं सकाळ संध्याकाळ पडेलात खेटे घालीत. रस्त्याने येणाऱ्या पाचसहा परकी गावातल्या लोकाना कोणी विचारलं, “ खंय चल्लास रे? तर ते

बिनदिक्कत सांगत," पडेलात नाटकात काम करूक हुंबयच्यो नट्यो इल्योहत ना, त्यो बगूक जाताव."

नट्या बघायला आलेली माणसं शोध चौकशी करीत वाडीत ज्या घरी नट्या उतरलेल्या होत्या तिथे गेल्यावर अंगणात बाहेर अंगणात वावरणाऱ्याला विचारित हय ऊंबयच्यो नट्यो इल्योहत ना? आमी बगूक इलाव." त्यावेळी नट्या ओसरीवर वगैरे असल्या तर तो माणूस त्यांच्या दिशेने अंगुली निर्देश करीत ' ती जांबळा कापाड न्हेसलेली नी दुसरी हिरव्या कापाड न्हेसलेली."



पण जर त्यावेळी नट्या आत असतील तर तो माणूस आत जाऊन सांगे, "भायर् कलंबयवाडकरी / तिर्लोटीतले बापये नटयो बगूक इले हत......" मग कोणतरी जाणता नट्याना सांगे जावा ग्ये बाय, भायर् गावासून ल्वॉक मुद्दाम तुमका बगुसाटनाइले हत...... तुमी जरा भायर् जावन् लोट्यावर उब्यो ऱ्हावन् येवा." नी दोन्ही नट्या बाहेर जाऊन उभ्या रहात.

नाटकाच्या दिवशी संध्याकाळ पासून झाडून सगळे पावणे रावळे जमायला लागले. गावात प्रत्येक घरात पंधरा-पंधरा; वीस- वीस पाहुणे जमलेले. नाटक हायस्कूलच्या पटांगणात व्हायचं होतं. दुपार नंतर पडदे बांधायला सुरुवात झाली. सहा तासानंतरच्या सुटीत सगळ्या पोरानी स्टेज भोवती नुसता गिल्ला केला. त्यांच्या कालव्यात काम करणाऱ्याना काम करायलाही सुधरेना. त्या गोंधळात सुट्र्र संपल्याचा गजर ऐकू आला नाही नी पोरे तिथेच रेंगाळत राहिलेली. पाच मिनीटानी गोविंद प्यूनच्या लक्षात ही गोष्ट लक्षात आल्यावर त्याने सराना सांगितलं नी पी.टी च्या सरानी बाहेर येवून जोरात व्हिसल वाजवल्यावर पोरं भानावर आली. गोंगाट बंद झाला नी पोरं धूम पळत सुटली. त्यानंतर ज्या वर्गांचे खेळाचे तास होते त्यानाही सरानी वर्गातच डांबून ठेवलेनी. शाळा सुटल्यावर कर्ण्यावर गाणी वाजायला लागली.लाउडस्पिकर त्यावेळी आम्ही पहिल्यानेच बघितला. राजकुमार, संगम अशा त्यावेळच्या पिक्चर मधली हिंदी गाणी आम्ही प्रथमच ऐकत होतो. बाहेर गावची पोरं निघून गेली पण गावातली यच्चयावत् सगळी पोरं खूप उशिरापर्यंत गाणी ऐकत तिथेच रेंगाळत थांबलेली.

रात्री बरीच गर्दी झालेली. त्यावेळी प्रथमच बाहेर गावानी बोर्ड लावलेले होते, शिवाय हायस्कूलला तीन चार गावची मुलं येत असल्यामुळे बातमी सगळीकडे पसरलेली. त्याहीपेक्षा मुंबय वाल्यानी नट्र्या आणलेनी ह्याचं लोकाना भारी अप्रूप..... खेचाखेच गर्दी लोटली ती नट्र्यांमुळे. तालमी वगैरे घेवून नीत बसवलेलं नाटक, शिवाय आदल्या रात्री स्टेजवर रंगीत तालिमही झालेली. तरी नशिब रंगित तालमीची गंधवार्ताही नाटकातल्या पार्ट्र्यांच्या घरच्या माणसानासुद्धा लागू दिलेली नव्हती. नाटक अगदी झोकात झालं. गेला दिलवर कुणीकडे/ माझ्या जाल्यात घावलाय् मासा / मेरे दिलपे छुरी चलाके या नाटकातल्या गाण्याना दोन दोन वन्समोअर मिळाले. पहिला अंक झाल्यावर

कुणीतरी सुमन नाईक नटीला दहा रुपये बक्षिस जाहीर केलं. ते घ्यायला नटी स्वत: बाहेर स्टेजवर आली. निवेदकाने स्पीकरवर सांगितलं, पडेलचे प्रसिद्ध आंबा व्यापारी गुणाजी माळगवे यांच्यातर्फे सुमन नाईक याना दहा रुपये बक्षिस, नी माळगवे शेठच्या हस्ते तिने नोट घेतली. नी मग काय विचारता...

नट्या समक्ष येवून बक्षिसाची नोट घेतात म्हटल्यावर चार पैसे बाळगणाऱ्या आंबा व्यापाऱ्यानी एकामेकाच्या इर्ष्येने बक्षिसांचा नुस्ता पाऊस पाडला. मध्यंतरात संयोजकानी "रसिकाना नम्र विनंती आहे की त्यानी नट नट्यांना वैयक्तिक बक्षिसं न देता सर्व नटवर्गाला मिळून सामुहिक बक्षिसं द्यावी " अशी सूचनाही दिली पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तिसरा अंक संपल्यावर तर स्टेज समोर सत्तर ऐंशी लोकांची हातात दोन - दोन तीन - तीन नोटा झळकवीत नुसती रांगच लागली. तेंव्हा मात्र संयोजकानी नावांची घोषणा करण बंद केलं. दोन्ही नट्या उभ्या राहिलेल्या नी ज्याला बक्षिस द्यायचं तो संबंधित नटीसमीर जावून नोट देई. त्या नाटकात दोन्हीही नट्यानी जबर कमाई केली.

१९६० ते ७० च्या दशकात तर गावोगाव मराठी शाळेत सरस्वती पुजनाला, हायस्कुलांमध्ये गॅदरिंगला अगदी निरपवादपणे मुलांचे विविध गुण दर्शन कार्यक्रम, नाटके, एकांकिका सादर होत. मराठी शाळांच्या कार्यक्रमाला त्या गावातले नी हायस्कुलांच्या कार्यक्रमाना दोन तीन गावांच पब्लिक जमत असे. त्या काळात पुरळकरांचे वासुदेव बळवंत, विजयदुर्गातले धर्मवीर संभाजी पडेलातले आयुष्याचा खेळ आणि दुरितांचे तिमीर जावो, मुटाटातले गारंबीचा बापू, वाड्यातले घराबाहेर, फ़णशातले कवडी चुंबक, तिर्लोटकरांचे देव्हारा, नाडणकारांचे आमराई, ‘करीन ती पूर्व’ हे सौंदाळकरांचे नाटक अशी काही नाटके जुने जाणते आजही नावाजतात. तसंच कुणीतरी आठवले नाट्य मंडळ , प्रतिभा नाटक कंपनी, वसुदेव संगीत नाट्यमंडळ अशा कुणी कुणी कंपन्या एखादी जत्रा धरून येत. जत्रेत मोफ़त प्रयोग करीत. अर्थात देवस्थानतर्फे

काहीना काही रक्कम मिळे. शिवाय जत्रेतल्या नाटकात कुणी ना कुणी देव स्टेजवर हटकून आणला जात असे. त्याच्या पाया पडायला बायाबापड्या जात नी रुपया आठ आणे फेकीत. तसेच गावातल्या एखाद्या धनिकाची पन्नास रुपयाची नोट घ्यायला देव पुढे येई नी मग पैसेवाले हिरिरीने पन्नास शंभर रुपये देत. जत्रेतला खेळ झाल्यावर मग कंपनी आणखी पाच सहा गावात दौरे करी. थोडी दुर्गम एकवशी असलेली गावं जिथे अजून एस्टीसुद्धा जात नसे अशा गावानी नाटकवाल्यांचा जबरदस्त धंदा होई.

चौसष्ट सालानंतर टूरिंग टॉकिज यायला लागल्या नी सार्वजनिक नाटकांचं लोण बरचसं थंडावलं. गावातल्या वाड्या- वाड्यांमधून होणाऱ्या सार्वजनिक पूजाना आणि गावातल्या देवस्थानात उत्सवाला भजनानी जोर धरला.त्याच दरम्याने देवगडला अधून मधून कंपनीची नाटकं यायला लागली. आता गावात क्वचित कोणी हौशी तरुणानी नाटक बसवलंच तरी त्या नाटकाना लोकं गर्दी करीनाशी झालेली. शाळांमधल्या कार्यक्रमांमध्येही नाटक, एकांकिकांचं प्रस्थ कमी झालेलं. त्याऐवजी प्रसिद्ध हिंदी मराठी चित्रपटातल्या गाण्यांच्या रेकॉर्ड वाजवून पोरं पोरी नाच करून दाखवीत. हा प्रकार पुढे रेकॉर्ड डान्स नावाने भलताच बोकाळला.

पण जवळ जवळ दोन दशकं पछाडणारं नाटकांच वेड सर्वर्थाने मोडीत निघालं ते एकोणसत्तर साली. त्यावर्षी आमच्या तानवडे वाडीत होणाऱ्या मांडावरच्या सार्वजनिक पूजेला वाणी मंडळीनी प्रथमच पडद्यावरचा पिक्चर आणला. त्यावेळी लाईटही आलेले नव्हते. पण पेट्रोलवर चालणारे जनरेटर आणलेले होते. गाववाल्यांसाठी पूजेच्या आदल्या रात्री फक्त ‘नरवीर तानाजी’ हा चित्रपट मोठ्याना चार आणे नी मुलाना दोन आणे तिकीटावर लावलेनी. दुसरे दिवशी पूजेला "थांब लक्ष्मी कुंकू लावते " हा चित्रपट पडद्यावर लावण्यात आला. या खेळाला मात्र आजू बाजूच्या गावातून एवढं पब्लिक जमलं की एकंदर रागरंग पाहता मांडावर जागा पुरणार नाही म्हणून आयत्या

वेळी वाडीबाहेर मोकळया शेत मळ्यांमध्ये पडदा लावावा लागला. पिक्चर लोकाना भलताच आवडला. त्यानंतर मात्र नाटकांची प्रथा पूर्णच मोडीत निघाली आणि पडद्यावरच्या चित्रपटाचा नवा जमाना सुरू झाला.



※※※※※※※※

# प्रा. श्रीराम काळे यांची ग्रंथसंपदा

ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे
























## ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षांचे होत आहे.
## प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील नववे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली लेखक आहेत. देवगड येथील बी. एड्. विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली चाळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्या ऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर (४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (६१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय

अनुवाद (६१ पुस्तके), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, प्राचार्य शशिकांत कर्डेकर(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०), वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी

लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।**
**दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।**